नोव्हेंबर १९७४

# अर्थ

दिवाळी अंक

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड




स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसींचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, व्हॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेही केव्हाही तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसींच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसींच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, लॉन्स, ड्रेस वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.


ठाकरसींचे सुती कापड व धुरगळण्याच्या चाचणीला टिकेल असे 'मर्सराइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

कार्यालय • हिन्दुस्थान मिल नं. १ • हिन्दुस्थान (स्पिनिंग) मिल नं. १
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.


FOR HIRE
FARE
वाजवी भाड्यासंबंधी न्याय !
फक्त
डायमंड
मिटर्सच
देऊ शकतात
दीर्घकाल टिकाऊ
मजबूत बांधणी.
१०० टक्के स्वदेशी
माफक किंमत
एक वर्षाची गॅरंटी
बिनचूक भाडे दर्शविणारे
विक्रीनंतरची सेवा उपलब्ध
उत्पादक
डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
११८० बुधवार पेठ, पुणे-२
सोल सेलिंग अेजंट्स: आनंद ट्रेडर्स ११८० बुधवार पेठ, पुणे-२ फोन: ९६९७५


गोगटे
पेपर
गोगटे
आयर्न
गोगटे
उद्योग
समूह
गोगटे
मँगेनीज
गोगटे
सॉल्ट
गोगटे
मिनरल्स
गोगटे
स्टील्स
गोगटे उद्योग समूह
म्हणजेच
गतिशील व नियोजित
विकास
टिळकवाडी, बेळगाव

# शुभ दीपावली



## दुरितांचे तिमिर जावो...

सामान्य माणसाच्या सुखदुःखाशी एकरूप होवून त्यांच्याशी आर्थिक गुजगोष्टी करण्यातला आनंद हा दिवाळी सारखाच! आम्हाला यातच धन्यता वाटते.
या प्रकाशसणाचं स्वागत करताना सर्वांसाठी 'जो जे वांछिल तो ते लाहो' हीच प्रार्थना!

आपली बँक- चांगली बँक - सांगली बँक

**दि सांगली बँक लि.**
रजि. ऑफिस-राजवाडा चौक, सांगली.
जनरल मॅनेजर: — का. ध. भुजर


# muscle building at 74

SHIVAJI WORKS, born in 1900, is not relaxing. At 74 it is flexing its muscles, developing them... and starting new activities.

One of these... making castings... began a few years ago. Young, dynamic industries are marching ahead, manufacturing automobiles, tractors, locomotives... SHIVAJI WORKS now makes castings for them... grey iron castings of 5 to 100 Kgs in weight.

At 74 life is just beginning for it... a vigorous, useful, purposeful life.

If you need castings in the 5—100 Kg range, IS grade No. 20—30, just call SHIVAJI WORKS.




PRATIBHA 74 A




# ☆ अर्थ ☆

दिवाळी अंक
बुधवार, १३ नोव्हेंबर, १९७४

संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## संपादकीय

" अर्था " ची स्थापना १९३५ साली कै. प्रोफेसर वा. गो. काळे ह्यांनी केली, त्याचा उद्देश महाराष्ट्रात आर्थिक चैतन्य निर्माण करणे हा होता. त्यांनी आपली सबंध हयात महाराष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयासाठी व वेचली, प्रत्यक्ष बँका, विमाकंपन्या, कारखाने ह्यांच्या स्थापनेत आणि विकासांत सक्रिय भाग घेतला आणि झीज सोसली. त्यांच्या मृत्यूनंतर ( १९४६ ) "अर्था"ची जबाबदारी माझ्याकडे आली आणि गेली २८ वर्षे त्याचे संपादन मी करीत आहे. "अर्था"ला १९७४ अखेर ४० वर्षे पुरी होत आहेत. "अर्था"च्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीला महाराष्ट्रीय बँका, व्यापारी, कारखानदार, ह्यांनी भरपूर पाठिंबा दिला, म्हणूनच ही सेवा शक्य झाली.

आता महाराष्ट्रीयांची उद्योगधंद्याविषयी अनास्था दूर होत असून तरुण पिढी आर्थिक व्यवसायात हिरिरीने भाग घेऊ लागली आहे. " अर्थ एव प्रधानः अर्थमूलौ धर्मकामाः " हे महाराष्ट्रीय जनतेला पटू लागले आहे. मराठी साहित्याची कल्पनांदुक वृत्ती नाहीशी होऊ लागली आहे. आर्थिक वाङ्मयाचे महत्त्व लोकांना पटू लागले आहे. "अर्था"च्या आघाडीच्या दृष्टयाचे कार्य सफल झाले आहे. म्हणून, आम्ही आता "अर्था"चे प्रकाशन १९७४ अखेर बंद करण्याचे ठरविले आहे.

"अर्था"चे प्रकाशन सातत्याने ४० वर्षे चालू राहिले, ह्याचे श्रेय 'अर्था'च्या हितचिंतकांसच आहे. कितीतरी व्यक्तींनी आणि संस्थांनी "अर्था"चे महत्त्व आणि त्याच्या प्रकाशनातील अडचणी जाणून सक्रिय प्रोत्साहन दिले आहे.

त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांनी केलेल्या साहाय्याचा अधिकात अधिक निष्ठेने आणि कार्यक्षमतेने सदुपयोग करण्याचा " अर्था " ने प्रामाणिक प्रयत्न केला, ह्या समाधानात " अर्थ " आता १९७४ अखेर आपला निरोप घेणार आहे.

प्रस्तुत दिवाळी अंकाची योजना नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकारची आहे, हे वाचकांच्या लक्षात येईल. "अर्था"चे संस्थापक प्रा. वा. गो. काळे ह्यांच्या निधनास आता २८ वर्षे होऊन गेली. तेव्हा त्यांच्या चरित्राची आणि आर्थिक क्षेत्रातील स्वार्थत्यागपूर्वक केलेल्या अपूर्व कामगिरीची वाचकांना ओळख रहावी, ह्या हेतूने काही लेख मुद्दाम देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ४० वर्षांपूर्वीच्या प्रश्नांची कल्पना देणारेही लेख दिलेले आहेत त्यावरून आपण केलेल्या आणि अद्याप करावयाच्या वाटचालीची कल्पना येईल. आजच्या युगात संपत्तेत भर घालण्यास आवश्यक अशी मनोवृत्ती वाढण्याऐवजी आळशीपणाची आणि कष्ट टाळण्याची प्रवृत्ती जोम धरत आहे. ही चिंतेची बाब आहे. आपल्या राष्ट्रापुढील सर्व समस्यात ही मानवी समस्या महत्त्वाची आहे, त्याबाबतीत घरापासून शाळापर्यंत सुधारणा घडवून आणण्यावरच आपले भवितव्य अवलंबून आहे. ○

ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !

### अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ संपादकीय | ७ |
| २ अर्थयोग | ९ |
| ३ न्यायमूर्ती रानडे आणि भारतीय अर्थशास्त्र | ११ |
| ४ भारताचे अग्रेसर अर्थशास्त्रज्ञः आमचे दादा | १३ |
| ५ न्यायमूर्ती रानडे आणि प्रा. काळे | १९ |
| ६ अर्थ, अर्थाचे संपादक आणि मी. | २१ |
| ७ औद्योगिक क्षेत्रातील 'स्वस्तिक'ची कामगिरी | २५ |
| ८ सरड्याची धाव कुंपणापर्यंत माणसाची धाव…? | २७ |
| ९ फुकटेल प्रवृत्ती सनिजांचा सुटकारा | २९ |
| १० उच्चशिक्षण आणि तरुण पिढीचा जीवनक्रम | ३१ |
| ११ न्यायमूर्ती रानड्यांची दूरदृष्टी | ३३ |
| १२ सुशिक्षित बेकारांची हृदयद्रावक कहाणी | ३५ |
| १३ सहकारी कार्यकर्त्यांस संदेश | ३७ |
| १४ सहकारात आतूनच मने व सूत्र एकत्र हवे | ३७ |
| १५ देशाच्या पाठबळापासून सारे स्पर्धा | ३८ |
| १६ बँकांस सावधगिरीची सूचना | ४१ |
| १७ महाराष्ट्रीय व्यापारी बँक | ४३ |
| १८ पोटास मंद, ज्याळाला मंद | ४५ |
| १९ मोंडवडशाहीत लोकशाही | ४७ |
| २० नवीन कारखाने काढावयाचे आहेत काय? | ४९ |
| २१ हाजी मस्तानचा धंदा कोणता? | ५२ |

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

तें तीर्थ तें क्षेत्र। जगीं तेचि पवित्र।
भक्तिक्रयेसि मैत्र। जयां पुरुषां। —श्री ज्ञानेश्वरी.

साखरेचा नवीन हंगाम १० ऑक्टोबरला सुरू झाला.

देशी व विदेशी मद्याचे उत्पादन व्यवस्थित चालू आहे.

आमचे भागीधारक, ठेवीदार व हितचिंतकांना दसरा-दिवाळी
व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

फोन : ५७२११ : पुणे
तार : श्री : पुणे

ज. चं. आगाशे
ज्ञा. चं. आगाशे
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

## दीपावली शुभचिंतन

दीपावली व नूतन वर्ष आमच्या भागीदारांस, ग्राहकांस व
हितचिंतकांस सुखाचे व समृद्धीचे जावो.

## दि उगार शुगर वर्क्स लि., उगार-खुर्द

जिल्हा बेळगाव ] ✻ [ कर्नाटक स्टेट

रजिस्टर्ड ऑफिस :
वखार भाग, सांगली
फोन नं. १११

फॅक्टरी ऑफिस :
उगार–खुर्द
फोन नं. १८७ (सांगली)
तार–" उगारशुगर " उगार खुर्द

★ शुभ्र दाणेदार साखर, ★ इंडस्ट्रियल अल्कोहोल ★ व आय. एस. आय. मार्क
मिळालेले इंडियन मेड फॉरीन लिकर्सचे एकमेव अग्रेसर उत्पादक

# अर्थ

बुधवार, ता. २ जानेवारी, १९३५


## अर्थ-योग

"तस्मान्नित्योत्थितो राजा कुर्यादर्थानुशासनम् ।
अर्थस्य मूलमुत्थानमनर्थस्य विपर्ययः ॥
अनुत्थाने ध्रुवो नाशः प्राप्तस्यानागतस्य च
प्राप्यते फलमुत्थानाल्लभते चार्थसंपदम् ॥"

— कौटिलीय अर्थशास्त्र

(म्हणून, राजाने नित्य उद्योग करून अर्थसाधन करावे. उद्योग हा अर्थप्राप्तीचे मूळ आहे; आणि उलट, उद्योगाचा अभाव अनर्थास कारणीभूत होतो. हातून उद्योग न झाल्यास जवळ असलेल्या व पुढे मिळावयाच्या संपत्तीचा नाश निश्चित आहे. उद्योगाने फलप्राप्ती होऊन भरपूर संपत्ती मिळते.)

कोणत्याही समाजाची किंवा राष्ट्राची सुस्थिती त्याच्या अनेकांगी समकालीन उन्नतीवर अवलंबून असते. समृद्ध राष्ट्रात विद्या, कला, नीति, उद्योग, व्यापार व राज्यकारभार ही सर्व अंगे सुदृढ असतात आणि कोणत्याही समाजात ह्यापैकी काही अंगांची अमर्याद वाढ किंवा जोपासना झाल्यास अथवा काहींची विशेष अनास्था झाल्यास त्या समाजाची अवनती व नाश ही क्रमप्राप्तच असतात, असा मानवी जीवनाच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा सिद्धांत दिसतो. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, बौद्धिक वगैरे सर्व बाजूंनी एकसमयावच्छेदेकरून देशाची प्रगती झाली पाहिजे अशी इच्छा हिंदुस्थानात अलीकडे दृढतर होत चालली आहे, ह्याचे मुख्य कारण वरील सिद्धांताची वाढती जिवंत जाणीव हा होय. राष्ट्रोन्नतीचे ध्येय जिंकण्यास राजकारण, व्यापार-धंद्यांची जोपासना, समाजसुधारणा आणि नीतिसंवर्धन ह्यांची चतुरंगसेना उद्योग-समरांगणात सिद्ध असावयास पाहिजे, हे तत्त्व पाश्चात्त्य विद्वानांस संमत असून सर्व प्रमुख राष्ट्रातील पुढारी त्याचे आचरण करीत आहेत. वरील साधने कार्यक्षम व्हावी एवढ्यासाठी समाजातील निरनिराळ्या वर्गांस त्याचे ज्ञान आणि अनुभव प्राप्त करून देणे आवश्यक असते. शिकावयाच्या विद्यांची संख्या काय आहे ह्यासंबंधाने निर्णय देताना, विद्या एकच आहे, त्या दोन आहेत व त्या तीन आहेत ही भिन्नभिन्न विद्वन्मते अग्राह्य ठरवून त्या चार आहेत आणि त्या म्हणजे तत्त्वज्ञान, वेद, अर्थशास्त्र व राजकारणशास्त्र ह्या होत, असा स्वतःचा ठाम सिद्धांत चाणक्याने आपल्या 'अर्थशास्त्र' ह्या ग्रंथात मांडला आहे ह्याचे कारण वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

समाजहित, नीतिधर्म व राजकारण ह्यांकडे न पाहता ऐहिक सुखाच्या मागे प्रत्येक व्यक्तीने लागावे, म्हणजे सर्व मानवजातीचे हित अनायासे साधते अशी अर्थशास्त्राची वास्तविक शिकवण नाही. असल्या मतांचा एका काळी प्रसार झाला होता हे खरे आहे. परंतु व्यक्तिहिताऐवजी राष्ट्रहिताला प्राधान्य मिळून समाजाचा घटकावयव ह्या नात्यानेच व्यक्तीचे महत्त्व आहे ह्या विचारसरणीचे प्राबल्य आता पाश्चात्त्य पंडितांच्या लिखाणातही व्यक्त होत आहे. समाजाचे व राष्ट्राचे उन्नतीचे ध्येय साधण्यास आवश्यक असलेल्या योग्य साधनांचा विचार करणारे शास्त्र, अशी अर्थशास्त्राची व्याख्या एका पाश्चात्य विद्वानाने केली आहे, ती लक्षात ठेवण्यासारखी आहे. धर्म, अर्थ आणि काम ही परस्परावलंबी आहेत तर अर्थावाचून धर्म व काम असाध्य असल्यामुळे कौटिल्याने अर्थास प्राधान्य दिले आहे त्याचेही रहस्य हेच आहे. निसर्गात असलेल्या शक्तींचा आपल्या बुद्धीच्या बलाने उपयोग करून आपली शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक उन्नती करून घेणे हे राष्ट्राच्या संस्कृतीचे ध्येय होय, आणि अर्थोपासना हा ते ध्येय गाठण्याचा मार्ग आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी व्यवहार ही अर्थार्जनाची साधने असून त्यांच्या योग्य संघटनेवर व कार्यक्षमतेवर समाजाची सुस्थिती अवलंबून रहाणे अपरिहार्य आहे. ह्याकरिता राष्ट्राचे नेतृत्व ज्यांच्या हाती आहे अशा लोकांनी जनतेस योग्य शिक्षण देऊन सर्वांच्या अंगी कार्यक्षमता उत्पन्न केली पाहिजे. मानवजातीच्या संघटनेत राष्ट्र हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असे केवळ तात्त्विक रीतीनेच नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहारातही मानण्यात येते, आणि राष्ट्रांचे परस्परसंबंध स्वातंत्र्य आणि सहकारिता ह्यांच्या आधारावर निश्चित करण्यात येतात. अशा स्थितीत हिंदी राष्ट्राने स्वतःची उन्नती करून इतर राष्ट्रांच्या बरोबरीने सर्व मानवजातीची उन्नती साधावी हे उचित आहे.

उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या बाबतीत पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य असावे, स्पर्धेस अनियंत्रित वाव मिळावा आणि राज्यकर्त्यांनी परराष्ट्रीय व्यापारास आपल्या देशाचे दार उघडे ठेवावे व आर्थिक व्यवहारात कोणतीही ढवळाढवळ करू नये असा दंडक प्रत्यक्ष आचरणात नाही, तरी तत्त्वतः कमीअधिक प्रमाणात जगभर सर्वत्र गेल्या शतकात मान्यता पावला होता. हे पारडे आता फिरले असून राष्ट्रीय स्वयंसिद्धतेचा सिद्धांत चोहोकडे जोरावत आहे. रशियापासून अमेरिकेपर्यंत सर्वच राष्ट्रे महायुद्धामुळे बदललेल्या आर्थिक परिस्थितीस तोंड देण्यासाठी आपल्या राज्यकर्त्यांमार्फत स्वतःच्या उद्योगधंद्यांस व व्यापारास योग्य योजना आखून त्याप्रमाणे इष्ट वळण देत आहेत. ह्यापुढे जगाची आर्थिक घटना हा राष्ट्रीय स्वयंसिद्धतेच्या पायावरच उभी रहावयाची आहे. प्रस्तुत लेखाच्या शिरोभागी कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील वचन उद्धृत केले आहे, त्यात प्रजेचे हित तेच राजाचे हित असल्याने, राजाने उद्योग करून अर्थसंपादन करावे असे म्हटले आहे. त्याचाच प्रतिध्वनी सध्या, वर सांगितल्याप्रमाणे, पाश्चात्त्य राष्ट्रांत उमटत आहे हा एक विलक्षण योगायोग आहे. लोकांचे

प्रतिनिधि आणि हितकर्ते जे सरकार, त्याने राष्ट्रीय उद्योगधंद्यांस हेतुपूर्वक उत्तेजन द्यावे ही जी हिंदी जनतेची मागणी आहे ती इतर देशांत आता संमत झालेल्या धोरणास सर्वस्वी धरून आहे. इंग्लंडमधील कोत्या बुद्धीचे स्वार्थसाधू कारखानदार आणि व्यापारी हिंदुस्थान सरकारास 'जकातीचे स्वातंत्र्य' देण्यास तयार नसून त्यावर भलतेच निर्बंध घालू पहात आहेत ह्याबद्दल हिंदुस्थानांत चोहोंकडे निषेध प्रदर्शित होत आहे, तो वावगा आहे असे कोण म्हणेल ! खुल्या व्यापाराचे, आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचे आणि अनियंत्रित स्पर्धेचे माहेरघर जे ब्रिटिश राष्ट्र, त्यातहि औद्योगिक संरक्षणाच्या पद्धतीचा उपक्रम झाला असता, हिंदुस्थानास व्यापारी स्वयंनिर्णयाच्या बाबतीतला हक्क नाकारणे न्यायाचे कसे होईल ! ह्यापुढे सर्वत्र आंतरराष्ट्रीय व्यापार राष्ट्रीय सरकारांच्या दरम्यान होणाऱ्या करारांप्रमाणे चालावयाचा असल्याने त्याच धोरणास अनुसरून हिंदुस्थानातील लोकमतास मान देण्यात ग्रेट ब्रिटनचे व ह्या देशांचे सारखेच हित आहे ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

हिंदी शेती, व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा विकास झाल्यावाचून जनतेची आर्थिक स्थिती सुधारणे अशक्य आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. ह्या कामी खेडोपाडी कार्यक्षम आर्थिक पद्धती आणि संघटन ह्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होणे इष्ट आहे; त्याचप्रमाणे लहान मोठ्या गावांतून आणि शहरांतून आर्थिक बुद्धी जागृत झाली पाहिजे. महाराष्ट्रात तर ह्या अर्थयोगाचे महत्त्व विशेष आहे. गेल्या दोन पिढ्या महाराष्ट्रीयांनी हिंदुस्थानच्या सार्वजनिक चळवळीत पुढाकार घेऊन हिंदी संस्कृती व प्रगती ह्यांस नवीन वळण लावण्याचा मान मिळविला आहे. हे स्थान महाराष्ट्रीयांस टिकवावयाचे असेल तर आर्थिक दुर्बलतेचे आपणात असलेले वैगुण्य त्यांनी काढून टाकले पाहिजे. दीर्घोद्योग आणि योग्य संघटना ह्यांच्या साहाय्याने अर्थयोग त्यांनी अंगी बाणवला पाहिजे. आमच्या समाजास साहित्य, संगीत, कला ह्यांची जशी आवश्यकता आहे तशीच उद्योगधंद्यांची व व्यापाराचीही आहे; किंबहुना, आजच्या परिस्थितीत आर्थिक व्यवहारातील नैपुण्याची जरूर जास्त आहे, ही गोष्ट सर्वमान्य होण्यासारखी आहे किंवा झालीही आहे. तथापि, महाराष्ट्राची अर्थविषयक प्रवृत्ती अत्यंत दुर्बळ असल्याने ह्या संबंधाच्या कल्पनांचा व वाङ्मयाचा महाराष्ट्रात अभावच आहे असे म्हटले असता अतिशयोक्ति होणार नाही. सामाजिक संस्कृतीत ललितवाङ्मयास जसे स्थान आहे, त्याच तोडीचे स्थान अर्थविषयक वाङ्मयास प्राप्त होणे अगत्याचे आहे आणि ही उणीव भरून काढण्याचे साहस ह्या साप्ताहिकाच्या द्वारे आम्ही करीत आहो. बँकिंग, परराष्ट्रीय व्यापार, उद्योगधंदे, चलन, हुंडणावळ, जकाती, आर्थिक घटना, यांत्रिक सुधारणा, ह्यांच्या बाबतीत विलक्षण घडामोड व उलथापालथ जगात चालली आहे, आणि त्यात प्रत्यक्ष भाग घेणे तर राहो, पण त्यांची माहिती असणारी माणसे महाराष्ट्रीय समाजात—सुशिक्षित वर्ग धरूनही—किती सांपडतील ? हा दोष नाहीसा करण्याचा एक मार्ग म्हणजे अर्थविषयक वाङ्मय निर्माण करून सामान्य जनतेसही त्याचा फायदा घेता यावा अशी योजना करणे हा होय. आर्थिक लोकजागृती आणि आर्थिक व्यवहाराचे लोकशिक्षण हाच आमच्या प्रयत्नाचा मुख्य उद्देश आहे.

ह्या उद्योगास आम्ही साहस असे म्हटले आहे ह्याचे कारण त्या कामी अंगावर येणारी विशेष जबाबदारी हे होय. मागणीस अनुसरून पुरवठा होतो व करावा हा आर्थिक नियम सर्वश्रुत आहे. त्यास प्रस्तुत उपक्रम अपवादासारखा आहे असे दिसेल. परंतु येथे दुसरे एक आर्थिक तत्त्व लक्षात ठेवणे आवश्यक आहे. लोकांस काय पथ्यकर आहे हे जाणून, शिक्षणाच्या साहाय्याने गरजांस नवीन वळण लावता येणे शक्य होते, आणि योग्य वस्तूंचा पद्धतशीर पुरवठा झाला असता, नवीन मागणी निर्माण करता येते. शिवाय, ही सार्वजनिक हिताची व निकडीची बाब असल्याने तिच्या संबंधात महाराष्ट्रीय जनतेकडून योग्य उत्तेजन आणि साहाय्य मिळेल असा आम्हास पूर्ण भरंवसा आहे. कारखानदार, व्यापारी, व सर्वसामान्य सुशिक्षित जनता ह्यांचा आश्रय मिळेल त्या मानाने साप्ताहिकाचा आकार, स्वरूप व मजकूर ह्यात सुधारणा करणे शक्य होईल. आर्थिक प्रश्न अनेकविध, गुंतागुंतीचे व समजण्यास अवघड असे असतात. म्हणून त्यासंबंधाची निवडक अशी विविध माहिती देऊन शास्त्रीय पार्श्वभूमी न सोडता पण सुलभ भाषेत त्यांची वेळोवेळी चर्चा करावयाची आणि जगात व हिंदुस्थानात चाललेल्या आर्थिक घडामोडींशी वाचकांचा परिचय करून देऊन उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या उन्नतीचा व्यावहारिक मार्ग त्यास दाखवून द्यावयाचा हे 'अर्था' चे धोरण राहील. शेतकरी, जमीनदार, उद्यमी, लहान मोठे व्यापारी, कारखानदार, भांडवलवाले, पोटापाण्याचा प्रश्न सोडवू पाहणारे सुशिक्षित तरुण, सुखवस्तु व मध्यम स्थितीतील वर्ग, सार्वजनिक चळवळीमध्ये भाग घेणारे व घेऊ इच्छिणारे नागरिक, मराठी व इंग्रजी शाळांतील शिक्षक अशा भिन्न भिन्न व्यवसायांच्या व परिस्थितीतल्या अनेक लोकांस हे साप्ताहिक उपयुक्त होईल अशा तऱ्हेने ते चालविण्याचा आमचा मानस आहे. औद्योगिक उत्साहाची एक मोठी लाट महाराष्ट्रावर कित्येक वर्षांमागे येऊन गेली. न्यायमूर्ती रानडे, नामजोशी, नागपूरकर, वगैरे सद्गृहस्थांच्या प्रयत्नांस तात्पुरते थोडे यश आले. त्याची पुनरावृत्ती गेल्या पिढीत होऊन थोडे बहुत भरीव कामही झाले. स्वदेशी चळवळीचे व पैसा फंडाचे कार्य सर्वांस महशूरच आहे. अगदी अलीकडील प्रगती तर विशेष उत्तेजनकारक आहे. नवीन धंदे काढून ते धडाडीने व चिकाटीने चालविण्यास कित्येक महाराष्ट्रीयांनी संपादिलेले यश आता सामान्य जनतेसही परिचित असून त्यांचा येथे नामनिर्देश करण्याचे प्रयोजन नाही. लोकांमध्ये आत्मविश्वास व परस्पर-

विश्वास ही वाढत आहेत, नवीन उद्योगांस लागणारे भांडवल उपलब्ध होत आहे, औद्योगिक प्रदर्शने भरत आहेत व धंदेवाले आणि व्यापारी ह्यांचे संघटन चालू आहे. बोलपटांच्या मंडळ्या, विमा कंपन्या आणि साखरेचे कारखाने महाराष्ट्रांत निघून आपली कामे व्यवस्थित रीतीने करीत आहेत, हे आर्थिक प्रगतीचे उद्बोधक लक्षण आहे.

ही आर्थिक प्रगती टिकाऊ व हितप्रद होण्यास यथांतली पात्रता व कार्यक्षमता, व्यापारी दानत, सचोटी, जूट आणि शिस्त ह्यांची अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीतली स्वतःची जबाबदारी व कर्तव्य ह्यांची प्रत्येक नागरिकास चांगली जाणीव होणे जरूर व इष्ट आहे; आणि ती आर्थिक विषयांच्या ज्ञानावाचून व अनुभवाशिवाय होणे शक्य नाही. कोणताही औद्योगिक किंवा व्यापारविषयक प्रश्न उपस्थित झाला असता त्यासंबंधाने स्वतः योग्य मत बनविण्याची पात्रता जनतेत उत्पन्न झाली पाहिजे आणि आर्थिक जगात चालणाऱ्या घडामोडींचे स्थूल मानाचे ज्ञान प्रत्येक नागरिकास असणे अगत्याचे आहे. आर्थिक महत्त्वाच्या बाबींची वेळोवेळी माहिती देऊन त्यांचे वारंवार सुगम्य विवेचन केल्याने हा कार्यभाग साधता येईल ह्या विश्वासाने आम्ही प्रस्तुत साप्ताहिकाचा उद्योग आरंभिला आहे. त्यास महाराष्ट्रीय जनता उत्साहपूर्वक साहाय्य करील असा भरंवसा आम्हांस वाटत आहे. आमच्या उपक्रमाचे बीज करण्याचे काम आम्ही लोकांवर सोपवितो. अर्थ २-१-१९३५

# न्यायमूर्ती रानडे आणि भारतीय अर्थशास्त्र

जाडी विद्वत्ता, तीव्र बुद्धी, दीर्घोद्योगशीलता, मधुर वक्तृत्व, लेखनचातुर्य, इत्यादी गुणांपैकी एखादा जरी कोणत्याही व्यक्तीत उत्कटतेने वसत असेल तर ती व्यक्ती समाजात चमकू शकते आणि अशा गृहस्थास पुढारीपणाचेही स्थान लाभते. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात, हिंदी राष्ट्राच्या नेत्यांच्या मालिकेत न्या. रानडे ह्यांस अग्रेसरत्वाचा मान मिळाला ह्याचे कारण मात्र त्यांच्या ठिकाणी वसत असलेल्या अनेक गुणांचा अपूर्व समुच्चय हे होय. न्यायाधीश, अध्यापक, तत्त्वज्ञानी, समाजसुधारक, अर्थशास्त्रवेत्ता, इतिहासज्ञ, इंग्लिशभाषाकोविद, राजकारणपटू ह्यांपैकी कोणत्याही नात्याने त्यांस राष्ट्रात पहिल्या प्रतीची कीर्ती स्वतंत्र रीतीने मिळाली असती; आणि ह्या सर्वच अंगांनी त्यांचे जीवित विभूषित झाल्याने त्यांच्या चरित्रास अद्वितीयत्व प्राप्त झाले असल्यास त्यात आश्चर्य काय! तरीही न्यायमूर्तींचा अनन्यसाधारण विशेष, त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता, अगाध ज्ञान अपूर्व द्रष्टेपणा आणि स्वदेशप्रीतियुक्त मुत्सद्दीपणा ह्यामध्ये होता, असे म्हणण्यास हरकत नाही. पूर्वेतिहास, सद्यःस्थिती आणि भविष्य कालघटना ह्यासंबंधाची गुहेत दडलेली तत्त्वे त्यांच्या दिव्य दृष्टीस सहज दिसत असत; आणि हिंदी राष्ट्राच्या भूत-भवितव्याविषयीची प्रमेये ते लीलेने सोडवीत. त्यांचा कोणताही लेख किंवा भाषण घेतल्यास त्यात हा विशेष प्रामुख्याने आढळल्यावाचून रहावयाचा नाही; आणि उत्कृष्ट बुद्धिमत्ता व पहिल्या दर्जाची विद्वत्ता ह्यास त्यांचे ठिकाणी जागरूक स्वदेश-प्रीतीची जोड मिळाल्यामुळे त्यांचे विचार हिंदी जनतेस मार्गदर्शक झाले आहेत. न्यायमूर्तींस स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यास सवड असती तर त्यांच्या लेखणीतून आडाम स्मिथ, डॅलिसन, जॉन स्टुअर्ट मिल, असल्या त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या पाश्चात्त्य विद्वानांच्या तोडीचे वाङ्मय बाहेर पडले असते.

न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या रीतीत अर्थशास्त्राच्या अभ्यासात, आडाम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, मिल, फॉसेट इत्यादी लेखकांच्या विचारांचे पूर्ण वर्चस्व होते. ह्या पंडितांनी बनवलेल्या सिद्धांतास 'इंग्लिश अर्थशास्त्र' अशी संज्ञा प्राप्त झाली होती. इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य ह्यातल्या परिस्थितीची वरील विद्वानांच्या मनावर छाप बसली असल्याकारणाने त्यांच्या हातून अर्थशास्त्रास व त्याच्या शिकवणीस विशिष्ट वळण लागले होते आणि हिंदुस्थानात प्रस्थापित झालेल्या शिक्षणसंस्थांत ब्रिटिश शिक्षणपद्धतीचे अनुकरण होत असल्याने येथील तरुण पिढीस इंग्रजी अर्थशास्त्राचेच बाळकडू मिळत होते. व्यक्तीचे आर्थिक व्यवहार स्वार्थबुद्धिप्रेरित असतात व अशा स्वार्थास पूर्ण वाव देणे लोकहितप्रद आहे, ह्या मूलभूत तत्त्वांच्या पायावर आपल्या सबंध शास्त्राची उभारणी करून त्याचे सर्वसाधारण सिद्धांत इंग्लिश पंडितांनी प्रणीत केले. उद्योगधंद्यांच्या प्रगतीत ब्रिटिश राष्ट्र अग्रेसर असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती व अर्थशास्त्रीय सिद्धांत ह्यामध्ये पूर्ण संगती प्रत्ययास येत होती. व्यक्तिस्वातंत्र्य, खुला व्यापार आणि आर्थिक धोरणाच्या बाबतीत राज्यकर्त्यांचा तटस्थपणा ह्या गोष्टी इंग्लिश अर्थ-पंडितांच्या तत्त्वाचे सत्यत्व सिद्ध करीत होत्या, आणि जी तत्त्वे इंग्लंडच्या स्थितीस सुसंगत होती तीच इतर सर्व लोकांसही पथ्यकर असून त्यास जगात सर्वत्र मान्यता मिळावी अशी कल्पना त्या देशात दृढमूल झाली होती. हिंदुस्थानात ब्रिटिश राज्यकर्ते ह्याच विचारांनी भारलेले असून ते येथील विशिष्ट परिस्थितीत, युक्तायुक्तता न पाहाता, त्यास अनुसरून राज्यशकट हाकीत होते, आणि सुशिक्षित हिंदी लोकांसही त्यात काही विपरीत आहे असे वाटले नाही.

इंग्लंडच्या बाहेर युरोपात व अमेरिकेत मात्र, इंग्लिश अर्थशास्त्र व त्यावरून निघणारी व्यावहारिक अनुमाने ह्यांवर हल्ले होऊ लागली; ह्याचे कारण, स्वतःच्या राष्ट्राच्या

परिस्थितीशी व आकांक्षांशी ती विसंगत आहेत असा तेथील लोकांस आलेला प्रत्यक्ष अनुभव हे होय. देशातील काही व्यापाऱ्यांनी परराष्ट्रीय व्यवहारापासून स्वतःचा फायदा करून घेतला म्हणजे राष्ट्राचा फायदा होतोच असे नसून त्याबरोबरच, देशी उद्योगधंदे खालावत असता त्या अवनतीकडे दुर्लक्ष होत गेले तर त्यात राष्ट्राचे अनहित आहे; म्हणून प्रत्येक राष्ट्राने आपल्या राज्यकर्त्यांच्या मार्फत, जरुर पडल्यास परराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण घालून, स्वकीय धंद्यांस उत्तेजन द्यावे आणि त्यास ऊर्जितावस्थेत आणावे ही विचारसरणी इंग्लंडच्या बाहेर अधिकाधिक मान्य होत चालली. त्याचप्रमाणे, इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांच्या सिद्धांतातील अव्यवहारिकपणाचा दोष दाखवून व निरनिराळ्या देशांतील भिन्नभिन्न परिस्थितींचा अभ्यास करून तिला अनुरूप आर्थिक सुधारणेचे व संघटनेचे कार्य राज्यकर्त्यांनी हाती घ्यावे असे प्रतिपादन करणारे पंडित पुढे आले.

हिंदुस्थानातील परिस्थिती, आर्थिक उन्नतीच्या शिखरावर बसलेल्या इंग्लंडसारखी नसून तिच्या खालच्या पायऱ्यांवर धडपड करणाऱ्या युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांसारखी आहे; आणि म्हणून आम्हांस इंग्लिश अर्थशास्त्राचे सिद्धांत आणि त्यांवर आधारलेला सरकारचा तटस्थपणा ह्यांपेक्षा भिन्न असलेली लिस्टसारख्या लेखकांची अर्थशास्त्राची नवी तत्त्वे व संरक्षक आणि राष्ट्रीय वृत्तीचे सरकारी धोरण ह्यांचीच विशेष आवश्यकता आहे. ही गोष्ट न्यायमूर्ती रानड्यांच्या सूक्ष्म अवलोकनात येऊन ती त्यांनी मुद्देसूद रीतीने सरकारापुढे तशीच लोकांपुढेही मांडली. प्रत्येक देशाची नैसर्गिक स्थिती, तेथील लोकांची राजकीय व सामाजिक घटना, जनतेच्या चालीरीती, इत्यादी विशेषास धरूनच त्या राष्ट्राचे आर्थिक व्यवहारांचे वळण असले पाहिजे हे तत्त्व आता जगभर मान्य झाले आहे. त्यास अनुसरून हिंदी सरकारने देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देऊन राष्ट्राची आर्थिक उन्नती केली पाहिजे ही शिकवण त्या वेळच्या प्रचलित कल्पनांस धक्का देणारी होती; पण तिचा पुरस्कार माधवरावजींनी धैर्याने आणि शास्त्रीय पद्धतीने केला. ह्या प्रकारच्या हिंदी परिस्थितीची योग्य मुरड घातलेल्या शास्त्रास त्यांनी 'भारतीय अर्थशास्त्र' हे नाव दिले. अर्थशास्त्राच्या जुन्या परंपरेत वाढलेल्या, संकुचित दृष्टीच्या व मर्यादित ज्ञानावर संतुष्ट असलेल्या युरोपियन व हिंदी पंडितांनी त्यास नाके मुरडण्यासही कमी केले नाही. परंतु अर्थशास्त्र हे भौतिक किंवा व्यक्तिव्यवहाशास्त्र नसून सामाजिकशास्त्र आहे आणि त्याचे सिद्धांत स्थल-कालाबाधित नाहीत हे तत्त्व आता विद्वानांस सर्वत्र पटले आहे. जगात आज एकाही महत्त्वाच्या राष्ट्रात जुन्या छापाचे इंग्लिश अर्थशास्त्र मानले जात नसून प्रत्यक्ष इंग्लंडमध्ये त्यास मुरड घातली जात आहे. कालाचा ओघ व लोकमताची टोचणी ह्यांचा हिंदुस्थान सरकारवरही इष्ट परिणाम झालेला असून कित्येक देशी धंद्यांस मिळालेले जकातीचे संरक्षण हे ह्या विचारपरिवर्तनाचे दृश्य फळ आहे. एखादी गोष्ट नित्य परिचयाची झाली असता तिचे विशेष महत्त्व आपणास वाटत नाही. पण ज्या तीव्र बुद्धीच्या व दूरदृष्टीच्या महात्म्याने प्रतिकूल वातावरणात 'भारतीय अर्थशास्त्रा'ची कल्पना प्रथम लोकांपुढे मांडली, त्याचे साभार कौतुक जितके करावे तितके थोडेच आहे. सरकारास आणि स्वदेशबांधवास अप्रिय परंतु पथ्य असा उपदेश करण्याची न्यायमूर्तींची हातोटी विलक्षण होती. इंग्रजी अर्थशास्त्राचे अनियमित व्यक्तिस्वातंत्र्य, बेछूट स्पर्धा व राज्यकर्त्यांचा तटस्थपणा ह्यांपासून निघून आम्ही पन्नास वर्षांनंतर आता सरकारने अमलात आणावयाच्या आर्थिक योजनांची मजल गाठली आहे ही एकच गोष्ट त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची, दूरदर्शित्वाची व बहुमोल राष्ट्रीय कामगिरीची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे.

अर्थ १६-१-१९३५

[ स्थापना १९२१ ]

# गरगट्टी अँड सन्स

फोन नं. ११६ ] शहापूर-बेळगाव [ तार : मास इस्त्री

धोबी, फॅमिली व शिंपी पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देशबांधवांस हे वर्ष सुखाचे जावो !

# भारताचे अग्रेसर अर्थशास्त्रज्ञ : आमचे दादा

(सौ. गंगूताई कोकिळ, बी. ए., बी. टी; सेवानिवृत्त मुख्याध्यापिका, महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर ).

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे, ख्यातनाम विद्वान अर्थशास्त्रज्ञ, पुण्याचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते, माझे परमपूज्य वडील, प्रा. वामन गोविंद काळे, ऊर्फ दादा, रविवारी २७ जानेवारी, १९४६ ला सकाळी सव्वादहास दिवंगत झाले व आम्हा कुटुंबियांबरोबरच अखिल भारत एका महान कर्मयोग्यास कायमचा मुकला! भारी नोटांच्या वटहुकमासंबंधी, 'अर्थ' साप्ताहिकातील लेखाविषयी, व बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या वार्षिक वृत्तान्ताच्या मसुद्याविषयी चर्चा करीत करीत लेखणी व देह अखेरचा खाली ठेवला. हिंदी तत्त्वज्ञान व हिंदी अर्थशास्त्र, आणि जर्मन तत्त्वज्ञान व जर्मन अर्थशास्त्र, या विषयावर तुलनात्मक ग्रंथ लिहिण्याची त्यांची फार इच्छा होती, व तशी तयारीही त्यांनी केली होती. त्याचप्रमाणे पेशवेकालीन बँकिंगचा व्यवसाय हा ग्रंथही लिहावयाचा राहिला. त्यांच्या या दोन इच्छा अकल्पित होणाऱ्या शक्तिपातामुळे अपुऱ्या राहिल्या. त्याबद्दल त्यांना अखेरपर्यंत हळहळ वाटत होती. "मला जगण्याची फार इच्छा आहे, पण शरीर थकत चालले आहे, त्याला माझा नाइलाज आहे" हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकून आम्हांला फार दुःख होई.



दादांच्या मृत्यूची ही दुःखद वार्ता वणव्यासारखी अष्ट दिशांना पसरली व आमच्याप्रमाणेच सारे राष्ट्र शोकसागरात बुडून गेले. असंख्य चहात्यांच्या व संस्थांच्या दुखवट्याच्या संदेशांचा आमच्यावर कृपावर्षाव होऊ लागला व नेहमी आश्रमाप्रमाणे गंभीर व शांत दिसणारा दादांचा 'दुर्गाधिवास' बंगला, दुःखित व जड अंतःकरणांच्या स्नेह्यांनी भरून गेला व सर्व बंगला व भोवतालची बाग निष्प्राण दिसू लागली. रात्रंदिवस ज्या स्वतःच्या ग्रंथालयात बसून आमरण अर्थशास्त्र विषयाचा सतत व्यासंग केला, ती ग्रंथालयातील हजारो पुस्तके थिजल्यासारखी दिसू लागली. एखाद्या पवित्र देवालयातील देवाची मूर्ती हलवून न्यावी, तशी अवस्था व कळा आमच्या बंगल्यास आली. सतत अकरा वर्षे चालविलेला 'अर्थ' साप्ताहिकाचा अंक, मुंबईस टाटा हॉस्पिटलमध्ये २३ जून १९४३ ला कॅन्सरसारख्या दुर्धर रोगावरील ऑपरेशनच्या वेळी देखील बंद पडू दिला नाही व ऑपरेशनपूर्वी दोनच दिवस आधी त्यांनी 'अर्था'करिता लेख लिहिले व जन्मापासून मरणाच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कर्मयोग आचरला! त्याच ध्येयाने प्रेरित होऊन, पितृविरहाचे दुःसह दुःख मागे सारून, दादांच्यावरील मृत्युलेख लिहिण्याचे, व अर्थावरील सहानुभूती व आपुलकी कायम ठेवण्याविषयी जनतेस विनंती करण्याचे अत्यंत अवघड कार्य माझ्या बंधूस, श्रीपादला, करावे लागले व ते त्याने दादांना अभिमान वाटण्याजोग्या पद्धतीप्रमाणे उत्कृष्टपणे पार पाडले.

शस्त्रक्रियेनंतर विश्रांतीसाठी पन्हाळ्यावर रा. सा. व्ही. टी. पाटलांच्या बंगल्यात राहात असताना, दादांनी आपल्या गत आयुष्यातील पुष्कळ घटना मला सांगितल्या; किंबहुना त्यांचे चरित्र त्याच वेळी मी लिहावयास घेतलेही. त्याचा थोडा भाग लिहूनही झाला होता, पण त्यानंतर ते तसेच राहिले. इतकी प्रकृती क्षीण होत असताना, त्यांच्या मनाचा उत्साह इतका दुर्दम्य होता व ते आम्हांला उत्तेजन देत की दादा आणखी चार-पाच वर्षे सहज आम्हांला लाभतील, त्यांचे चरित्र पुढे पुरे करू, ही आशा अखेर वेडीच ठरली.

माझे आजोबा, दादांचे वडील, गोविंद-भटजी ऊर्फ बाबा भिक्षुक होते; पण स्वाभिमानी होते. तासगावहून घरात भांडण झाल्यामुळे नेसत्या वस्त्रानिशी ते बाहेर पडले व पुण्यास आले. त्यांनी आपला जन्म गरिबीत काढला पण कोणाचे पैसेही कर्ज काढले नाही अगर कोणाचे देणे ठेवले नाही. ते साध्या, निर्मळ आचाराने व गोड स्वभावामुळे सर्वांना हवेहवेसे वाटत. वाड्यातली सारी मुले तर खाऊकरिता सदैव त्यांच्या मागे लागत. मरताना त्यांनी दादा-काकांना 'मी तुम्हांला इस्टेट ठेवली नाही खरी; पण कुणाचं कर्जही ठेवलं नाही. तुम्हीही असंच वागा.' असा उपदेश केला. ते स्वतः भिक्षुकीवर प्रपंच चालवीत; पण दादा-काकांना त्यांनी कधी भिक्षुकी करू दिली नाही. ते कधी त्यांच्या शिक्षणाच्याही आड आले नाहीत. गरिबीत दुःख न मानता, समाधानाने, कोणाचाही मत्सर न करता, अभिमानाने दिवस काढण्याचे शिक्षण, दादा-काकांना त्यांच्या वडिलांपासून मिळाले व कोणत्याही परिस्थितीत आयापेक्षा कमी खर्च करण्याचा व कोणाकडूनही उसनवारी न करण्याचा धडा आमच्या घराण्याला लागला.

माझी आजी, दादांची आई, दुर्गाबाई काळे ऊर्फ ताई ही फार करारी, धाडशी, दृढनिश्चयी, अत्यंत परोपकार बुद्धीची, निःस्पृह व लोकसंग्रह करणारी होती. तिने नात्याच्या माणसांखेरीज कितीतरी इतर घराणी जोडली होती व त्यांना हरघडी मदत करून त्यांना आपलेसे केले होते! "कामाचे ते सामाचे" ही तिची आवडती म्हण तिच्या कृतीत पावलोपावली

दिसे. ती तिच्या काळच्या स्त्रियांत पुढारलेल्या मतांची होती व ती आपल्या कर्तृत्वाने असामान्य गणली जात असे. दादा-काकांना ताईबद्दल नितान्त आदर असे. ताईही बाबांच्या मागोमाग तासगावाहून पुण्यास एकटी आली व तिने बाबांचा शोध काढून, पुण्यास प्रपंच थाटला. दादांचा जन्म सांगलीस १० एप्रिल, १८७६ रोजी झाला. ताईनेच पहिला श्रीगणेशा शिकवल्यावर, दादांचे मराठी शिक्षण पुण्यास झाले. न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे त्यांचे हायस्कूलचे शिक्षण झाले. घरात खाय-प्यायला जरी कमी नसले, तरी गरिबीमुळे दादांना स्वतःचे व काकांचे शिक्षण शिकवण्या, नादारी, यांच्या साह्यामुळे करावे लागले. मात्र दादांच्यावर घरची यत्किंचितही जबाबदारी, ताईने पडू दिली नाही. पहाटेपासून सारे कष्ट करून, दादा-काकांच्या कशातही तिने कमी पडू दिले नाही. दादा-काकांच्यात शिस्त, संयम व काटकसरीपणा ताईमुळे आला.

दादांना मॅट्रिकमध्ये असताना, प्लेग झाला व त्यांच्या मूळच्या अशक्त प्रकृतीस फार मोठा धक्का बसला! मोठ्या मिनतवारीने मॅट्रिकचा फॉर्म भरण्याकरिता त्यांनी १२ रुपये पोस्टात टाकले होते. पुढल्या वर्षी ते परीक्षेस बसून पास झाले. त्यांचा विवाह वयाच्या एकोणिसाव्या वर्षी कु. मथुताई राजवाडेशी झाला. तिचे वडील भास्करभाऊ राजवाडे माढे येथे कारकून होते. वहिनीने (सौ. सावित्रीबाई काळे) लग्न झाल्यापासून अव्याहत पन्नास वर्षे दादांची सतीसारखी एकनिष्ठेने सेवा केली. प्रपंच व दादांची सर्व व्यवस्था यांत त्या माउलीने सारा जन्म घालविला. दादांचे नियमबद्ध व शिस्तीचे जीवन अखेरपर्यंत चालण्यात वहिनीची निरलस व वक्तशीर वागणूक कारणीभूत आहेत. स्वतःची दुखणी बाजूस सारून पहाटे पाचपासून रात्री अकरापर्यंत सारे व्यवहार पन्नास वर्षे घड्याळासारखे चालविण्यात तिची धन्यता वाटते. घरात दहा, दहा तऱ्हेची माणसे संभाळून नेऊन, शांतपणे, अंगी कमीपणा पत्करून, अहोरात्र गरिबीशी झगडून पतीच्या कार्यात अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या वहिनीसारख्या स्त्रिया आता थोड्या आढळतील. प्रपंचाची एकी राखण्यात तिने फार मोठा स्वार्थत्याग केला. दादांचे कॉलेजचे शिक्षण पुण्याच्या फर्गुसन कॉलेजात झाले. अर्थशास्त्र हा विषय घेऊन ते एम्. ए. झाले. एक वर्ष ते कॉलेजचे फेलो होते.

दादांच्या लहानपणी त्यांचे बिऱ्हाड न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या वाड्यात होते. साहजिकच ताईंच्या त्यांच्या घरी जाण्यायेण्यामुळे दादांचा रानड्यांशी परिचय झाला. दादांची अभ्यासू व कष्टाळू वृत्ती, ज्ञानलालसा इत्यादी गुणांमुळे रानड्यांनी त्यांची आपला 'रीडर' म्हणून योजना केली. स्वतःचा अभ्यास, शिकवण्या व शिक्षण संभाळून सांजसकाळ कित्येक वर्षे त्यांनी रीडरचे काम चोख रीतीने केले. 'माझ्या घरात इतके विद्यार्थी आज आहेत. पण एकटा वामन माझे नाव राखील,' असे न्या. रानडे वरचेवर म्हणत असल्याचे काका आम्हांला सांगत. अर्थ-शास्त्राचा सखोल, सांगोपांग अभ्यास करण्याची दृष्टी व महत्त्वाकांक्षा त्यांच्यापासून दादांना लाभली व तेव्हापासून त्यांनी आपल्यापुढे, राष्ट्राची आर्थिक उन्नती करण्याचा ध्येयवाद ठेवला व त्या ध्येयाकडे पोचायला लागणारी मुळातच असलेली चिकाटी, मनाचा निश्चय, संयमी वृत्ती व अखंड अभ्यासूपणा त्यांच्यात वाढीस लागला. रानड्यांकडे येणारे अनेक विद्वान व कार्यकर्ते पुढारी, रानड्यांशी जो विचारविनिमय करीत, त्याचा फायदा दादांना मिळाला. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचाही परिचय व ध्येयवाद दादांना मार्गदर्शक झाला. दादा १९०५ साली एम.ए. झाल्यावर, ना. गोखले यांनी त्यांना आपल्या भारत सेवक समाजाचे आजीव सभासद होण्याविषयी फार आग्रह केला. "आपल्यामागे प्रपंचाच्या मोठ्या जबाबदाऱ्या असल्याने इतका स्वार्थत्याग मला करता येणार नाही" असे दादांनी सांगितले. परंतु ते १९०७ सालापासून डे. ए. सोसायटीचे आजीव सभासद झाले.

इंग्लिश, इतिहास, राजकारण व अर्थशास्त्र या विषयांचे ते प्राध्यापक होते. आदर्श व आदरणीय प्राध्यापक म्हणून कुणालाही हेवा वाटावा इतकी उज्ज्वल कीर्ती त्यांनी संपादन केली. त्यांची ज्ञानलालसा विद्यार्थीदशा संपल्याबरोबर कमी न होता उत्तरोत्तर आमरण ती वाढतच गेली व प्रोफेसर म्हणून काम करीत असता अहोरात्र अध्ययन, अध्यापन व लेखन चालू असे. त्यांचे इंग्लिश भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्याजोगे असे. त्यांची व्याख्याने ऐकण्यास, त्यांच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांबरोबर इतर वर्गातील विद्यार्थ्यांचीही मोठी गर्दी असे. कॉलेजच्या वेळाव्यतिरिक्त राजकारणात पडलेली कित्येक मंडळी, दादांच्याकडे अर्थशास्त्राचे व राजकारणाचे धडे घेण्यास नियमित येत असत व दादा त्यांना मार्गदर्शन करीत. ते आपल्या विषयाचे सखोल ज्ञान अद्ययावत ठेवत असल्याने, तो विषय अत्यंत सुलभ व मनोरंजक रीतीने सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. व्याख्यानातून सरकारच्या धोरणावर विनोदगर्भ टीका करण्याचा त्यांचा हातखंडा होता. अखेरपर्यंत, वर्गावर जाण्यापूर्वी त्या दिवशीचा आपला विषय वाचून जाण्याची त्यांची संवय अनुकरणीय होती.

प्राध्यापकाच्या कामाव्यतिरिक्त दादांनी इतर खूपच व्याप आपल्यामागे स्वखुषीने लावून घेतले होते. ते फर्गुसन कॉलेज जिमखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट व वसतिगृहाचे रेक्टर म्हणून कित्येक वर्षे काम करीत असत. स्वतः ते कृतीने खेळाडू व क्रिकेट, टेनिस हे खेळ कौशल्याने खेळणारे असल्याने विद्यार्थ्यांचा खेळातील दर्जाही उच्च प्रकारचा राहिला. ते स्वतः कॉलेजच्या संघाचे कप्तान होते व त्यांनी कॉलेजकरिता नॉर्थकोट शील्डही जिंकले होते. लॉर्ड विलिंग्डन यांच्या संघाविरुद्ध खेळत असताना त्यांनी विलिंग्डन साहेबांचा त्रिफळा उडविला होता. ते एक उत्कृष्ट गोलंदाज होते.

कॉलेज वसतिगृहाचे रेक्टर म्हणून काम करीत असताना, ते वसतिगृहांना अचानक भेटी देत त्या वेळी विद्यार्थ्यांची विलक्षण तारांबळ उडे. त्या वेळच्या विद्यार्थ्यांना प्राध्यापकांविषयी किती नितांत आदर असे, ते दादांच्यावरून पाहावयास मिळे. आपली बाजू बिनतोड मांडता यावी म्हणून निरनिराळ्या विभागांच्या सेक्रेटरीच्या खासगी बैठकी भरत व 'सर'नी अमुक एक प्रश्न टाकला, तर त्याला काय उत्तर द्यायचे याचा खल चाले. विद्यार्थ्यांना वादविवाद करून आपला पक्ष जिंकण्याचे शिक्षणच दादा देत असत. त्या वेळच्या विद्यार्थ्यांना कॉलेज व कॉलेज-जीवन हेच सर्वस्व वाटत असल्याने ते कॉलजजीवनाशी सर्वथा समरस होत. दादांनीच कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे पार्लमेंट स्थापिले. पार्लमेंटच्या बैठकीतून प्रचलित राजकारण व समाजकारण यावर सडाजंगी वाद होत. दादा त्यांत योग्य मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षण देत.

पार्लमेंटखेरीज फर्ग्युसन कॉलेजचे नियतकालिकही दादांनीच सुरू केले व त्याचे ते आद्य संपादक होते. विद्यार्थ्यांनी इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचा खोल अभ्यास करावा व त्याचा प्रत्यक्ष उपयोग समाजास व्यापार व औद्योगिक उन्नतीकरता व्हावा म्हणून त्यांनी हिस्टरी अँड इकॉनॉमिक्स संस्था स्थापन केली. त्या संस्थेमार्फत दर आठवड्याला विद्यार्थी अभ्यास करून एक एक विषयावर प्रबंध वाचीत, त्यावर चर्चा होई व शेवटी अध्यक्षांचा समारोप होई. अर्थशास्त्र हा विषय चालू घडामोडींशी सतत संबंध आणणारा असल्याने धकाधकीच्या मामल्यात व व राजकारणात अगर अन्य क्षेत्रांत सक्रिय भाग घेऊ इच्छिणारे अभ्यासू विद्यार्थी हा विषय बी. ए., एम्. ए. ला ऐच्छिक म्हणून घेत असत. त्यांचे हजारो विद्यार्थी अखिल भारतात विखुरलेले असून दादांनी विद्यार्थिदशेपासून पाजळलेली ज्ञानज्योती हाती घेऊन आपापल्या ठिकाणी कार्य करून मान्यता पावले आहेत. दादांनी उघडलेल्या ह्या ज्ञानसत्राच्या असंख्य शाखा त्यांच्या सच्छिष्यांनी अनेक प्रांतांत उघडल्या आहेत. प्राध्यापक, रेक्टर, जिमखान्याचे व्हाइस प्रेसिडेंट, कॉलेज मॅगेझीनचे संपादक, पार्लमेंटचे स्पीकर, इतिहास व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष वगैरे कामे संभाळून तीन वर्षे त्यांनी डे. ए. सोसायटीच्या सेक्रेटरीचेही काम केले.

सरदार भाऊसाहेब विंचूरकर, श्री. अण्णासाहेब भोपटकर, श्री. विठ्ठलराव बर्वे, वगैरे मित्रांच्या साह्याने दादांनी पुण्याच्या पी. वाय. सी. हिंदु जिमखान्याची प्राणप्रतिष्ठा केली व तो वाढीला लावण्यास ते फार झटले. ते नियमाने रोज सायंकाळी जिमखान्यात जात. क्रीडा व बुद्धिबळ खेळणे त्यांना आवडे व त्यात त्यांनी कुशलताही मिळवली होती. क्रिकेट, टेनिस व इतर खेळ यांना त्यांच्या आयुष्यात दुय्यम स्थान होते. करमणूक, व्यायाम व आरोग्य राखण्याकरिता खेळ ही साधने आहेत अशा मनाचे ते होते. १९१९ सालापासून पाच वर्षे दादा मुंबई विद्यापीठाचे फेलो होते. अविश्रांत उद्योग, कुशाग्र बुद्धी, समाजहिततत्परता, इत्यादी गुणांमुळे अर्थशास्त्राच्या अभ्यासावर व अध्यापनावरच संतुष्ट न राहता त्यांनी स्वदेशी व परदेशी नियतकालिकांतून त्या त्या वेळी उद्भवणाऱ्या आर्थिक प्रश्नांवर लेख लिहिले. ज्ञानप्रकाश-सर्व्हंट्स् ऑफ इंडिया - सोसायटी क्रॉनिकल, गुजराथी, वगैरे पत्रांत त्यांचे लेख वक्तशीर येत. मुंबईच्या क्रॉनिकलला अग्रलेख आणि गुजराथीला स्फुटे ते पुण्याहून दर आठवड्यास ठराविक दिवशी पाठवीत असत. सरकारी धोरणावर टीका करण्यात ते मागे घेत नसत. सतत दहा वर्षे परिश्रम करून, त्यांनी इंग्लिशमध्ये इंडियन इकॉनॉमिक्स, हिंदी अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहिला. प्रौढ नागरिक व मुत्सद्द्यांनाही तो उपयोगी पडला आहे. याच प्रसंगाने दादांनी शेवटच्या घटकेपर्यंत केलेल्या ग्रंथरचनेची यादी उद्धृत करणे अप्रस्तुत होणार नाही. या सर्व पुस्तकांच्या अक्षरशः हजारो पानांचा मजकूर त्यांनी स्वतः लिहिला हे आश्चर्यकारक आहे. (1) Indian Economics, (2) Indian Administration, (3) Indian Industrial and Economic Problems (4) Dawn of Modern Finance in India, (5) Gokhale and Economic Reforms, (6) India's War Finance, (7) Currency Reform in India, (8) Constitutional Reforms in India, (9) Problems of World Economy, (10) Economics of Protection in India, (११) भारतीय अर्थशास्त्र, (१२) बँका आणि त्यांचे व्यवहार, (१३) व्यापारी उलाढाली, (१४) हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक, (१५) सहकार, इत्यादी बहुमोल ग्रंथ त्यांनी लिहिले असून, 'अर्थमाले'च्या द्वारा सामान्य जनतेस व्यापार, हुंडणावळ, विमा कंपन्यांचे व्यवहार, बँकांचे व्यवहार व इतर प्रचलित विषय सुलभ रीतीने समजावे म्हणून ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा त्यांचा महोदय होता. आर्थिक व व्यापारी घडामोडींना वाहिलेले 'अर्थ' नावाचे साप्ताहिक त्यांनी अकरा वर्षे संपादिले. त्याकरता पहिली नऊ वर्षे त्यांनी आर्थिक हानीही सोसली आहे; परंतु जनतेस अर्थशास्त्राचे महत्त्व पटविण्याची उच्च तत्त्वनिष्ठा त्यांनी आमरण दृढ दिली नाही. इंग्रजीतील अर्थशास्त्रविषयक ग्रंथ वाचूनच त्यांची जिज्ञासा अतृप्त राहिल्यानेच की काय, उतारवयातही त्यांनी जर्मन व फ्रेंच या दोन भाषांचा अभ्यास करून, त्या भाषेतील अर्थ-विषयक वाङ्मय अभ्यासले. जर्मन शास्त्रीय मासिकांतून लेखही लिहिले. जर्मन अर्थशास्त्र व हिंदी अर्थशास्त्र यात बरेच साम्य असल्याचे ते सांगत. मधून मधून पाल्हाद म्हणून 'विक्षिप्तरावां'-सारखी प्रहसने त्यांनी लिहिली. चार्ल्स डिकन्सच्या पिकविक् पेपर्सचे विनोदी रूपांतर थोडे प्रसिद्धही झाले होते.

त्यांच्या या गाढ व्यासंगाचे फळ म्हणूनच कॉलेजात प्रोफेसर असता १९२१ साली ते मध्यवर्ती वरिष्ठ मंडळाचे (कौन्सिल ऑफ स्टेट) सभासद निवडून आले. अंदाजपत्रक, हुंडणावळी व इतर आर्थिक प्रश्नांवर अधिकारवाणीने सडेतोडपणे विचार प्रकट करणारे म्हणून ते प्रसिद्ध झाले. विधिमंडळात लोकांचे

प्रतिनिधी म्हणून त्यांनी मोठी कीर्ती संपादन केली व त्यामुळेच सन १९२३ ते १९२६ पर्यंत सरकारने नेमलेल्या टॅरिफ् बोर्डाचे सभासद झाले. त्यांच्या प्रयत्नाने लोखंड, पोलाद, कागद, सीमेंट, साखर इत्यादी धंद्यांना जरूर ते संरक्षण व इतर साह्य मिळाले. १९२९ साली म्हैसुरास भरलेल्या अखिल भारतीय आर्थिक परिषदेचे अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला व इतर हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या साहाय्याने त्यांनी तिचे अर्थशास्त्रज्ञ व अभ्यासकांची पक्षभेदातीत परिषद हे स्वरूप कायम राखले. महाराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञांना जे मानाचे स्थान होते, त्याच्या श्रेयाचा फार मोठा हिस्सा दादांच्याकडे आहे.

इतके प्रचंड कार्य करून सेवानिवृत्त झाल्यावरही दादांनी प्रत्यक्ष औद्योगिक देशसेवेचे कंकण बांधले. स्वतःच्या कष्टाने, दारिद्र्याशी व प्रतिकूल परिस्थितीशी झगडून विद्यार्जन केल्यावर, अंगीकृत विषयाच्या गाढ्या अभ्यासाने शेकडो शिष्य नावारूपाला आणल्यानंतर आपल्या कार्याचे क्षेत्र कॉलेजपुरते मर्यादित न ठेवता अखिल भारत हे विस्तृत क्षेत्र ठेवले. हिंदी अर्थशास्त्र या विषयाचा दर्जा, साम्राज्य सरकारशी एकाकी झगडून, आंतरराष्ट्रीय मानाचा केला. हिंदुस्थानची व्यापार व उद्योगधंदे यांबद्दलची उदासीनता, न्या. रानडे व ना. गोखले या युगपुरुषांनंतर, त्यांच्याच ध्येयाने प्रेरित झालेल्या दादांनी 'अर्थ एव प्रधानः अर्थमूलौ धर्मकामौ,' हे ध्येय सर्व समाजाच्या पुढे ठेविले. हिंदी अर्थशास्त्र हे स्वतंत्र अर्थशास्त्र आहे, हे सरकार व जनता यांना पटवून या विषयाचे विश्वविद्यालयातून महत्त्व वाढविले व अर्थशास्त्र हा विषय विद्यापीठाच्या परीक्षांना ऐच्छिक विषय म्हणून ठेववला. स्वसंपादित ज्ञानाच्या व अनुभवाच्या जोरावर स्वतः तयार केलेल्या शिष्यवृंदाच्या साह्याने त्यांनी महाराष्ट्राच्या व्यापारी व औद्योगिक जीवनाला योग्य वळण लावण्याकरता शरीराचा व बुद्धीचा कणन् कण असेपर्यंत झिजवला इतकेच नव्हे तर हजारो रुपये दिले. सेवानिवृत्तीनंतर देखील फर्ग्युसन कॉलेजात एम्. ए. च्या विद्यार्थ्यांपुढे व्याख्याने दिली. हिंदुस्थानातील निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून प्रतिवर्षी व्याख्यानमाला गुंफल्या व निरनिराळ्या समाजापुढे, प्रसंगोपात्त अर्थशास्त्रविषयक सुलभ भाषेत व्याख्याने देऊन विषयाचे महत्त्व व गांभीर्य पटविले. त्यांनी या क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या कोणत्याही लहान-थोर व्यक्तीला अगर संस्थेला केव्हाच नाउमेद केले नाही. उलट, होईल ते साह्यच केले. सरकार व जनता या दोघांनाही निःस्पृहपणे स्पष्ट शब्दात योग्य मार्गदर्शन करणारे दादांसारखा कर्मवीर पुढारी विरळा !

दिवसानुदिवस दादांच्या कार्याचा व्याप खूपच वाढत गेला व १९२८ साली ते पुणे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर झाले व पुढे अध्यक्षही झाले. ते सहकारी संस्था स्थापण्यात व त्यांना आरंभापासून अखेरपर्यंत मार्गदर्शन करण्यात कंटाळा करीत नसत. १९२९ साली त्यांनी श्री. तात्यासाहेब केळकर प्रभृतींच्या साह्याने कॉमनवेल्थ विमा कंपनी स्थापन केली व ते तिचे संस्थापक व डायरेक्टर झाले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इण्डस्ट्रीज ही संस्था १९३४ साली स्थापन झाली. तिची पहिली तीन वर्षे ते कार्याध्यक्ष, चार वर्षे अध्यक्ष व अखेरपर्यंत सल्लागार होते. चेंबरच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रीयांत आधुनिक पद्धतीचा बँकिंगचा व्यवसाय यशस्वी करण्याचा विश्वास उत्पन्न व्हावा म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र लि. ही बँक १९३५ साली स्थापन झाली, तिचे ते अध्यक्ष व अखेरपर्यंत डायरेक्टर होते. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या साखरकारखान्याच्या संस्थापनेपासून ते डायरेक्टर होते व प्रारंभीच्या अडचणीच्या काळात तिला त्यांचे महत्त्वपूर्ण साह्य झाले. ते कित्येक वर्षे ग्वाल्हेर दरबारचे आर्थिक सल्लागार होते व ग्वाल्हेर टेक्स्टाइल लेबर इन्क्वायरी कमिशनचे अध्यक्ष या नात्याने कमिशनचा एकमताचा रिपोर्ट घडवून आणण्याचे अवघड व शीण देणारे काम, त्यांनी १९४४ अखेर पुरे केले. ईस्टर्न स्टेटस् एजन्सीमधील कोरिया संस्थानच्या आर्थिक पाहणीचे कामही त्यांनी केले. या शिवाय कित्येक संस्थानिकांना बँकिंग व इतर आर्थिक बाबीबद्दल वेळोवेळी सल्ला दिला. वरील कामागिरीशिवाय बँकिंग चौकशी समिती, अन्न सल्लागार समिती, खेडूत सुधारणा समिती, मुंबई सरकारची स्थानिक स्वराज्य चौकशी समिती, मुंबई इलाखा बँकिंग चौकशी इत्यादी समित्यांचे ते सभासद होते. सहकारी चळवळीचा पुरस्कार, जॉइंट स्टॉक बँकांना मदत, इन्शुरन्स कंपन्यांना साह्य, आदी कार्य अखंड चाले. त्यांनी खेडेगावांतील बहुजन समाजाशी निकट संबंध निर्माण केला व शेतकी सुधारणा व औद्योगिक सुधारणेस हातभार लावला. मजूर वर्गाच्या न्याय्य हक्कांकडे सहानुभूतीने पाहिले जावे म्हणून त्यांनी विशेष कसोशीने खटपट केली. अखेरच्या घटकेपर्यंत टेलिफोनवरून सल्ला ऐकण्यास असंख्य संस्था व व्यक्ती उत्सुक असत. दादांच्या या वरील व्यापाचे नुसते वर्णन वाचूनच आश्चर्य वाटेल व इतका व्याप त्यांनी कसा केला याबद्दल कुतूहल वाटेल.

दादांचे शिस्तीचे वागणे व नियमबद्ध जीवन ह्या त्यांच्या उत्कर्षसोपान चढण्याच्या पायऱ्या होत्या. विश्वविद्यालयाच्या शेवटच्या परीक्षांना बसणारे विद्यार्थी शेवटच्या महिन्यात ज्या एकनिष्ठेने, एकाग्रतेने व रात्रंदिवस अभ्यास करतात त्याच निष्ठेने व तळमळीने दादांनी शालेय जीवनापासून आमरण कष्ट केले. आयुष्यातला एकही क्षण त्यांनी वाया जाऊ दिला नाही. त्याबद्दल ते माणूसघाणे आहेत, बेपर्वाई आहेत, इत्यादी वाक्प्रहारही त्यांना सहन करावे लागत. पण त्यांनी आपली शांत चित्तवृत्ती विचलित होऊ दिली नाही. 'कोण काय म्हणते हे पाहात बसले तर हातून काहीच काम व्हायच नाही. कारण म्हणणारे लोक फार. तेव्हा आपल्याला योग्य वाटतं ते करून मोकळं व्हावं.' असे ते म्हणत. "युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।" ही गीतेची

शिकवण त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवली. आम्हाला त्यांनी 'अमुक करा, अमुक करू नका' असे आदेश कधीच केले नाहीत. त्यांचे डोळ्यांपुढील चारित्र्य हाच आदर्श असल्यावर बोलण्याचे कामच रहात नाहीं. ते अत्यंत शांत, निगर्वी व आनंदीवृत्तीचे होते. त्यामुळे घरात नेहमी शांत व पावित्र्य यांचे साम्राज्य असे. पहाटेपासून रात्रीपर्यंत सर्वांचा कार्यक्रम नियमबद्ध व सुटसुटीत चाले. परमेश्वराचे अस्तित्व न भासता वसावे तसे दादांचे अस्तित्व घरात असे. अडचणीच्या-वेळी परमेश्वरासारखी आम्हाला त्यांची आठवण व्हावी व त्यांनीही आपला सल्ला निस्पृहपणे स्पष्ट द्यावा; त्यात आमचे अंतिम कल्याण असायचे; पण त्या वेळी हे असे का म्हणतात ? असे वाटावे.

दुसऱ्याला बरे वाटावे म्हणून तोंडापुरते अर्धसत्य ते कधीच बोलत नसत. दिसायला व वागायला जरा खारटतुरट वाटले, तरी अंतःकरणाचे निर्मळ आहेत असा निर्वाळा तावडतोब मिळे. त्यांना मनातून स्वकीयांच्या सत्कृतीबद्दल प्रेम व कौतुक वाटे पण त्याचा उच्चार फारच संयमाने होई. उभ्या जन्मात केव्हाही कोणाही व्यक्तीबद्दल अगर संस्थेबद्दल त्यांनी आमच्याजवळ अनुदार शब्द उच्चारले नाहीत किंवा कुणाची निंदा केली नाही. त्यांच्या प्रसन्न वृत्तीमुळे जेवताना व इतर वेळी घरात आनंद भरलेला असे. स्वतः गरिबीत कष्टाने दिवस काढलेले असून देखील,त्यांच्या वृत्तीत कधी कडवटपणा आला नाही. गरीब विद्यार्थ्यांबद्दल त्यांना सहानुभूती वाटे व त्यांना फी, वाराने जेवण वगैरे बाबतीत मदत करीत. मात्र विद्यार्थी घरी ठेवून त्यांच्या-कडून हलकी कामे करून घेणे त्यांना पसंत नव्हते व तसे त्यांनी कधीच ठेवले नाहीत. त्यांनी स्वतःची मते कोणावर लादली नाहीत व कोणत्याच बाबतीत दुराग्रह धरला नाही. धर्म व देव यांवर त्यांची श्रद्धा असली, तरी त्यांच्या आचरणाने दुबळ्या मनास शक्ती येते म्हणून त्यांचा उपयोग आहे असे त्यांचे मत होते. आम्हाला त्यांनी विचार, उच्चार नि आचार यांचे पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. मात्र त्यातील अडचणी व धोका आगाऊ समजावून दिला जाई. एकदा एक गोष्ट आमच्यावर सोपवली म्हणजे तिच्या बरेवाईटपणाची जबाबदारीही आमच्यावर पडल्यामुळे त्यांच्या या अप्रत्यक्ष शिकवणीचा चारित्र्यवर्धनावर सुपरिणाम होई. त्यांना पैशाचा लोभ नव्हता; योग्य प्रकारे पैसा मिळेल तेवढा हवाच आहे; पण त्याबद्दल आसक्ती असू नये, असे त्यांचे मत असे.

ग्वाल्हेर संस्थानच्या महाराजांनी अनेक वेळा आमच्या बंगल्यावर येऊन, दादांना अर्थमंत्र्याचे पद स्वीकारण्याविषयी आग्रह धरला; परंतु महाराष्ट्राची सेवा हे ध्येय दादांनी डोळ्या-आड केले नाही व त्या विनंतीचा नम्रपणे अव्हेर केला. बनारस विश्वविद्यालयात येण्याविषयी पंडित मालवीयांनी दादांना अनेक वेळा घरी भेटून असाच आग्रह केला; पण तीही विनंती त्यांनी अमान्य केली. टॅरिफ बोर्डवरील महिना तीन हजार रुपये पगाराची मानाची जागा आपण होऊन त्यांनी सोडली.

संसार यशस्वी होणे हे नशीब व उद्योग यांवर अवलंबून आहे, असे दादा म्हणत. त्यांचे भाग्य अत्यंत थोर म्हणूनच अंगीकृत कार्यात त्यांना सुयश आले व उत्तम कीर्ती लाभली. सरकार व जनता या दोघांची निःस्पृहपणे केलेली दीर्घकालीन सेवा रुजू झाल्याचे दादांचे उदाहरण आहे. आपल्या आईच्या पुण्य-स्मरणार्थ, भांडारकर इन्स्टिटयूट कॉलनीत, डोंगराच्या पायथ्याशी त्यांनी 'दुर्गाधिवास' नावाचा बंगला बांधला. त्याच्या भोवतालचे भव्य वृक्ष व बाग आणि एकंदर शांत वातावरण दादांच्या धीरोदात्त स्वभावाची साक्ष देत असे. उत्तम हवेत राहण्याने आयुर्मान वाढते असे ते उदाहरणाने पटवीत व दीर्घायुष्य मिळाल्यास पुष्कळ कार्य करायला सापडते या दृढ विश्वासाने स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेत.

दादांच्या प्रचंड उद्योगात घरच्या कोणत्याही अडचणींनी अगर काळज्यांनी अडथळा आला नाही. त्याचे बरेचसे श्रेय अगोदर आमच्या आजीस, नंतर आई, नंतर काका श्री. चिंतामण गोविंद काळे, सी. आय. ई., चीफ इंजिनियर, मुंबई इलाखा यांना दिले पाहिजे. काकांचे बी. ए., बी. एससी., बी. ई. पर्यंतचे सर्व शिक्षण दादांनी केले. पण काकांनी नोकरीनिमित्त बाहेर जाईपर्यंत व जेव्हा घरी येतील तेव्हा दादांना घरातील कोणत्याही बाबतीत लक्ष घालण्याची जरूर काकांनी ठेवली नाही. घरातील सर्व गोष्टी ते स्वतः पाहात. आमचे शिक्षण, बाजारहाट, जमाखर्च, बागकाम आजाऱ्यांची शुश्रूषा, वगैरे हरएक बाबीत काका लक्ष पुरवीत असल्याने, दादांना अहोरात्र आपला व्यवसाय करता आला. वडील भावाकरता इतका आदर व कृतज्ञता भाव बाळगून, चिचे चीज करणारे व अखेरपर्यंत वडिलांसारखा मान देणारे भाऊ क्वचित आढळतात. दादांना काकांच्याबद्दल फार अभिमान वाटे. काका हे आमचे आराध्य दैवत असले तरी आम्हाला त्यांचा हेवा वाटे; अर्थात त्याच वेळी काकांची योग्यताच तितकी आहे, हे मनोमनी पटल्यासेरीज राहात नसे. दादांनी काकांच्या-सेरीज आपले दोन मामेभाऊ व दोन भाचे यांचे शिक्षण पदवी परीक्षेपर्यंत केले. त्याशिवाय जवळ-दूरच्या नातेवाइकांनीही घरी राहून काही काळ विद्याभ्यास केला. इतर कित्येक विद्या-र्थ्यांनाही दादांचे खूप साह्य झाले. 'मला सार्‍यांनी यश दिले त्याचा मला फार अभिमान वाटतो' असे उद्गार दादांनी काढले.

न्यायमूर्ती रानड्यांचे आपण शिष्य आहो म्हणून दादांना जसा अभिमान वाटे, तसाच अभिमान व प्रेम सुप्रसिद्ध सहकार-ग्रामोद्योगाचे निष्ठावंत कार्यकर्ते कै. वैकुंठभाई, यांना दादांबद्दल वाटे. त्यांना ते गुरुस्थानी मानत. दादांच्या उद्बोधक आठवणी सांगताना ते म्हणाले "शहाणा सल्लागार आणि गरजेच्या वेळी हमखास धीर देणारा किंवा सांत्वन करणारा, अशा थोरल्या भावासच मुकल्यासारखं मला वाटतं." सिद्धान्ताविषयी द्रोणस्पष्टे

अचूक शोधण्याच्या व त्यांकडे लक्ष देण्याच्या कामी ते सदैव जागरूक असत; तथापि त्यांचे तारतम्य इतके यथार्थ असे की किरकोळ बाबींवरील विवादात ते लक्ष घालीत नसत. पण तत्त्वाचा प्रश्न आला की ते पर्वतासारखे अढळ असत. मुंबई प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीवर आम्ही दोघे काम करीत होतो. अखेरच्या अहवालाची बांधणी झाली त्याचे बऱ्याच अंशी श्रेय प्रा. काळे ह्यांनी प्रत्येक शब्दाची काळजीपूर्वक छाननी केली आणि अहवालाचे सर्व भाग एकमेकांशी सुसंगत व्हावेत ह्याची दक्षता घेतली, ह्यासच दिले पाहिजे. ह्या वेळी कमिट्यांच्या कार्यपद्धतीबाबत मी जे धडे त्यांचेपासून शिकलो ते कधीही विसरणे शक्य नाही.

"प्रा. काळे ह्यांचा व माझा सुमारे १५ वर्षे अत्यंत निकटचा संबंध होता. त्या मुदतीत त्यांची इंग्रजी व मराठी भाषणे ऐकण्याची कितीतरी वेळा मला संधी मिळाली. त्यांनी इंग्रजीत केलेले बहुतेक सर्व लिखाण मी वाचले आहे. त्यांच्या सर्व लेखनात व भाषणात साधेपणा, स्पष्टपणा, सुबोधता आणि यथायोग्यपणा असावयाचा. सार्वजनिक कार्य ते समाजाचे सेवक या नात्यानेच नेहमी करीत. प्रसिद्धीची अपेक्षा त्यांनी कधीच धरली नाही; परंतु सेवा करण्याची संधी मिळाली तर प्रसंगोपात्त जागा विभूषित करण्याची त्यांनी टाळाटाळही केली नाही. प्रा. काळे यांच्या विषयी त्यांच्या विद्यार्थ्यांत किती पूज्य बुद्धी आणि प्रेम ह्यांची प्रेरणा झाली होती, त्याची मला माहिती आहे. तीस वर्षांहून अधिक काळ अशा विद्यार्थ्यांचे विचार व आयुष्य यास वळण लावण्याचे त्यांचे कार्य चालू होते. मी त्यांचा विद्यार्थी कधीच नव्हतो. कारण, ते मला नेहमी बरोबरीचा सहकारी व मित्र असेच मानीत असत. परंतु मी त्यांच्यापासून इतके शिकलो आहे आणि त्यांच्याशी वाढलेल्या मैत्रीचे मला इतके महत्त्व वाटते की गतकालाकडे वळून माझा व त्यांचा सहवास ह्याची आठवण करतो तेव्हा त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धी आणि ममता हे शब्द वापरण्यास मला संकोच वाटत नाही."

दादांशी समरस झालेल्या वैकुंठभाईंच्या जिव्हाळ्याचा आमच्यावर इतका परिणाम झाला होता की ते आम्हाला प्रेमळ वडील भावासारखे वाटत. वैकुंठभाई म्हणजे सुसंस्कृत, प्रेमळ व सात्त्विक भावांची मूर्ती होती. त्यांच्या सहवासातील बहुमोल क्षणांची स्मृती आमचा अमूल्य ठेवा आहे, आणि ही तो दादांचीच आम्हांला प्रत्यक्ष देणगी आहे.

दादांचे गुणवर्णन कितीही केले तरी ते अपुरे होईल. माझ्या तरी लेखणीत त्यांची योग्यता वर्णन करण्याचे सामर्थ्य नाही. अहर्निश ते आमच्याजवळ आहेत असा अद्यापही भास होतो.

○

नूतन वर्ष व दीपावली आमच्या असंख्य खातेदारांना, सभासदांना व हितचिंतकांना सुखाची व समृद्धीची जावो !

फोन नं. ४३७४

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(प्रधान कार्यालय – ३६९ दक्षिण कसबा, सोलापूर–२)

—: शाखा :—

(१) साखर पेठ, सोलापूर फोन नं. १९४१   (२) अक्कलकोट (जि. सोलापूर) फोन नं. ६२

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भाग भांडवल | १० लाख |
| (२) वसूल भाग भांडवल | ६ लाख |
| (३) रिझर्व्ह व इतर फंडस् | ८·११ लाख |
| (४) ठेवी. | ८४·६० लाख |
| (५) दिलेली कर्जे | ७०·३३ लाख |
| (६) खेळते भांडवल | १ कोटीच्या वर |
| (७) निव्वळ नफा | १·८१ लाख |
| (८) डिव्हिडंड १९७३-७४ | ९% |
| (९) ऑडिट वर्ग अ. | गेल्या ११ वर्षांपासून |

—: संचालक मंडळ :—

(१) श्री. ग. रा. वाळ्वी, चेअरमन
(२) ,, मा. ह. कोंतम, व्हाईस चेअरमन
(३) ,, ग. रा. खडकीकर, डायरेक्टर
(४) ,, ल. न. चिलवेरी ,,
(५) ,, बं. मा. शहा ,,
(६) ,, म. सा. साळुंके ,,
(७) ,, कृ. गो. जानकर ,,
(८) ,, वा. द. आराध्ये ,,
(९) ,, सि. आ. अच्युगटला ,,

कृ. ल. सिद्दम, मॅनेजर

# न्यायमूर्ती रानडे आणि प्राध्यापक काळे

## भारतीय अर्थशास्त्राच्या जनकाचे कार्य प्रभावीपणे पुढे चालविणारा क्रियाशील शिष्य

**(श्री. वा. काळे)**

स्वदेशी धंद्यांची अवनती, लोकांचे वाढते दारिद्र्य, देशात कायमचे ठाणे देऊन बसलेला दुष्काळ, शेतकरी वर्गाचा मनस्वी कर्जबाजारीपणा, त्याजवर पडणारा सरकारी कराचा भार व एकंदर समाजाची कुंचबण्याची प्रवृत्ती, ही सर्व संकटे परस्परांशी संलग्न असून ब्रिटिशांच्या राज्यसंस्थापनामुळे भारतात जे सर्वांगीण परिवर्तन झाले त्या एका गोष्टीपासूनच त्याचा उगम झाला आहे ही गोष्ट पहिल्या प्रथम न्यायमूर्ती रानडे ह्यांच्याच निदर्शनास आली. वास्तविकपणे देशातील प्रमुख धंदा शेतकी हा असणे, एकंदरीत अर्वाचीन औद्योगिक प्रगतीच्या मानाने लोक मागासलेले असणे व इंग्लंडच्या चढाओढीस टक्कर देण्याइतकी कुवत देशी कारागिरात नसणे, ह्या बाबतीत भारताचे जर्मनी व अमेरिका ह्या देशांच्या परिस्थितीशी पूर्ण साम्य होते. परंतु त्या त्या राष्ट्रातील विचारी पुरुष व राष्ट्रीय सरकार ह्यांनी इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांच्या स्वार्थी सिद्धांतांचा पोकळपणा वेळीच ओळखला आणि परदेशी व्यापारावर जरूर तेवढे नियंत्रण घालून व अनेक मार्गांनी देशी धंद्यास उत्तेजन देऊन आपले आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य अबाधित राखले. भारत मात्र परकी अमलाखाली असल्याने जे सिद्धांत व जे धोरण इंग्लंडला हितावह व इष्ट वाटत होते तेच भारत सरकारवर लादले जात असे. भारतातील विचारी लोक, सरकारचे अधिकारी आणि इंग्रज अर्थशास्त्रज्ञ व मुत्सद्दी ह्यांस वरील धोरणातील चूक कळून यावी ह्या उत्त हेतूने प्रेरित होऊन सन १८९२ साली न्या. रानडे ह्यांनी 'हिंदी अर्थशास्त्र' ह्या बाबाचा आपला प्रख्यात निबंध लिहिला. अर्थशास्त्राचे सिद्धान्त देशकालपरिस्थितीशी सापेक्ष असतात व सामुदायिक हितवर्धनार्थ स्वैर व्यक्तिस्वातंत्र्यास आळा घालणे समर्थनीय व इष्ट असते, ह्या दोन मुद्द्यांवर भर देऊन प्रस्तुत निबंध न्यायमूर्तींनी लिहिला आहे. खुल्या व्यापाराची 'उदारमतवादी' आर्थिक मते सोडून देऊन भारत सरकारने राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची विधायक जबाबदारी आपल्या अंगावर घेतली पाहिजे, हे येथील अधिकारी व इंग्लंडातील मुत्सद्दी ह्यांच्या मनावर बिंबविणे, हा न्यायमूर्तांचा प्रमुख उद्देश होता.

न्यायमूर्तींच्या मताचाच अनुवाद अगर परिपोष करणारे इतर विद्वान लोकही पुढे येऊ लागले; दादाभाई नौरोजी, वाच्छा, दत्त, जोशी, हे त्यांपैकीच होत. जर्मनीमध्ये १८४० च्या सुमारास लिस्ट ह्या प्रसिद्ध ग्रंथकाराने असे प्रतिपादन केले होते की आर्थिक प्रगती होण्यास राष्ट्रहिताकडे मुख्यतः लक्ष द्यावयास पाहिजे. खुला व्यापार अगर व्यक्तिस्वातंत्र्य ह्या तात्त्विक विचारांची कास धरून राष्ट्राच्या आर्थिक व राजकीय स्वातंत्र्यास मुकण्याचा वेडेपणा कुणी करू नये, असे तो प्रतिपादित असे. केवळ प्रत्येक व्यक्तीने आपापल्या परीने स्वतःचे सुख वाढविण्याचा प्रयत्न केला असता तेवढ्याने कार्यभाग होत नसून सर्व राष्ट्राचे आर्थिक हितही त्याने साधेल असे नाही; राष्ट्राच्या खऱ्या आर्थिक प्रगतीतच वैयक्तिक हिताचा अंतर्भाव होतो, हे लिस्टनेच पहिल्या प्रथम विशद करून दाखविले. स्वदेशी धंद्यास उत्तेजन देण्याकरिता किंवा इतर राष्ट्रांतील धंदेवाल्यांच्या स्पर्धेपासून त्यांचे संरक्षण करण्याकरिता परराष्ट्रीय व्यापारावर काही नियंत्रण टाकणे योग्य आहे ही गोष्ट लिस्टचा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून सर्वत्र मान्यता पावली आहे. भारताच्या आर्थिक एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उगम न्यायमूर्तींच्या द्रष्टेपणात आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणूनच, न्यायमूर्तींना भारतीय अर्थशास्त्राचे जनक म्हटले जाते.

न्यायमूर्ती रानड्यांच्या शिष्याने, प्रा. वा. गो. काळे ह्यांनी गुरूचे कार्य प्रभावीपणाने पुढे चालविले. हिंदी लोकांच्या सांपत्तिक व सामाजिक परिस्थितीचे परीक्षण करून, त्यांच्या राहणीचे मान वाढवून, त्यांचे जीवन अधिक सुखमय कोणत्या मार्गांनी होईल, हे ठरविणे हिंदी अर्थशास्त्राचे मुख्य कार्य होय. तथापि, आपल्या इकडील इंग्रजांचे अंधभक्त व आर्थिक साम्राज्याचे इंग्रज पुरस्कर्ते हे भारतातील कच्च्या मालाचा व वाढत्या बाजाराचा ब्रिटिश साम्राज्याकरिता म्हणजे मुख्यतः इंग्लंडकरिता उपयोग करून घेण्याच्या धोरणाचेच समर्थन करीत असत. अशा वेळी, भारताच्या आर्थिक परिस्थितीचे शास्त्रीय सिद्धांतांच्या साहाय्याने परीक्षण करून हिंदी लोकांच्या सर्वांगीण सांपत्तिक सुधारणेकरिता योग्य तो मार्ग निःस्पृहतेने व स्पष्टपणे दिग्दर्शित करणे आवश्यक होते. ही अवघड कामगिरी प्रा. काळे ह्यांनी चोख बजावली. "भारतीय अर्थशास्त्र" हा प्रचंड ग्रंथ त्यांनी लिहिला, तो भारतातील सर्व विद्यापीठांतून अभ्यासला जाऊ लागला; त्या ग्रंथाचा विस्तार होत जाऊन तो सर्वमान्य झाला. भारताच्या वेगवेगळ्या ठिकाणी अर्थशास्त्रज्ञ निर्माण झाले, ते ह्या ग्रंथाच्या अभ्यासानेच. बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांनी पुण्यातील एका भाषणात जाहीरपणेच सांगितले की आमच्या आर्थिक देशाभिमानाला प्रा. काळे ह्यांच्या भारतीय अर्थशास्त्राने प्रेरणा दिलेली आहे; आम्ही त्याचाच अभ्यास केलेला आहे. प्रा. काळे ह्यांनी भारतभर व्याख्याने दिली, असंख्य लेख लिहिले, दहा-बारा ग्रंथ लिहिले आणि "अर्थ एव

प्रधान:" ह्याची सर्वांना जाणीव करून दिली. अनेक विद्यापीठां तून त्यांनी व्याख्यानमाला गुंफल्या; जर्मन, फ्रेंच, इत्यादी भाषांतून त्यांच्या लिखाणांची भाषांतरे झाली; कित्येक युरोपीय विद्यापीठांच्या पीएच. डी. परीक्षांचे ते परीक्षक होते. अखिल भारतीय अर्थशास्त्र परिषदेचे तर ते धुरीण आणि प्राण होते. प्रा. धनंजयराव गाडगीळ, प्रा. द. गो. कर्वे, इत्यादींनी प्रा. काळे ह्यांची परंपरा पुढे चालविली.

जकातीच्या कमिशनने सुचविलेले विवेकनिष्ठ संरक्षणाचे धोरण भारत सरकारने मान्य करून टाटांच्या पोलादाच्या धंद्याने केलेली, आयात मालावरील संरक्षक जकातीची मागणी एका खास टॅरिफ बोर्डाकडे सोपविण्यात आली. ह्या टॅरिफ बोर्डाचे चेअरमन आणि सेक्रेटरी इंग्रज आय. सी. एस. अधिकारी होते आणि दोन सभासदांपैकी एक अर्थशास्त्रज्ञ नेमावयाचा होता. प्रा. बा. गो. काळे हे त्या पिढीचे अग्रगण्य अर्थशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांना हे सभासदत्व देण्यात आले. अशा रीतीने, न्यायमूर्ती रानडे ह्यांनी प्रतिपादन केलेले धोरण प्रत्यक्षात उतरविण्याचे कार्य त्यांच्या शिष्यास पार पाडता आले. पोलादाचा धंदा स्वसंरक्षणाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा असल्याने पोलादाच्या उत्पादनास सरकारने मदत करणे आवश्यक आहे असे टॅरिफ बोर्डाने ठरवून, संरक्षण द्यावयाचे ते पूर्णपणे परिणामकारक न झाल्यास गिऱ्हाईक व नागरिक ह्यांचा स्वार्थत्याग वाया जाईल, अशीही अगाऊ सूचना टॅरिफ बोर्डाने देऊन ठेवली. १९२४ च्या जून महिन्यात मध्यवर्ती कायदे-मंडळाची खास बैठक भरून त्यात ह्या शिफारशी अमलात आणणारा कायदा पास झाला. गंधक, कागद, सिमेंट, छापखान्याची शाई, मॅग्नेशियम क्लोराइड, इत्यादी उद्योगांनाही टॅरिफ बोर्डाने संरक्षक जकाती सुचवून त्यांची स्थिर पायावर उभारणी करण्यास मदत केली.

टॅरिफ बोर्डाचे अर्थशास्त्रज्ञ सभासद ह्या नात्याने प्रा. काळे ह्यांनी बजावलेली ही कामगिरी अज्ञातच असल्यामुळे तिचा येथे विस्ताराने उल्लेख केला आहे. टॅरिफ बोर्डावरील आपली मुदत संपण्यापूर्वीच, त्यांनी सभासदत्वाचा राजीनामा देऊन दरमहा ३,००० रु. वेतनाची मानाची जागा सोडून दिली आणि ते अंगीकृत कार्यास वाहून घेण्यासाठी पुन: रुजू झाले, हीसुद्धा एक असामान्यच घटना म्हणावी लागेल.

अर्थशास्त्रज्ञाच्या भूमिकेच्या पुढची भूमिकाही प्रा. काळे ह्यांनी स्वीकारली, ती म्हणजे महाराष्ट्रात नव्या उद्योगधंद्यांच्या प्रत्यक्ष स्थापनेची. त्याला आवश्यक अशी संघटना निर्माण करण्याकरिता मराठा चेंबरची स्थापना झाली. त्या चेंबरनेच बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या स्थापनेच्या बाबतीत पुढाकार घेतला; प्रा. काळे मराठा चेंबरचे, तसेच त्या बँकेचेही संस्थापक-चेअरमन होते. बँकेच्या स्थापनेपासून स्वत:च्या मृत्यूपर्यंत त्यांनी ह्या बँकेची जोपासना केली आणि तिच्या कारभाराला इष्ट असे वळण, कधीकधी विरोधाला न जुमानता लावले. त्याची फळे आज महाराष्ट्राला मिळत आहेत. बँकेचे ते चेअरमन असताना त्यांना रिझर्व्ह बँकेच्या संचालकाची जागा देऊ करण्यात आली होती पण त्यासाठी बँकेशी संबंध सोडावा लागला असता. ही गोष्ट प्रा. काळे ह्यांच्या सदसद्विवेकबुद्धीस पटली नाही; त्यांना आपल्या बँकेविषयी एवढी काळजी वाटत होती. ह्याच कारणासाठी कितीतरी मोठ्या जागा त्यांनी पत्करल्या नाहीत — उदाहरणार्थ, ग्वाल्हेर संस्थानचे अर्थमंत्रीपद, बनारस विद्यापीठाचे प्रो.—व्हा. चॅन्सलरपद, अन्नमलाई विद्यापीठाचे व्हा. चॅन्सलरपद, भारताचे बर्मामधील हायकमिशनरपद, इत्यादी. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. हे त्यांचे असेच मध्यमवर्गीयांना वरदान ठरलेले दुसरे अपत्य. ह्या कंपनीवर कित्येक गंडांतरे आली ती प्रा. काळे ह्यांच्या खंबीर भूमिकेमुळेच टळू शकली. आणखी कित्येक कंपन्यांना त्यांनी संचालक व अन्य मार्गे मार्गदर्शन केले; स्वत:चे पैसे गुंतविल्याखेरीज इतरांना शेअर्स घेण्याचे आवाहन त्यांनी कधीच केले नाही.

महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांना आर्थिक प्रगतीची गोडी लागून त्यांना त्यात भाग घेण्यास प्रवृत्त करण्याची प्रा. काळे ह्यांची कामगिरी फार मोलाची ठरली आहे. प्रा. काळे हे विश्वासु आणि ध्येयनिष्ठ मार्गदर्शक आणि मराठा चेंबरचे संस्थापक-कार्यवाह श्री. आ. रा. भट हे एक कुशल आणि कार्यक्षम संघटक; ह्या युतीचे सुपरिणाम आज आपण अनुभवीत आहोत. प्रा. काळे ह्यांचा सहकारी क्षेत्रातील कामगिरीचा प्रपंचही पुष्कळ मोठा होता; कै. वैकुंठभाई मेहता त्यांना त्या क्षेत्रात गुरुस्थानी मानीत असत, एवढे सांगितले म्हणजे पुरे आहे. दोघेही स्वार्थत्यागी, थोर मनाचे, कर्तव्यनिष्ठ, कार्यक्षम, प्रसिद्धिविन्मुख, साध्या राहणीचे, स्वदेशीचे अभिमानी असल्यामुळेच हा संयोग घडून आला. "अर्थ" साप्ताहिकाची स्थापना, हे प्रा. काळे ह्यांच्या अनेकविध कामगिरींचा केवळ एक भाग होय. त्यानेही आपला आर्थिक शिक्षणाचा आणि लोकजागृतीचा वाटा शक्य तेवढ्या क्षमतेने उचलला आहे.

# अर्थ, अर्थाचे संपादक आणि मी

( द. रा. कुलकर्णी, " अर्था "चे प्रतिनिधी )

सन १९३३ चा ऑगस्ट महिना. भर बारा वाजता, विश्रांती घेत असलेल्या, एका थोर माणसाच्या विश्रांतीमध्ये मी अडथळा आणला आणि तो म्हणजे माझ्या नोकरीकरिता. बंगल्यात जाताच वाघ्या नावाच्या कुत्र्याने माझे स्वागत करून, मालकांना परका माणूस आल्याची वर्दी दिली. दरवाजा उघडून एका तिशीच्या व्यक्तीने विचारपूस केली व वडिलांना ड्रायव्हरची नोकरी मागायला एक इसम आल्याची हकिकत सांगितली. मालक खाली आले; त्यांना ड्रायव्हर पाहिजे होता. त्यांनी सर्व विचारपूस करून, ओळखपत्र आणावयास सांगितले व मला १ तारखेस बोलाविले. ती तारीख २५ ऑगस्ट १९३३.

मी मिरज संस्थानचे अधिपती, श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांचे सेक्रेटरी श्री. दाजीसाहेब पटवर्धन यांचेकडून ओळखपत्र घेतले व १ सप्टेंबरला पुन्हा वरील बंगल्यात भीत भीत प्रवेश केला. दादासाहेबांनी मला दरमहा तीस रुपये पगार देतो असे सांगून लागलीच आपल्या पुतण्यास शाळेत पोचते करण्यास मला आणि माझ्या बरोबर जाण्यास आपले चिरंजीव श्रीपादराव यांना सांगितले. श्रीपादरावांना सांगण्याचा उद्देश, ड्रायव्हर मोटार कशी काय चालवितो हे पाहण्याकरिता. खुद्द मालक मला वेळेची जाणीव देत होते. वेळ सांभाळशील तर तुझी नोकरी टिकेल, असे खणखणीत शब्दात सांगून, मला सुट्टी दिली. संध्याकाळी पुणे सेंट्रल को. बँक, हल्लीची पुणे डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँकेत ५ वा. मिटिंगकरिता गेलो. रात्री ७-३० ला परत आलो. सकाळी ८-३० वाजता कामावर हजर होत असे. शाळेची वर्दी संपली की, ११-३० वाजता मला सुट्टी मिळे. दुपारी ४ वाजता येऊन गाडी काढून, भारत इतिहास, कॉमनवेल्थ, महाराष्ट्रीय मंडळ वगैरे ठिकाणी मिटिंग असत. तेथे जाऊन रात्री ७-३० ते ८ पर्यंत परत येत असू. असे पंधरा दिवस गेले. आपण ज्यांच्याकडे नोकरी करतो, त्यांचा व्यवसाय काय, योग्यता काय, वगैरे समजू लागले आणि खरोखरीच मला एकदम धक्का बसला की, आपण एका फार मोठ्या माणसाकडे नोकरीस असून ते अर्थशास्त्रज्ञ आहेत. मला या अर्थशास्त्राचा काही अर्थ कळला नाही. बंगल्यात राहणारी माणसे, त्यातून त्यांच्याकडे मोटार आहे, दोन माळी, एक आचारी, एक रखवालदार भय्या व मोटारड्रायव्हर, म्हणजे खूपच मोठे साहेब आहेत.

बर, साहेब म्हणावेत, तर अस्सल महाराष्ट्रीय कपडे घालतात, मग साहेब तरी कसे म्हणावे! दिवसभर, भेटण्यास येणाऱ्या मंडळीत, बहुतेक टांग्यातून व मोटारीतूनच, तसेच राजेरजवाडेही येत असत.

हा बंगला, शहरापासून बराच लांब आहे. तो भांडारकर रोडवर कॅनॉल लागतो त्याच्या उजव्या बाजूस असून बंगल्याचे नाव आहे "दुर्गाधिवास". यात राहणारे साहेब म्हणजेच, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, प्रोफेसर वामन गोविंद काळे तथा दादासाहेब हे होत.

दादासाहेबांनी १९३३-३४ सालात व त्याच्या अगोदर "अर्थशास्त्र" व "भारतीय अर्थशास्त्र" ही दोन पुस्तके मराठी मध्ये प्रसिद्ध केली होती. १९३३-३४ सालामध्ये लागोपाठ, "बँका आणि त्यांचे व्यवहार", "रिझर्व बँक", "सहकार," व "व्यापारी उलाढाली" पुस्तके काढून, को. सोसायट्यांना व सहकारी बँकेत काम करणाऱ्यांना त्यांचा फार मोठा उपयोग होऊ लागला. ही पुस्तके निघाल्यानंतर, दादासाहेबांशी जवळ जाऊन बोलण्याचा व काही विचारण्याचा संबंध येऊ लागला. मी ही पुस्तके घेऊन, शाळा, कॉलेजेस, इन्शुअरन्स कंपन्या व बँकांत जाऊन कमिशनवर विकत असे. माझा दिवस याच उद्योगात नोकरी करून घालवीत असे. पगाराव्यतिरिक्त, महिन्या काठी कमिशन म्हणून, आठ ते दहा रुपये मिळत असत.

१९३५ साली जानेवारीत अर्थ साप्ताहिक सुरू झाले. पहिल्या अंकापासूनच, मी अर्थ घरोघरी वर्गणीदारांना पोचवू लागलो. महिन्यातून चार व एकादेवेळी पाच अंकही निघत. नवीन जर वर्गणीदार केला तर मला कमिशन मिळे. त्या वेळी वार्षिक वर्गणी चार रुपये होती.

जाहिराती मिळविण्याकरिता कोणी तरी इसम असावा, म्हणून ज्ञानप्रकाशचे जाहिरात व्यवस्थापक म. य. दातार यांना दादासाहेब सहज बोलून गेले व ते मी ऐकले. परंतु या क्षेत्रात कोठे जावे, काय बोलावे, काय सांगावे, अशी माझ्या मनात घालमेल सुरू झाली. धाडस करावे म्हणून, पुणे सेंट्रल बँकेत गेलो. तेथील मॅनेजर श्री. डी. डी. चितळे यांना भेटलो. मला पाहताच दादासाहेब आले आहेत या कल्पनेने ते चटकन् खुर्चीतून उठले व कोठे आहेत साहेब म्हणून मला विचारले. त्यांची ती धांदल लक्षात घेऊन मी सांगितले की, साहेब आले नाहीत, मीच तुमच्याकडे आलो आहे. मग स्वारी हुश्श करून कोटटोपी काढून बसली. माझ्या येण्याचा उद्देश सांगताच ते म्हणाले एवढेच ना, मग हरकत नाही. त्यांनी विचार करून वर्षाची शंभर रुपयाची जाहिरात दिली. येथून माझ्या ह्या व्यवसायास प्रारंभ झाला.

पूना गेस्ट हाऊसचे मालक नानासाहेब सरपोतदार यांची भेट घेतली. त्यांनी मला अशी अट घातली की, प्रोफेसर काळे यांची

मला भेट घडवून द्या, म्हणजे मग माझ्या गेस्ट हाऊसची जाहिरात देईन. दादासाहेबांना सरपोतदारांचे म्हणणे सांगितले त्यांनी ते मान्य केले. एक दिवस टांगा करून, सरपोतदार आले. त्यांचे बोलणे इतके रंगले की, दिवेलागण झाली. सरपोतदार खुष झाले, त्यांना मोटारने पोचविण्यास मला सांगितले.

नानासाहेब सरपोतदारनी गेस्ट हाऊसमध्ये गेल्यानंतर मला वरती बोलाविले व डोळ्यांत आनंदाश्रू आणून सांगितले की, कुलकर्णी, मला आज धन्य केलेत. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी माझी ओळख झाली, मी साधा खानावळवाला असून मला साहेबांनी मोटारीतून पोचविले, केवढा त्यांचा मोठेपणा!

एका बुधवारी मी अर्थ टाकण्याकरिता शनवार पेठेमध्ये अण्णासाहेब वर्तक यांच्याकडे गेलो असताना, "काय हो, वामनराव आज भेटतील का" म्हणून मला विचारले. त्यांनी संध्याकाळी चार वाजता येतो असा निरोप दिला. याच दिवशी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटसंबंधी बोलणे झाले असावे. या वेळी चंद्रशेखर आगाशे, आ. रा. भट, पद्मजी व सोलापूरचे लिमये हजर होते.

१९३९ साली अर्थचा दिवाळी अंक काढण्याची विनंती मी दादासाहेबांना केली. ते हसून म्हणाले, "पाचशे रुपयांची हमी घेत असलास तर अंक काढू." मला जाहिरातींची खात्री असल्याने मी होय म्हणून सांगितले. दसऱ्यानंतर मी सांगलीस गेलो, तेथील सर्व बँकांच्या, व भिडे अँड सन्सची अशा चार जाहिराती व कोल्हापूर येथील शुगरमिल, को. बँका, वगैरेच्या जाहिराती मिळाल्या. मुंबई मी कधी पाहिली नव्हती पण धाडस करून गेलो व बेडेकर अँड सन्स यांची जाहिरात प्रथम मिळविली. सरदारगृहाचे मालक बाबूराव साळवेकर यांनी तर सबंध वर्षाची जाहिरात दिली, ती आजही चालू आहे.

या माझ्या जाहिराती मिळविण्यामध्ये एक मोठी शक्ती होती, ती म्हणजे, दादासाहेबांच्या नावाची. कोठेही गेलो व दादासाहेबांचे नाव घेतले व त्यांचे अर्थ साप्ताहिक म्हणून सांगितले की, पुढे जास्त बोलावयास लागत नसे. त्या दिवाळी अंकास सातशे रुपयांच्या जाहिराती मिळवून दिल्या. दादासाहेब खुष झाले व अर्थाचा जाहिरात प्रतिनिधी शोभतोस असे ते मला म्हणाले.

दादासाहेबांचे चिरंजीव हे सहसंपादक असल्याने त्यांच्याकडून ऑफिसमधील कामाची थोडी थोडी माहिती करून घेतली. त्यांनी प्रथम मी ज्यांच्या जाहिराती आणल्या त्यांची बिले करण्यास सांगितले. नंतर हळूहळू इतरही ऑफिसचे काम करू लागलो. मला खुर्चीवर बसण्याची सुरुवातीला लाज वाटत होती. एखादे वेळी अर्थच्या ऑफिसमध्ये दादासाहेब अचानक येत असत, त्या वेळी माझी धांदल उडत असे.

मी त्यांचा नोकर ड्रायव्हर म्हणून असल्याने, मला खुर्चीवर बसण्याचे धारिष्ट होत नसे. दादासाहेब आले की, चटकन उठून


ग्राहकांचे समाधान व समृद्धी हेच ध्येय मानणारी व त्यासाठी अविरत कार्यरत असणारी तुमची बँक

## सोलापूर जनता सहकारी बँक लि.,
७६ अ, गोल्डफिंच पेठ,
## सोलापूर

♠ आमच्या कोणत्याही शाखेस भेट द्या.

♠ आपल्या ठेवी आकर्षक उत्पन्न देणाऱ्या आमच्या ठेव-योजनांमध्ये गुंतवून अधिक फायदा मिळवा.

उद्धवराव कुलकर्णी — व्यवस्थापक
डॉ. प. गो. वळसंगकर — कार्याध्यक्ष

# सांगली अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली
(स्थापना १९३५)
मुख्य कार्यालय : हरभट रोड, सांगली.

♣ महाराष्ट्र राज्यातील नागरी बँकांतील अग्रणी बँक.
♣ सांगली जिल्ह्यात ९ शाखा आणि मराठवाड्यामध्ये बीड व परभणी.
♣ आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात.
♣ ठेवींवरील व्याजाचे दर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज— | द. सा. द. शे. ५.५ टक्के |
| मुदतठेव १ वर्ष— | ,, ,, ८.५ ,, |
| ३ वर्ष— | ,, ,, ९.५ ,, |
| ५ वर्ष— | ,, ,, १०.५ ,, |
| ६ वर्षांपेक्षा जास्त काळ | ,, ,, ११.० ,, |

मा. न. कालेकर (वकील) — कार्याध्यक्ष
ल. य. लागू — व्यवस्थापक

उभा राही. असे चार-सहा वेळा झाल्यानंतर दादासाहेब मला म्हणाले, "तू यावेळी डायव्हर नाहीस, ऑफिसमध्ये जाहिरात एजंट, प्रतिनिधी म्हणून, काम करतोस. तेव्हा उठत जाऊ नकोस." माझी भीती कमी झाली व मनमोकळेपणाने काम करू लागलो.

मी बंगल्यावर कामास गेलो की, तडक अर्थाच्या ऑफिसमध्येच जात असे. तेथे सहसंपादक असत. हे सहसंपादक म्हणजेच सध्याचे संपादक, श्री. श्री. वा. काळे हे होत. यांना सर्वजण, नानासाहेब म्हणतात. नानासाहेब अर्थाचे लिखाण तर करतातच, शिवाय इतर ठिकाणी लेख पाठविण्याचेही चालू असते. अर्थ साप्ताहिकाचे छपाईचे काम, "आर्यभूषण" प्रेस मध्ये होते. तो प्रेस जाण्यायेण्याच्या मार्गावर असल्याने, कॉपी देणे व प्रूफ आणणे हे मी जाताजाता करीत असे. त्यामुळे प्रेसमधील लोकांच्या ओळखी झाल्या. अर्थाचे ऑफिस व दादासाहेबांचा बसण्याचा हॉल नजीकच असल्याने, टेलिफोन घेणे व त्यास परवानगीने उत्तर देणे, हेही काम जवळ जवळ माझेकडेच असे. दादासाहेबांकडे कोणी आले असल्यास त्यांना बोलण्यातून उठावे लागू नये म्हणून मी शक्यतो प्रयत्न करीत असे. नानासाहेबांनीही मला सूचना देण्यास सुरुवात केली. त्यामुळे माझी भीती नाहीशी झाली. बाहेर काम करण्याकरिता संकोच राहिला नाही. अर्थाचा वाचकवर्ग हा फारच उच्च दर्जाचा आहे.

दादासाहेबांचा कामाचा व्याप मोठा, तो माझ्यासारख्या खालच्या दर्जाच्या माणसाने काय वर्णन करावा!

१९४३–१९४६ दादासाहेबांची तब्येत बिघडली असल्याने अग्रलेखाखेरीच ते काही लिहित नसत. त्यांना दिल्ली, आग्रा, सिंमला वगैरे ठिकाणी जावे लागत असे. तेथूनही ते लिहून पाठवीत असत.

त्यांचा पोषाख हाही अगदी साधा असे. डोक्यास रुमाल, लांब कोट, त्यावर उपरणे व नेसते धोतर. पायात ऋतुमानाप्रमाणे चप्पल अगर स्लिपर. थंडीमध्ये मोजे-बूट असत.

त्यांची नोकरलोकांवर फार श्रद्धा असे. रात्रीच्या वेळी काम आटोपून आचारी शंकर हा घरी जाण्याकरिता निघाला असता, आवारातच विंचू चावला. त्याच्यावर उपचार करून त्यास मोटारीतून घरी पोचविले.

थंडीचे दिवस. रात्रपाळी संपवून भय्या घरी निघाला. तो कुडकुडतच जात असताना दादांनी पाहिले. त्यास वरती हाक मारून अंगातील गरम कोट दिला.

नवे स्लिपर घेऊन चांभार आला व स्लिपरची जोडी दादांनी घेतली ती पंधरा रुपयांस. चांभार माघारी जाताना म्हणाला, साहेब, मला तुमच्या पायातली जुनी वहाण दिली तर बरे होईल दादांनी दोन महिन्यांपूर्वी घेतलेली चप्पल दिली. चांभार खूष झाला.

१९४६ साली कॅन्सरच्या आजाराने दादासाहेब यांचे निधन झाले. "संपादक अर्थ" म्हणून अर्थची सूत्रे ओघानेच श्रीपादराव (नानासाहेब) यांच्याकडे आली. नानासाहेबांनी अर्थमध्ये थोडा फरक केला, व लोकांना सोप्या शब्दांत नीट समजेल, अशा तऱ्हेने लिहिण्यास सुरुवात करून, जास्तीत जास्त अर्थ आवडेल असे केले. १९६१ साली अर्थ साप्ताहिकाचा, पाक्षिक झाला. वर्गणी मात्र तीच राहिली. जाहिरातीचे दर मात्र वाढविणे भागच पडले. जाहिरातदरवाढीबद्दल, जाहिरातदारांनी बिलकूल कुरकुर केली नाही.

अर्थ कचेरीची वेळ ही जरी ठरलेली होती, तरी आपआपल्या टेबलावरचे काम पुरे करून गेल्यास, नानासाहेबांची हरकत नसे. माझ्या बाबतीत तर नानासाहेबांनी घरगुती वातावरण ठेविले होते.

जाहिरातीची कामे करून कचेरीची वेळ साधत नसे. मी कचेरीत असताना, नानासाहेब येत असत. केलेल्या कामाचा तपशील दिल्यानंतर, इतर गप्पा सुरू होऊन, अर्धा तासपर्यंत बसत असत. गप्पा व्हावयाच्या त्या वाचक काय म्हणतात, जाहिरातदार जाहिरातीबद्दल किती आतूर असतात, वगैरे वगैरे. कोणी नवीन मनुष्य आल्यास, अर्थचे मॅनेजर म्हणून ते ओळख करून देत असत.

माझे जाहिरातीचे कमिशन, महिन्याच्या शेवटच्या आठवड्याच्या आधीच मिळत असे. त्याखेरीज दरमहा पगार चालू होताच. दादांच्या शिस्तीला मी उतरलो होतो. परंतु नानासाहेबांच्या शिस्तीला उतरणे हे अधिक कठीण. त्यांच्या "अर्थ" या विषयाव्यतिरिक्त इतर लिखाणावरची कित्येक पुस्तके, महाराष्ट्रात घरोघरी वाचली जात आहेत.

मी एकदा सोलापूरला अर्थच्या कामाकरिता गेलो होतो. तेथील टेक्निकल कॉलेजचे प्रिन्सिपाल यांची भेट घेतली असता मला म्हणाले, "कुलकर्णी, आताच तुमच्या श्री. वा. काळ्यांचे नाव आमच्या सौ. ने काढून "कण आणि क्षण" हे पुस्तक मला वाचावयास लावले. हे अर्थ पाक्षिक चालवतात. परंतु त्यांना घरगुती प्रश्नांची उकल करून हितगुज करणे कसे साधते, हाचे मोठे कोडे आहे."

नानासाहेबांच्या पुस्तकांची, कसलीही लहान मोठी, कौटुंबिक मंडळी असोत, बंगला असो की साधी झोपडी असो, चर्चा चाले. महिला मंडळांतून तर व्याख्याने देण्याकरिता निमंत्रणे हमखास येत असत. आमच्या सहकार नगरात, महिला मंडळांनी त्यांचे व्याख्यान आयोजित केले. श्रोतृसमुदाय जो जमला होता तो आपले आवडते लेखक श्री. वा. काळ्यांना मुख्यत: पाहण्याकरिताच. महाराष्ट्रातून दूरदूरच्या ठिकाणचीही निमंत्रणे हमखास येत असत. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमुळेही, अर्थमध्ये जाहिरात मिळण्यास पुष्कळशी मदत होत असे.

गेली चाळीस वर्षे, अर्थाच्या निमित्ताने, ज्या मोठमोठ्या कारखानदारांनी, बँकांनी, धंदेवाल्यांनी जे सतत प्रेम व्यक्त केले, त्यांच्याच प्रेमाने व दोन्ही संपादकांच्या आशीर्वादाने, मी पुण्यासारख्या ठिकाणी स्वत:ची वास्तू करू शकलो. त्यांच्याच शिकवणुकीने, मी माझी मुले पदवीधर करू शकलो, मुलींना परदेशी धाडू शकलो. हे आज मी स्वत:चे डोळ्यांनी उन्हाळ्याचे दिवस संपवून, हिवाळ्याची मजा लुटीत आहे, याला कारण फक्त ह्या दोघा संपादकांचे प्रेमळ प्रोत्साहन. त्याविना माझे केवळ कष्ट काय करणार होते! ○

• महाराष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयासाठी सतत ४० वर्षे सेवा करणाऱ्या अर्थाला आमचा प्रेमाचा निरोप •

**श्री महालक्ष्मी को. ऑप्. बँक लि., कोल्हापूर**

रजि. ऑफिस श्री भवन १६७ बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर
रजि. नं. १८३११ ♣ स्थापना सन १९३३
हेड ऑफिस फोन नं. २३७, ११६
शाखा (१) शिवाजी उद्यमनगर कोल्हापूर फोन नं. ७०४
(२) श्री शाहू मार्केट यार्ड शाखा कोल्हापूर फोन नं. २१३५

| ठेवी | कर्जे | खेळते भांडवल |
| --- | --- | --- |
| रु. १ कोटी ४४ लाख | रु. १ कोटी ६ लाख | रु. १ कोटी ७८ लाख |

- कोल्हापूरच्या औद्योगिक विकासास सढळ हाताने पतपुरवठा करणारी एकमेव नागरी सहकारी बँक
- सभासदांच्या दैनंदिन गरजा व व्यापार-वृद्धीसाठी निरनिराळ्या प्रकारची कर्जे दिली जातात.
- ठेवीदारांना अधिकाधिक व्याज मिळवून देणाऱ्या अनेक योजना कार्यवाहीत आहेत.
- ठेवीदारांना डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची हमी.
- ठेवीदारांना सोयिस्कर अशा कामकाजाच्या वेळा सोमवार ते शुक्रवार रोज सकाळी ८–३० ते १०–३० व दुपारी ११ ते २–३० शनिवारी सकाळी ८–३० ते १०–३० व दुपारी ११ ते १२ पर्यंत.

आजच आमच्या बँकेत खाते उघडून वरील योजनांचा लाभ घ्या.

म. शं. कुळकर्णी — अकौंटंट
श्री. शि. हुद्दार — व्हाइस प्रेसिडेंट
प्र. रा. मुंडरगी — प्रेसिडेंट

## दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### वाई (सातारा)

मुख्य कार्यालय :—गणपती आळी, वाई.
स्थापना – ३–६–१९११ फोन नं. ७
ऑडिट वर्ग "अ" शाखा—पाचगणी : फोन—७३

| | | |
| --- | --- | --- |
| भागभांडवल | ११,६१० | ठेवींच्या योजना व व्याजदर |
| गंगाजळी व इतरनिधी | २,४८,०४३ | सेव्हिंग्ज ...साडेपाच टक्के |
| खेळते भांडवल | ३६,८२,८४१ | मुदत ठेव १ ते ५ वर्षे |
| ठेवी | ३३,७६,२८९ | ८·२५ ते १०·२५ टक्के |
| कर्जे | २५,१३,८६० | |

संचित मुदत ठेव योजना * दामदुप्पट योजना * वस्तुभाडे करारनामा योजना * सुरक्षित कप्पे योजना * माध्यमिक शाळांना टेलिव्हिजन सेट खरेदीसाठी कर्ज-योजना.

तसेच शास्त्रीय उपकरणे खरेदीसाठी आगामी योजना

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

व्यवस्थापक मंडळ

श्री. अ. स. भट, बी. ए., एल.एल.बी. — चेअरमन
श्री. द. न. पटवर्धन — सेक्रेटरी
श्री. न. चु. गांधी, बी. ए.
श्री. रा. ब. सकुंडे
श्री. प्र. द. ऊर्फ ब. गोखले
श्री. पु. द. देशपांडे ,,
श्री. डॉ. भा. वा. दातार, एम्.बी.बी.एस्.
श्री. सि. ना. जोशी
श्री. प्र. कु. अभंकर, बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

## इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

(स्थापना : ७ फेब्रुवारी, १९६३)

शाखा : (१) कोल्हापूर (२) शिरोळ (३) जयसिंगपूर

फोन नं. २९९१, २९९२, २९९३, २९९४ ] [ तार : जनता बँक

केवळ बारा वर्षांच्या वाटचालीतील नेत्रदीपक प्रगती

"सेवा हेच आमचे ब्रीद"

"लघउद्योगधंद्यांना भांडवलपुरवठा करणे हेच आमचे ध्येय."

(आकर्षक व्याजाच्या दराने ठेवी स्वीकारल्या जातात.)

(१) खपलेले भागभांडवल ... ... रु. सात लाखांचे वर
(२) गंगाजळी व इतर निधी ... ... रु. सात लाख पंचेचाळीस हजारांचे वर
(३) ठेवी ... ... रु. एक कोटी ब्याऐंशी लाखांचे वर
(४) खेळते भांडवल ... ... रु. दोन कोटी सव्वीस लाख तीस हजारांचे वर

वडगाव (जि. कोल्हापूर) व मुंबई येथे बँकेची शाखा चालू होत आहे.

आर. पी. कुलकर्णी — मॅनेजर
एस. आर. हुपरे — व्हा. चेअरमन
के. बी. आवाडे — चेअरमन

# औद्योगिक क्षेत्रातील 'स्वस्तिक'ची कामगिरी

## तंत्रज्ञांची नवी पिढी तयार करून लघुउद्योगांच्या वाढीस साहाय्य

(श्री. वसंतराव वैद्य, 'स्वस्तिक' पुणे)

एका छोट्या बीजापासून एका मोठ्या वटवृक्षात स्वस्तिकचे गेल्या काही वर्षांत रूपांतर झाले आहे. १९४० साली मी



मुंबईतल्या एका छोट्या खोलीत बलून्स आणि खेळणी करण्यास प्रारंभ करून पुढील उद्योगाचे बीजारोपण केले, त्यावेळी माझे भांडवल फक्त ३०० रुपयांचे होते आणि माझ्या मदतीला फक्त एक कामगार होता. १९४३–४५ ह्या काळात माझ्या फर्मने भारत सरकारच्या संरक्षण खात्यास लेटेक्सच्या कित्येक जिनसा पुरविल्या, त्यांच्या उत्कृष्टतेमुळे फर्मला लौकिक प्राप्त झाला. युद्धकाळात ह्या जिनसांचे उत्पादन सुरू करणे आणि त्याला युद्धकालीन मागणीचा फायदा मिळणे, हा केवळ एक योगायोग होता. यातूनच नव्या उत्पादनास प्रेरणा मिळाली, त्यासाठी मूलग्राही अभ्यासाची आवश्यकता होती. त्यासाठी मी संधी शोधीत होतो आणि ती मला मिळालीही—रबर उत्पादनाच्या तंत्रविधिचे माहेरघर, अॅक्रॉन (ओहिओ), अमरिका, येथे रबर टेक्नॉलॉजीची विद्या शिकण्यासाठी सरकारी शिष्यवृत्ती मला मिळाली.

रबर टेक्नॉलॉजीमध्ये एम. एस. पदवी मिळवून मी १९४८ मध्ये भारतात परत आलो आणि महाराष्ट्र सरकारला रबरी मालाच्या उत्पादनाची एक योजना सादर केली. सरकारने ८ लक्ष रुपयांच्या कर्जाचे आश्वासन दिले. त्यापूर्वीच, १९४७ मध्ये फर्मच्या व्यवहाराचे १० लक्ष रुपये भांडवलाच्या खासगी लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्यात आले होते. कंपनीचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर करण्याच्या अटीवर कर्ज देण्यात आले. एप्रिल, १९४८ मध्ये कंपनीचे भांडवल वाढवून, २५ लक्ष रु. करून, तिचे २० ऑक्टोबर १९४८ रोजी सार्वजनिक कंपनीत रूपांतर करण्यात आले. त्यानंतर दोन वर्षांनी विजेच्या तुटवड्यामुळे कंपनीचा विकास खंडित होऊन १९५२ साली कंपनीला प्रथमच तोटा आला. त्यानंतर २० वर्षे कंपनीचे काम काहीही व्यत्यय न येता सुरळीत चालले आहे. नवीन जिनसा कल्पून त्यांचे उत्पादन इतर उत्पादकांच्या आधी सुरू करणे हे आता आमचे अतुलनीय वैशिष्ट्य आहे. ह्या जिनसांची बनावट आम्ही स्वीय मतीने करतो त्यामुळे आम्ही स्पर्धकांच्या नेहमीच आघाडीवर असतो. आमच्या एकूण उत्पादनाचा बराच मोठा भाग संरक्षण खात्याच्या आवश्यकतेत रूपांतर पावतो. गेल्या वर्षी आमचा धंदा ७ कोटी रुपयांचा झाला; चालू वर्षी तो ९ कोटी रुपयांवर जाईल.

स्वस्तिकने संरक्षण खात्याचा विश्वास संपादन केलेला आहे. त्या खात्याने सोपविलेल्या कामगिऱ्या कठीणच असतात आणि इतरांना त्या बहुधा पार पाडता येत नाहीत. त्या मागणीप्रमाणे अचूक जिनसा बनविता याव्या ह्याप्रीत्यर्थ आम्ही २–३ लक्ष रुपये संशोधनावर खर्च करतो. स्वतःच्या कल्पकतेचा उपयोग करण्यास येथे भरपूर वाव असतो. जिनसांच्या बनावटीत सतत सुधारणा घडवून आणणे आणि विशिष्ट मागणीस अनुसरून संशोधन करणे ह्यावरच ती बाजारपेठ अवलंबून असते. ह्या रीतीने आम्ही खास प्रकारचा माल बनवितो आणि नव्या उत्पादनास आणि निर्मितीस बाजारपेठ तयार करतो. अशा जिनसांचे आम्ही अग्रेसर उत्पादक असतो आणि इतर त्यांची नकल करू लागले की आम्ही त्यांचे उत्पादन करण्याचे थांबवितो. उदाहरणार्थ बलून्स, खेळणी, रबर आणि पीव्हीसी पाइप्स, मोटार मॅटस, इत्यादींचे उत्पादन प्रथम आम्ही केले पण पुढे ते करणे सोडून दिले. संरक्षण खात्याच्या ऑर्डरींचे बाबतीतही असेच घडले. संरक्षण खात्याची मागणी वाटते तेवढी संरक्षित बाजारपेठ नाही हे ह्या सर्व विवेचनावरून पटेल.

जेथे अत्यंत नाजूक आणि काळजीपूर्वक बनावट आवश्यक आहे अशाविषयी संशोधन पुरे होऊन प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होऊन मागणी पुरी करण्यास दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागतो; इतर प्रकारच्या मागणीचा पुरवठा चार ते सहा महिन्यात सुरू करता येतो. संरक्षण खात्याच्या क्लिष्ट समस्यांपैकी ९० % समस्या सोडविण्यास आमचा हातभार लागतो. ही कामे आमच्या हातून पूर्णपणे समाधानकारक पार पाडली जातात आणि सर्वंच उत्पादनात दर्जा कायम राखला जातो, ह्याबद्दल आम्हांस सार्थ अभिमान वाटतो.

फार मोठ्या उत्पादनाकडे धाव घेण्याची आमची इच्छा नाही. २० कोटी रुपयांच्या उत्पादनाची मर्यादा आम्हांला ओलांडायची नाही. कारण, तेव्हा एम्. आय. टी. पी. कायद्याखाली आम्ही येऊ आणि आमचा माल मोनॉपोली बाबीत मोडला जाईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, पुढील विकासाच्या आमच्या योजनांना ह्या कायद्यामुळे खीळ बसून धंदा वाढविण्यात व्यत्यय येईल.

एम. आय. टी. पी. कायद्याचा विचार आपण दूर बाजूस ठेवू. आतापर्यन्त वैद्य कुटुंबीयापुरतीच व्यवस्थापन जबाबदारी मर्यादित

होती. आता आम्ही इतके पुढे गेलो आहोत की ज्यांनी तांत्रिक दृष्ट्या उत्कृष्ट ज्ञान प्राप्त करून घेतले आहे असे माझे पुतणे-पुत्र आणि तितकेच तज्ज्ञ असे अधिकाऱ्यांचे पुत्र हे खांद्यास खांदा देऊन व्यवस्थापनाची कार्यक्षमता वाढवीत नेऊ लागतील. म्हणजेच भविष्यकाळात स्वस्तिकचे व्यवस्थापक सर्व तज्ज्ञच असतील आणि स्वस्तिकच्या निशाणाखाली मोठ्या आकाराचे उद्योग सुरू करून वाढवितील.

स्वस्तिकमधील काही कामगार संस्थेच्या प्रारंभापासून कंपनीत काम करीत आहेत. नव्या नव्या कामगारांच्या भरतीचे प्रमाण अल्प असले म्हणजे कामातील तोच तोचपणामुळे कामातील कामगारांचा उत्साह कमी होतो, असा कित्येक ठिकाणी येणारा अनुभव स्वस्तिकचे बाबतीत आढळत नाही. कारण, स्वस्तिकच्या नेतृत्वाखाली अनेक खाती आहेत आणि अनुभवी लोकांच्या आम्ही वेगवेगळया खात्यांतून बदल्या करून त्यांचा ताजेपणा कायम राखतो. कामगारांनी व्यवस्थापनाच्या श्रेणीत येण्यासही आम्ही प्रोत्साहन देतो.

तांत्रिक शिक्षण घेऊन तज्ज्ञ झालेल्यांच्या हातीच उद्योगधंदे असावेत, असे सरकारचे धोरण आहे, त्याला अनुसरून आम्ही सुमारे २५ टेक्नोक्रॅटसना लघुउद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन दिले आहे आणि सुमारे ७५ ते ८० जणांनी साहाय्यासाठी आमच्याशी संपर्क साधला आहे. आम्ही प्रोत्साहन दिलेले टेक्नोक्रॅट स्वतःच्या लघुउद्योगातून दरमहा ३,००० ते ६,००० रु. कमवीत आहेत; कॉरुगेटेड बॉक्सेस, पॉलिथिन बॅग्स, ऑइल सीलससाठी कप्स, मोल्डस्, इत्यादींचे उत्पादन ते यशस्वी रीतीने करीत आहेत. महाराष्ट्र सरकारने चिंचवड येथे आम्हांस दिलेल्या ८० एकर जागेपैकी ४० एकर जागा आम्ही अशा टेक्नोक्रॅटस-साठी, त्यांना आणखी प्रोत्साहन देण्याकरिता राखून ठेवली आहे.

लघुउद्योगांसाठी संलग्न करून घेण्याकरिता आम्ही दोन प्रकारे निवड करतो. जे अगोदरच व्यवसाय करीत असून ज्यांचा दृष्टिकोन प्रगतिकारक आहे, अशांतून आम्ही काहींना पसंत करतो. तांत्रिक कामासाठी आमच्याकडे नोकरी मागण्यासाठी येणाऱ्यांतून निवड करणे, हा दुसरा मार्ग. त्यांतील विशेष उमेदीच्या टेक्नोक्रॅटना आम्ही अशा सवलतीच्या अटीवर मदत करतो की काही काळानंतर ते स्वावलंबी व्हावेत. उदाहरणच द्यावयाचे झाले तर ठराविक मुदतीपर्यंत आम्ही त्याला दरमहा काही मेहेनताना देतो. त्याचा उद्देश हा की कुठलीतरी उत्पादनाची योजना तो पक्की करू शकेपर्यंत त्याचे लक्ष त्या योजनेत केंद्रित राहावे. ह्या योजनेच्या पूर्तीसाठी आम्ही मदत करतो. पहिला नमुना तयार होईपर्यंत आम्ही त्याला ४०० ते ५०० रु. देतो; त्यानंतर आम्ही व्यावहारिक पातळीवर त्याच्याशी भागीदारी करतो. अशा रीतीने आम्ही त्याला आर्थिक मदत करतो इतकेच नव्हे तर त्याच्या क्षमतेचा नव्या उद्योगस्थापनेकडे उपयोग करतो. अशा रीतीने काही लघुउद्योगांच्या स्थापनेस 'स्वस्तिक' कारणीभूत झाली आहे. अशा तऱ्हेच्या टेक्नोक्रॅटच्या संवर्धना-साठी उद्योगपतींनी एकमेकांशी सहकार्य करता येण्याजोगे आहे. परंतु, संस्थेच्या दृष्टीने ह्या उपक्रमास स्वाभाविकच मर्यादा आहेत.

तात्कालिक अडचणींच्या दृष्टीने विचार करता, कच्च्या मालाचा तुटवडा भासण्याचे कारण नाही; कारण प्रत्येक जिन्नस भारी किंमत दिली तर मिळू शकतो. आमच्या उत्पादनास अधिक किंमत देण्यास गिऱ्हाइकांना उद्युक्त करणे, एवढीच आमची अडचण आहे. विजेच्या तुटवड्यास तोंड देण्यासाठीही आम्ही उपाय योजीत आहो. गेली १५ वर्षे आमच्याकडे बरेच स्क्रॅप रबर साठले आहे ते बॉयलर्समध्ये वापरून पुढील नेहमीच्या वापरासाठी पुरेसा कोळसा उपलब्ध करण्याचा आम्ही विचार करीत आहो. अशा रीतीने इंधनाची समस्या सुटू शकेल. □

*With Best Compliments From*

**M/S. OGALE GLASS WORKS LTD.**

**Pimpri, Poona 411 018 ( Maharashtra State )**

**Manufacturers of Tumblers and Jars**
**Durable and most convenient for every use.**

# सरड्याची धाव कुंपणापर्यंत—माणसाची धाव....?

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. )

"प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षेत्रात अकार्यक्षम ठरेपर्यंत प्रगती करीत असते." —

—डॉ. लॉरेन्स पीटरचा सिद्धान्त !

"अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी अखेर राष्ट्राध्यक्षपद सोडले !"

"भारतीय क्रिकेट संघाला इंग्लंडमध्ये पराभवाची नामुष्की पत्करावी लागली !"

"अजित वाडेकरची क्रिकेटमधून निवृत्ती !"

"अबक राज्याच्या मुख्य मंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला !"

"तांत्रिक बिघाडामुळे विमानाला प्रचंड अपघात ! शंभर प्रवासी ठार !"

"एका गावात एका प्रचंड बांधकामाची स्लॅब कोसळून भीषण अपघात !"

वरीलप्रमाणे धक्का देणाऱ्या बातम्या या नव्या सुधारलेल्या नागरी जीवनात वरचेवर वाचण्यात येऊ लागल्या आहेत. या तऱ्हेच्या सर्वसाधारण महत्त्वाच्या बातम्यांशिवाय प्रत्येकाला त्याच्या खासगी जीवनातही संबंधित व्यक्तींबद्दल असेच धक्कादायक काहीतरी कानावर येत असते. एखाद्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरला किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामावरून दूर करण्यात आले, एखाद्या सरकारी अधिकाऱ्याची अचानक बदली करण्यात आली, एखाद्या नव्यानेच प्रमोशन मिळालेल्या अधिकाऱ्याला सक्तीने राजीनामा द्यावा लागला, एखाद्या सहकारी सोसायटीचे चिटणीसांना अविश्वास दाखवून बडतर्फ करण्यात आले, वगैरे वगैरे. या असंख्य घटनांचे मूळ कारण शोधण्याच्या भरीस सर्वसाधारण लोक पडत नाहीत. या घटनांची तात्कालिक कारणे वरिष्ठांशी किंवा सहकाऱ्यांशी मतभेद, भ्रष्टाचाराचा आरोप, कामातील निष्काळजीपणा, वगैरे मोजकीच दाखवली जातात. पण आपल्या भोवतालच्या परिस्थितीचा, एकंदर कामकाजाचा निःपक्षपातीपणे अभ्यास केल्यास एक गोष्ट प्रामुख्याने आढळेल की बहुसंख्य व्यक्ती त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काम करण्यास अकार्यक्षम असूनही त्या त्या पदांवर नेमल्या गेल्या आहेत. व्यक्तीच्या काही थोड्या मोजक्या गुणांचे ज्ञान घेऊन अगदी थोड्या वेळात बहुधा १५ ते २० मिनिटात त्याची चाचणी घेऊन नेमणूक केलेली असते. हीच माणसे थोडे दिवसांत कामाचे जुजबी ज्ञान घेऊन रुळतात व कालांतराने जशा वरच्या जागा रिकाम्या होतील किंवा निर्माण होतील तशा त्या पदांवर आपोआप किंवा थोड्याफार वशिल्याने आरूढ होतात. या पदांवर काम करण्यास जर ती माणसे कार्यक्षम ठरली तर पुन्हा याहून महत्त्वाच्या जागेवर त्यांची नेमणूक होते व तिथे ते अकार्यक्षम ठरले तरीही ते पद सांभाळू शकतात. त्यापुढील त्याची प्रगती अर्थातच खुंटते. पण या पदावर ही माणसे दीर्घ काळ टिकू शकतात.

या विषयावर प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. लॉरेन्स पीटर यांनी विविध क्षेत्रांतील असंख्य नमुने अभ्यासून एक महान संग्रह केला आहे. ही अकार्यक्षमता येईपर्यंत व्यक्तींची प्रगति कशी होत असते, तसेच प्रगतीच्या मर्यादा गाठल्यावर या व्यक्तींची अकार्यक्षमता कामात कशी अडथळे आणीत असते व एकंदर कारभार कसा भोंगळ व नुकसानकारक चालतो याचे नमुने त्यांनी 'केस स्टडीज' म्हणून गोळा केले आहेत व त्यावरून त्यांनी वरील सिद्धान्त मांडला आहे. या सिद्धान्ताशी संबंधित उपसिद्धान्त आणि क्वचित अपवादही त्यांनी अभ्यासिले आहेत. या अकार्यक्षमतेतून व्यक्तींनी कार्यक्षमतेकडे झुकण्यासाठी काय बदल करून घ्यावेत याचेही विवेचन त्यांच्या अभ्यासात आले आहे.

निरनिराळ्या व्यक्तींना बढती देताना ते वरच्या पदावर कार्यक्षम ठरतीलच याविषयी फारशी चिकित्सा न करता त्यांच्या सध्याच्या कार्यपद्धतीवर व वागणुकीवर भर दिला जातो. त्यामुळे वरच्या पदाचे बेअरिंग त्यांना न सांभाळता आल्यास, त्यांची व त्यांना नेमणाऱ्यांची परिस्थिती चमत्कारिक होते. पण अशी उदाहरणे असंख्य असल्याने त्यांना पुढील बढती न देता ते अकार्यक्षम ठरलेल्या पदावर ठेवण्याकडेच सर्वांचा कल दिसतो व त्यातून या लेखाच्या आरंभी दिलेल्या अनपेक्षित धक्कादायक घटनांना चालना मिळते. येथे आपण या विषयाशी संबंधित दोन उदाहरणे पाहू.

१. राजकीय पुढारी—श्री. पटेल हे त्यांच्या तरुण वयात बरोबरीच्या लोकांबरोबर त्यांच्या मोहल्ल्यात होणाऱ्या सार्वजनिक कार्यात धडाडीने भाग घेत. घरची परिस्थिती बरी असल्यामुळे बाहेरची कामे करण्यास त्यांना वेळ असे. साहजिकच थोड्या वर्षांत ते त्या भागातील नगरपिते झाले. २-३ वेळा म्युनिसिपालटीत निवडून आल्याने आमदारपदाचा त्यांना लाभ उठवता आला होता. ते मंत्रिपदावर पोचले. पण आपल्या स्वतःच्या विभागात ते जितके लोकप्रिय होते तितका त्यांचा प्रभाव संबंध राज्यावर पडू शकला नाही. आपल्या विभागातील

बारीक सारीक प्रश्नात लक्ष देणारे श्री. पटेल राज्याच्या प्रश्नांत तसे लक्ष देऊ शकले नाहीत. परिणामी पुढल्या निवडणुकीनंतर मंत्रिपदाच्या चढाओढीत त्यांच्या नावाला पुरेसा पाठिंबा मिळाला नाही व पटेल पुन्हा गल्लीतले राजकारण सांभाळू लागले. पण त्यांचे मतदार पटेल मंत्री होऊ शकत नाहीत हे ध्यानात घेऊन दुसऱ्या पुढाऱ्याच्या भजनी लागले.

फोरमन जॉर्ज—जॉर्ज हा एक कुशल टर्नर होता. आपले काम बरे की आपण बरे या वृत्तीने तो आपले मशीनवरचे काम संभाळत असे. कारखान्याचा जसा विस्तार होत गेला तसे व्यवस्थापकांना जॉर्जला त्याची नोकरी व कामातील तत्परता पाहून फोरमन करावेसे वाटले. जॉर्ज फोरमन झाला. मशीनचा व त्याचा संबंध कमी झाला. इतर कामगारांना कामे वाटणे, त्यांचे काम तपासणे, हजेरी पाहणे, यांसारखी कामे जॉर्जवर आली. त्याला वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याच्या खात्याच्या कामासंबंधी रिपोर्ट करावे लागत. चर्चा करावी लागे. या कामात त्याला रस नसल्याने व अनुभव नसल्याने त्याचे काम वरिष्ठांच्या पसंतीला येईना. त्यांचे व जॉर्जचे खटके उडू लागले. त्याच्या हाताखालचे कामगार त्याच्यासारखे कामात सीरीयस नसल्याने त्यांना जॉर्जचा जाच वाटू लागला. त्यांच्याकडूनही जॉर्जसंबंधी तक्रारी वर जाऊ लागल्या. कार्यक्षम जॉर्ज हा त्याच्या बढतीच्या जागेवर अकार्यक्षम ठरला.

शिक्षणक्षेत्रात, सरकारी यंत्रणेत, कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांत तसेच कनिष्ठ नोकरवर्गात, सर्वत्र, आपल्याला या तऱ्हेची उदाहरणे दिसतील. या अशा कर्मचाऱ्यांमुळे आपल्याला चुकीची बिले येणे, वेळेवर व समाधानकारक उत्तरे न मिळणे, चुकीची माहिती मिळणे, यासारखे अनुभव पदोपदी येतात. ज्या कर्मचाऱ्याला त्याच्या कामाशी निगडित सर्व तऱ्हेचे ज्ञान आवश्यक पाहिजे तेच नेमके त्याच्याजवळ नसते. तो त्याच्या अकार्यक्षमतेच्या स्थितीस पोचलेला असल्याने त्याच्यापासून कोणत्याही तऱ्हेची उपयुक्त सेवा मिळू शकत नाही. अशी अकार्यक्षमता आपल्याच देशात नसून जगातील पुढारलेल्या देशांतही आहे म्हणून नुसते समाधान मानून न घेता आपल्यासारख्या विकसनशील देशात माणसांना कार्यक्षम कसे ठेवता येईल या दृष्टीने अभ्यास व प्रयत्न होणे आवश्यक नाही का!

○

---

**धोक्याचा संभवच नाही!**

एक तरुण स्त्री बँकेत गेली आणि नवे चेकबुक मागून ती म्हणाली, "काल तुम्ही दिलेले चेकबुक माझ्या हातून हरवलं. पण कोठल्याही लबाड माणसाच्या हाती ते पडलं तरी त्याला त्याचा उपयोग करता येणार नाही. कारण, त्यामधील सर्व चेक्सवर मीच सह्या करून टाकल्या आहेत."

* * *


ऑफिस फोन २२२६ तार : TEATRADE
रेसिडेन्स ,, २१७८ पो. बॉ. नं. १८८

सर्वोत्कृष्ट असा आसामचा हायग्रोन डस्ट चहा
व सर्व प्रकारच्या चहाचे
व लाल छत्री छाप चहाचे

घाऊक व्यापारी

मे. दामोदर शिवराम आणि कं.

शाहुपुरी—कोल्हापूर

—ब्रँचेस—

कराड, चिपळूण, संगमनेर, मुंबई, पुणे, सांगली
फो. नं. ५६४ १ २ ३१०२८५ २२३१०



हेड ऑफिस टे. नं. २२ मिश्रखत विभाग टे. नं. ५६
माल खत वि. विभाग टे. नं. ५८ ऑईल मिल टे. नं. ५०

शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी निर्मित

पैसाफंड मिश्रखत

१५ : ५ : ५ १२ : ६ : ०
१० : ५ : ५ ६ : १२ : ०
९ : ९ : ५ ९ : ९ : ०

सर्व पिकांना वापरणे पसंत करतात. आपण एक वेळ अनुभव घेतल्यास कमी पैशांत भरपूर मोबदला मिळण्याचे समाधान आपणासही लाभेल. एक वेळ वापरून खात्री करा.

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर

एस. बी. गाट एल. वाय. पाटील
शेती अधिकारी चेअरमन

श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.
हुपरी, जिल्हा—कोल्हापूर.

# क्रूड तेल प्रभृती खनिजांच्या तुटवड्याचे औद्योगिक देशांवर गंभीर परिणाम

## जागतिक शांतता धोक्यात : अविकसित देशांच्या जागृतीचे राजकारण

क्रूड तेलाप्रमाणेच इतर दोन डझन तरी महत्त्वाच्या कच्च्या मालाच्या समस्येमुळे श्रीमंत औद्योगिक देशांचे राजकीय प्राबल्य कमी होऊन गरीब, अविकसित देशांचे प्राबल्य वाढणार असा रंग दिसत आहे. हे सत्तांतर शांततेच्या मार्गाने होईल किंवा नाही, हे सांगता येणार नाही. कच्च्या मालाच्या दुर्मिळतेमुळे केवळ आर्थिक सुबत्ताच नव्हे तर प्रमुख देशांची संस्कृतीही नष्ट होण्याचा रंग दिसत आहे. आज सर्व देश स्वार्थी बुद्धीने धोरणे आखीत आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि कच्च्या मालाचे न्यायबुद्धीने वाटप, ह्या फक्त बोलण्यापुरत्याच गोष्टी आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील जागतिक शांतता सुबत्तेमुळे सांभाळली गेली. देश स्वतः आर्थिकदृष्ट्या वर्धमान झाले म्हणजे शेजाऱ्यांच्या संपत्तीकडे त्यांची वक्रदृष्टी होत नाही. पण कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळे भरभराट गोत्यात येताक्षणीच देश आक्रमक पवित्रे घेऊ लागतात. भूगर्भातील खनिज संपत्तीचा तुटवडा भासू लागला आहे, त्याची प्रतिक्रिया प्रकट होण्यास आता उशीर नाही.

दुर्मिळ होत चाललेल्या कच्च्या मालास औद्योगिक देशांची मागणी वाढत आहे आणि त्यासाठी जागतिक स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे नैसर्गिक साधन-संपत्तीवर ताबा मिळविण्यासाठी अहमहमिका चालू झाली आहे.

तेल-उत्पादन करणाऱ्या देशांनी साधन-संपत्तीवरील ताब्यामुळे काय घडू शकते, ह्याचा चांगलाच धडा सबंध जगाला दिला आहे. नैसर्गिक संपत्ती असणारे इतर देश त्यांचेच अनुकरण करणार. तेल-उत्पादन करणारे देश तेलाची किंमत तिप्पट करू शकतात आणि ग्राहक देशांना काहीही प्रतिकार करता येत नाही; तेव्हा इतर नैसर्गिक संपत्ती असणारे देश अरबी देशांचेच उदाहरण गिरविणार.

कच्चा माल असणाऱ्या विकसनशील देशांनी आपली नैसर्गिक संपत्ती सरकारच्या ताब्यात घ्यावी आणि अशा सर्व देशांनी ह्या संपत्तीची गिऱ्हाइके म्हणजे औद्योगिक देश ह्यांच्यावर संयुक्त आघाडी उघडावी, असे अरबी देशांचे पुढारी इतर देशांना सांगत आहेत.

तृतीय जग ह्या नावाने आता ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात — म्हणजे लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियाचा मोठा भाग ह्यात — टिन, अँटिमनी, ह्यासारखी दुर्मिळ खनिजे मोठ्या प्रमाणावर आढळतात. प्लॅटिनम, मॅंगेनीज, निकेल, ह्या खनिजांवरही ह्या देशांचाच ताबा आहे. पेरू, झइरे, झँबिया आणि चिली ह्या चार देशांतून तांब्याच्या जागतिक निर्गतीच्या एकतृतीयांश निर्गत होते.

बोलिव्हिया आणि आग्नेय आशिया येथील टिनच्या खाणी त्या बहुमोल खनिजाच्या जागतिक निर्गतीपैकी तीन चतुर्थांश निर्गत करतात. ज्यापासून अॅल्युमिनम काढतात त्या बॉक्साइटचा बहुतांश पुरवठा गिनी, जमेका, ग्वायना आणि सुरिनम हे देश करतात. बाकीचे बॉक्साइट ऑस्ट्रेलियातून येते.

१८ व्या आणि १९ व्या शतकांत लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया ह्या खंडातील देशांना पाश्चात्त्य ख्रिस्ती देश आपल्या स्वतःच्या अधिकारणाचे गुलामच समजत होते. पण आता पूर्वीच्या गुलामगत देशांना स्वतःच्या नैसर्गिक साधन-सामग्रीच्या सुप्त शक्तीची जाणीव झाली आहे. स्वतःच्या कच्च्या मालाच्या शक्तीने ते देश पाश्चात्त्य देशांना नमवू लागले आहेत; त्यांचा ऐतिहासिक वरचढपणा संपुष्टात आणू पाहात आहेत. औद्योगिक राष्ट्रांना नैसर्गिक संपत्तीचा कच्चा माल विकून हे देश त्यांच्याकडून युद्धसामग्री विकत घेत आहेत.

रशिया वगळला, तर कोणताही औद्योगिक देश नैसर्गिक संपत्तीचा बाबतीत स्वयंपूर्ण नाही. कॅनडाजवळ ही संपत्ती भरपूर आहे पण क्रोम नाही. कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया ह्यांच्याजवळ पेट्रोल, निकेल, लोखंड आणि झिंक भरपूर असले तर ते दोन देश आणीबाणीच्या वेळी जगाची गरज भागवू शकणे अशक्य आहे.

कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ, हे युरोपातील चलनवाढीचे आणि महागाईचे एक प्रमुख कारण आहे. उदाहरणार्थ, २२ वर्षांपूर्वी फ्रान्स इंधनाची ७०% गरज कोळशाने आणि २३% गरज तेलाने भागवीत होता. आता ती प्रमाणे नेमकी उलट झाली आहेत, म्हणजे फ्रान्सचे इंधनासाठी परावलंबन वाढत आहे; फ्रान्सचा स्वतःचा कोळसापुरवठा संपुष्टात येऊ लागला आहे. अमेरिकेचेही इंधनासाठी परदेशांवरील अवलंबन वाढत चालले आहे. सबंध पाश्चात्त्य जग क्रोमिअम, बॉक्साइट, लोखंड, टिन, झिंक, इत्यादी २५ खनिजांसाठी इतर देशांवर अवलंबून आहे. अमेरिकेच्या भरभराटीचे मुख्य कारण नैसर्गिक संपत्तीची विपुलता हे होते.

आता जपान आणि युरोपातील देश ह्यांच्याप्रमाणेच अमेरिकेची स्थिती होऊ पाहात आहे. अमेरिकेचा स्वतःचा ज्ञात बॉक्साइटचा पुरवठा तीन वर्षांपेक्षा जास्त पुरणार नाही. अमेरिकेला दोन तृतीयांश अल्युमिनमसाठी जमेका आणि सुरिनम ह्यांवर विसंबावे लागते. पोलादनिर्मितीसाठी लागणारे क्रोमिअम अमेरिकेजवळ स्वतःचे असे फारसे नाही. अमेरिका स्वतःला लागणाऱ्या कच्च्या लोखंडापैकी एक तृतीयांश आयात करते, कारण अमेरिकेतील कच्चे लोखंड चांगल्या दर्जाचे नाही.

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या समस्येचा जपानवर भयंकर परिणाम झाला आहे. जपान ऑस्ट्रेलियाकडून कच्चे लोखंड घेतो,

अमेरिकेकडून कोळसा आयात करतो, इराणच्या आखाताजवळील देशांकडून तेल आणतो आणि उत्कृष्ट दर्जाचा माल बनवून तो जगभर खपवून आयातीचे पैसे देऊ शकतो. जपानजवळ स्वतःची खनिज संपत्ती नाही. जपानमध्ये होणारी आयात बऱ्याच अंशी कमी झाली तर जपानची अर्थव्यवस्था कोलमडून जाईल. जपानमध्ये दरसाल १५% ने चलनवाढ होत राहिली आहे; त्याला कच्चा माल कमी पडून उत्पादन घटण्याची जोड मिळाली तर तो देश भयानक आपत्तीत सापडेल.

"लॅटिन अमेरिकेच्या हातात जगाचे भवितव्य आहे, कारण त्याची नैसर्गिक संपत्ती विपुल आहे." असे अर्जेंटिनाच्या प्रेसिडेंटने फुशारकीने म्हटले आहे.

तांबे निर्यात करणारांनी संघटना केली तर ते तांब्याची किंमत वाटेल तेवढी वाढवू शकतील आणि त्याच्या मोबदल्यात राजकीय सवलती मिळवू शकतील. परदेशांना अधिकाधिक आर्थिक साहाय्य करणे, बड्या औद्योगिक देशांना क्रमप्राप्तच होईल, कर्जे देणे भाग पडेल आणि परराष्ट्रीय धोरणही बदलावे लागेल; त्याखेरीज त्यांना आवश्यक त्या कच्च्या मालाची आयात चालू राहणारच नाही. कच्च्या मालाच्या किमतीमधील किती वाढ औद्योगिक देशांना पचविता येईल आणि तीही किती काळ, हा प्रश्नच आहे.

अरब देशांनी दाखवून दिले आहे की किमती वाढवून आणि त्यात भेदाभेद करून औद्योगिक देशांत फूट पाडता येते. लॅटिन अमेरिकन देश युरोपपेक्षा अमेरिकेला जास्त महाग कच्चा माल विकून जास्त मदत पदरात पाडून घेऊ शकतील आणि अमेरिकेचे लॅटिन अमेरिकन देशांबाबतचे धोरण बदलण्यास भाग पाडू शकतील.

तृतीय जगात आतापर्यंत खासगी कंपन्या व्यवहार करीत होत्या, त्यामुळे पाश्चात्त्य देशांवर फारसा विपरीत परिणाम झाला नाही. परंतु त्या कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झपाट्याने होत आहे, त्या कारणाने पाश्चात्त्य देशांची अर्थव्यवस्थेमधील दुर्बलतेची स्थाने स्पष्ट दिसू लागली आहेत. युरोपच्या भूतपूर्व वसाहती स्वतंत्र झाल्यामुळे त्या आपली शक्ती केवळ किमती वाढवूनच नव्हे तर नियंत्रणे लादून दाखवू लागल्या आहेत.

आतापर्यंतचा इतिहास असा सांगतो की राजकीय आणि लष्करी दृष्टीने असमर्थ देश प्रबळ देशांवर फार काळ दडपण आणू शकत नाहीत. प्रगत देश लोकशाही आणि वसाहतविरोधी धोरणाची भाषा अद्याप बोलत आहेत, तोपर्यंत ठीक. न जाणो, त्यांचा पुरवठा अशक्य करून टाकण्यात आला तर पाश्चात्त्य देशांपैकी काही देश तरी लष्करी सामर्थ्य वापरून भूतपूर्व वसाहतींवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतीलही!

औद्योगिक आणि निसर्गसंपन्न परंतु अविकसित अशा देशांतच तणाव निर्माण होत आहे, असे नाही; औद्योगिक देशही एकमेकांविरुद्ध धोरणे आखू लागतील; अविकसित देशांचा भलेपणा मिळविण्यासाठी त्यांना राजकीय पाठिंबा देऊ लागतील. लॅटिन अमेरिका जर अमेरिकाविरोधी झाली तर अमेरिकेची औद्योगिक उपासमार झाल्याविना राहणार नाही. अमेरिकेची कच्च्या मालाची गरज त्याच्या दक्षिणेकडील देशांकडूनच भागविली जात आहे, पण युरोपातील कित्येक देश कच्च्या मालाचा तुटवडा नाहीसा करण्यासाठी लॅटिन अमेरिकेतील देशांना चुचकारीत आहेत, त्याचे राजकीय परिणाम अनिवार्य आहेत.

□


दीपावली अभीष्टचिंतन!

सहकार्याचा मंगल प्रकाश बँकेच्या कार्यक्षेत्रातील अनेक उद्योगधंद्यांत व घरकुलांत सुख, समृद्धी व समाधान नांदवित आहे!

स्थापना १९४२ ] दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगाव [ फोन नं १०५१५.

राज्यातील अग्रेसर सहकारी बँक —

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ४,४४,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | १५,७२,२०० |
| ठेवी | रु. | १,१६,०६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४३,११,६०० |
| इ. स. १९७३–७४ चा निव्वळ नफा | रु. | ४,१४,३४५ |
| सतत चार वर्षे डिव्हिडंड | | १२% |

–: संचालक मंडळ :–

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे, चेअरमन.
श्री. बाळकृष्ण गुरुनाथराव मातकांडे, व्हा. चेअरमन
श्री. गोविंदराव मेघोजीराव दळवी, डायरेक्टर
श्री. शिवाजीराव यल्लोजीराव काकतकर, „
श्री. शंकरराव मिनाजीराव कुडे, „
श्री. श्रीकांत केदारजी कणबरकर „
श्री. सदाशिवराव भरमाजीराव हंगिरकर „
श्री. रामचंद्रराव गुंडोजीराव ताशिलदार „
श्री. रघुनाथराव रामचंद्रराव शिंदे „

श्री. आर. ए. पाटील, बी.ए., बी.कॉम, एलएल.बी. मॅनेजर

## उच्च शिक्षण आणि तरुण पिढीचा जीवनक्रम

### कॉलेजातील विद्यार्थ्यांस उपदेश

चालू सालचा अभ्यासक्रम सुरू होण्याच्या दिवशी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रो. काळे ह्यांचे व्याख्यान झाले. एकंदर जग व त्यात मुख्यत्वेकरून हिंदुस्थान देश, ह्यामधल्या सध्याच्या भीषण परिस्थितीत तरुण पिढीस उच्च शिक्षणाचा उपयोग कसा करून घेता येईल हा त्यांच्या प्रतिपादनाचा विषय होता. त्यांचे ठळक मुद्दे खाली दिले आहेत :—

(१) राजकीय, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या जगाची अलीकडे जी भयंकर हलाखीची स्थिती झाली आहे, तशी मानवजातीच्या इतिहासात पूर्वी क्वचित झाली असेल. महायुद्ध हे शेवटचे युद्ध होणार, अशी भाषा ऐकू येत होती आणि रामराज्याची सुखे जगास त्यापुढे अनुभवावयास मिळणार, अशी अपेक्षा उत्पन्न करण्यात आली होती. युद्ध संपून सोळा वर्षे झाली असली व राष्ट्रसंघाचे शांततेचे व सहकार्याचे कार्य चालू असले तरी आज चोहोकडे युद्ध व भावी युद्धाची तयारी हीच दिसत आहेत. फौजा व आरमारे वाढली आहेत व राष्ट्रांमध्ये परस्परांविषयी साशंक वृत्ती वृद्धिंगत झाली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार बसला आहे, उद्योगधंदे मंदीत आहेत, बेकारी 'मी' म्हणते आहे आणि राष्ट्रांमध्ये कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी अवस्था होऊन गेली आहे.

(२) हिंदुस्थान देश अगोदरच दरिद्री व त्यात जागतिक मंदीची भर पडली. मग येथील हलाखीस काय विचारावे ? बहुसंख्याक हिंदी लोकांचा शेतीचा धंदा नुकसानीत चालत आहे, कर्जबाजारीपणा वाढला आहे आणि बेकारांची तर गणती नाही. व्यापार व उद्योगधंदे ह्याविषयी बोलावयासच नको.

(३) जागतिक रोगावर जागतिक तोडगा सापडत नाही, असे दिसताच राष्ट्रे आपापल्यापुरत्या पुनर्घटनेच्या योजना आखून त्या अमलात आणीत आहेत. हिंदुस्थानासाठी होत असलेल्या नव्या राजकीय घटनेत असल्या धडाडीच्या धोरणाची अपेक्षा करणे निष्फळ दिसत आहे. कोणत्याही देशांत राष्ट्रीय पुनर्घटना व प्रगती घडवून आणण्याची जबाबदारी शेवटी तरुण पिढीवर येऊन पडत असते, आणि म्हणून तिच्या शिक्षणासंबंधी प्रत्येक राष्ट्र विशेष काळजी घेते.

(४) हिंदुस्थानातील उच्च शिक्षणाची पद्धती, वर सांगितलेल्या दिशेने व्हावयाच्या राष्ट्रीय संघटनेच्या कार्यास परिपोषक अशी आहे काय ? असा येथे प्रश्न उद्भवतो. शिक्षणाची सूत्रे ज्यांच्या हाती आहेत, अशा लोकांमध्ये ह्याबाबतीत तीव्र मतभेद असलेला आपणास आढळतो. शिक्षणामध्ये विशिष्टीकरण आणि विभागणी इतक्या थरास जाऊन पोहोचली आहे की, पदवीधरांमध्ये धंदेव्यवसाय आणि व्यावहारिक व धनोत्पादक स्वरूपाची कामे ह्यास लायक असे होतकरू तरुण बाहेर पडणे मुश्किलीचे होऊन गेले आहे. गेल्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांची 'कत्तल' झाल्याने शिक्षण व व्यावहारिक जीवन ह्यांच्या संबंधाचा प्रश्न चर्चेसाठी पुन्हा जोराने पुढे आला आहे.

(५) विश्वविद्यालयांमध्ये विद्वान, ज्ञानी आणि शोधक अशी माणसे निर्माण होणे अगत्याचे आहे, ह्यांत संशय नाही. परंतु ज्या शिक्षणाने व्यावहारिक जीवनास लायक असे तरुण तयार होत नाहीत, ते शिक्षण व्यर्थ होय, असे सर्वसाधारणपणाने म्हणण्यास हरकत नाही. देशाच्या बदलणाऱ्या स्थितीस तोंड देण्याची विद्यार्थ्यांत पात्रता व धमक उत्पन्न करणारे शिक्षणच खरे आणि जिवंत शिक्षण होय. बाकीचे शिक्षण आत्मवंचना आहे.

(६) ह्या दृष्टीने शिक्षण-व्यवस्थेत अत्यावश्यक असलेली सुधारणा घडवून कोण आणणार ? सरकार, विश्वविद्यालय, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी ह्या सर्वांच्या मिळून हातातली ही गोष्ट आहे. तथापि, इतरांनी हा प्रश्न हाती घेऊन धसास लावण्याची वाट न पाहता शिक्षक व विद्यार्थी ह्यांनीच आपल्या शक्तीप्रमाणे त्यासंबंधाने शिकस्तीचा प्रयत्न करावा असे आज माझे तुम्हांस सांगणे आहे.

(७) ह्या कॉलेजाला उत्कृष्ट ग्रंथालय लाभले आहे. परीक्षेस नेमलेल्या पुस्तकात रुतून न बसता सर्व प्रकारचे ज्ञान वाढवा. जगात काय चालले आहे; त्याचे नीट मनन करा आणि राष्ट्रीय जीवनासंबंधाने 'मला त्याचे काय करावयाचे आहे ?' असे म्हणून उदासीन राहू नका. नाना तऱ्हेचे, उघड्या हवेतले खेळ खेळून प्रकृति सुदृढ ठेवा. तुमचे कॉलेजचे पार्लमेंट आहे, वादविवाद मंडळ आहे, क्लब आहेत, असोसिएशन्स आहेत; तेथे शिस्तीच्या नागरिकत्वाचे व लोकसेवेचे धडे घ्या.

(८) पुढच्या आयुष्यांत उपयोगी पडतील असे गुण कॉलेजातल्या जीवनक्रमांत मिळवा. वेळेचे महत्त्व, नियमांप्रमाणे वागण्याची सवय, बकशीरपणा, संघटित कार्यपद्धति, ह्या गोष्टी अवश्य आपल्याशा करा. शिस्त आणि संघटना ह्यांची आज आपल्या देशास फार जरुरी आहे व त्याची आपणामध्ये वाण आहे. तरी हे वैगुण्य काढून टाका. स्वातंत्र्य म्हणजे भरमसाटपणा किंवा आचरटपणा नव्हे, हे लक्षात ठेवा. चार मंडळींत वागावयाचे व त्यांस वागवून घ्यावयाचे हा गुण निश्चयाने अंगी बाणवा. स्वतःचे पोट भरून आपल्या देशबांधवांस त्यांचे पोट भरण्यास साहाय्य करणे हे तुमच्यापैकी प्रत्येकाचे कर्तव्य आहे, ह्याची जाणीव ठेवून पुढच्या आयुष्यांतील झगड्याची मानसिक, शारीरिक व बौद्धिक तयारी करा. ह्या सर्व कार्यक्रमात शिक्षकांचा सल्ला व सहाय्य घ्या. ते आनंदाने तुमच्याशी सहकार्य करतील.

अर्थ, २६-६-१९३५

---

### स्वयंसंतुष्ट

संतप्त बँकमॅनेजर : "आज तुम्ही पुन्हा वीस मिनिटे उशिरा आला. बँकेचं काम कधी सुरू होतं तुम्हाला माहीत नाही का ?"

नवीन नोकर : "मी येतो तेव्हा कामच चाललेलं असतं !"

## दि कागल को-ऑपरेटिव्ह बँक लि. कागल

स्थापना १९१७

अर्थ पाक्षिकाने
गेल्या ४० वर्षांत
आर्थिक क्षेत्रांत पार पाडलेल्या
वैशिष्टयपूर्ण कामगिरीबद्दल त्यास

**मानाचा मुजरा**

जी. एच. शिंदे — मॅनेजर
डी. के. ढवण — व्हा. प्रेसिडेंट
एस. डी. मरमकर — प्रेसिडेंट

## दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जळगाव

बँकेचे सर्व ठेवीदार; ग्राहक, हितचिंतक व सहकारी
बंधूंना नूतन वर्षानिमित्त
दीपावली शुभचिंतन

कु. म. पाटील, (एम. एल. ए.)
चेअरमन

गो. म. शहाणे — व्यवस्थापक
प्र. ए. पाटील — व्हा. चेअरमन

## कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. पेण

तार: सागर बँक () केंद्र कार्यालय: पेण. () फोन: पेण नं. २५
() जिल्हा–कुलाबा ()

★ शेतकऱ्यांच्या विश्वासास व श्रद्धेस पात्र ठरलेली एकमेव अग्रगण्य बँक.

★ जिल्ह्यातील ३२ शाखांद्वारे वैशिष्ट्यपूर्ण सेवा बजावीत आहे.

प. वि. म्हात्रे,
बी. ए., एल्. डी. सी.,
मॅनेजर.

के. बी. पाटील
चेअरमन.

## जनता सहकारी बँक लि., पुणे.

(स्थापना :– १९४९)
१४४४, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, पुणे २.
फोन नं. ५५१५८, ५५१५९, ५५४००

बँकेच्या नवीन ठेवयोजनेनुसार बारा महिन्यांकरिता हप्तेबंद खाते उघडल्यास मुदत संपल्यावर आपल्या रकमेशिवाय एक हप्त्याची रक्कम व्याजापोटी देऊ.

अशा अनेक ठेवयोजनांची माहिती घेण्यासाठी आजच भेटा.

द. शं. जमदग्नि
कार्यकारी संचालक

# न्यायमूर्ती रानडयांची दूरदृष्टी

## साखरेच्या धंद्यास सरकारी प्रोत्साहन हवे

(टाइम्स ऑफ इंडिआ—बुधवार, ७ जून, १८९९)

मुंबई सरकारच्या शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर, मि. मॉलिसन ह्यांनी साखरेच्या धंद्याविषयी वरिष्ठ सरकाराकडे जो खलिता पाठविला आहे त्यात त्यांनी पुढील मते प्रदर्शित केली आहेत. 'गुळाचा भाव सरासरीने एवढा असतो की, एकंदरीने साखर तयार करून ती विकण्यापेक्षा गुळाच्या धंद्यातच अधिक किफायत होते. काकवी अगर इतर पोट-जिन्नस ह्यांच्या विक्रीनेही साखरेच्या धंद्यांत होणारी कमी निपज पूर्णपणे भरून येत नाही. अगदी आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने चालविलेला साखरेचा कारखानाही फायदेशीर होऊ शकत नाही, हे मुंढव्याच्या कारखान्यांतील अनुभवावरून सिद्ध होते.' ही मते वस्तुस्थितीचा पूर्णपणे विपर्यास करणारी आहेत. गुळाचा भाव सामान्यतः १२ ते १५ रुपये पल्ला असून साखरेचा भाव २४ ते ३० रुपये पल्ला असा आहे. कोल्हापूरच्या तांबूस साखरेस काही जुन्या भावनेचे लोक अधिक किंमत देतात. परंतु ही साखर म्हणजे गूळ नव्हे, आणि त्या साखरेस येणारा भावही आकस्मिक स्वरूपाचा आहे. ह्या गोष्टी डेप्युटी डायरेक्टरसाहेबांच्या नजरेतून सुटल्या आहेत. पुणे व मुंबई येथील बाजारांतील गुळाचे व साखरेचे भाव पाहिले तर गुळापेक्षा दीड-दोन पट अधिक भावाने साखर विकली जाते असे दिसेल. साखरेपेक्षा गुळाला भाव चांगला येतो म्हणून साखरेचा धंदा येथे चालणे शक्य नाही, हे सरकारी खलित्यांतील मत सर्वस्वी भ्रामक ठरते.

सेट्लमेंट कमिशनर, मि. पोलन, ह्यांना पुण्याची साखर चांगल्या प्रतीची निघते व तिला भावही चांगला येतो हे मान्य असूनही त्यांनी मॉलिसन साहेबांच्या मताची री ओढली आहे हे आश्चर्य होय. मुंबईचे कलेक्टर, मि. मॉरिसन, ह्यांनाही येथील साखर उत्कृष्ट वाटली. परंतु पोलन साहेबांचा युक्तिवाद असा की, शहराबाहेरील लोकांस साखरेपेक्षा गूळच आवडतो व म्हणून परदेशी साखर कितीही प्रमाणात आली तरी गुळाच्या धंद्याचे व उसाच्या लागवडीचे नुकसान होणार नाही. परदेशी साखरेची आयात वाढत असून त्या प्रमाणात येथील निपज कमी होत आहे हे मागील लेखातील आकड्यांवरून सिद्ध झाले आहे. मि. ओझॅने ह्या शेतकी खात्याच्या माजी डायरेक्टरांनी मुंढव्याच्या साखरेची प्रशंसा केली होती व गुळाचा भाव कमी असल्याने साखरेची निपज करणे हेच फायदेशीर आहे असे आपले मत व्यक्त केले होते. साखरेचा धंदा चांगला चालला तरच उसाच्या लागवडीस खरे उत्तेजन मिळेल हे ओझॅने साहेबांनी ताडले होते. साखरेच्या उत्तम नमुन्यास ओझॅने साहेबांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली व सरकारने ह्या धंद्यास मदत करणे सर्वथैव आवश्यक आहे असे त्यांनी प्रतिपादिले. प्रत्यक्ष बक्षिसीच्या स्वरूपाने व इतर मार्गांनी मॉरिशस व युरोपियन राष्ट्रे येथील सरकार आपल्या साखरेच्या धंदेवाल्यास पुष्कळच मदत करतात. परराष्ट्रांच्या ह्या अनुभवावरून असे सिद्ध झाले आहे की साखरेची निपज करताना जे इतर पोटजिन्नस निघतात त्यांचा दारूच्या उत्पादनाकडे उपयोग केल्यावेरीज साखरेचा मुख्य धंदा कायमचा फायदेशीर होत नाही.

चुकीने असो किंवा बुद्धिपुरःसर असो, हिंदुस्थान सरकारने सदरहू सवलत येथील कारखानदारांस नाकारलेली आहे. मि. मिनचिन हे मद्रासेतील एक युरोपियन कारखानदार मद्रास सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांची प्रशंसापत्रे घेऊन संयुक्त प्रांतात साखरेचा कारखाना काढण्याच्या इराद्याने गेले असता तेथील सरकारने त्यास दारू गाळण्याचा पोटधंदा चालविण्यास परवानगी देण्याचे नाकारले. सरकारच्या अबकारी खात्याची मक्तेदारी हीच साखरेच्या धंद्याच्या वाढीस जाचक होत आहे. लॉर्ड कर्झन साहेबांचे धोरण एकंदरीत साखरेच्या धंद्यास अनुकूल असूनही प्रांतिक सरकारांच्या अबकारी खात्यांनी हिंदी शेतकरी, मजूर, कारखानदार व राष्ट्रीय सरकार ह्या सर्वांच्या हिताच्या अशा एका धंद्यास सवलती देण्याचे नाकारावे हे अनिष्ट होय. साखरेचा धंदा वाढण्यापेक्षा दारूबाजीचे व्यसन वाढणे हे सरकारास अधिक इष्ट वाटत असल्यास निराळे!

अबकारी खात्याच्या नियमास धरून ज्या अनेक बाबतींत मदत करता येण्यासारखी होती तीही मुंबई सरकारने मुंढव्याच्या कारखान्यास दिली नाही. असे असूनही जेव्हा जेव्हा गुळाचा भाव माफक होता तेव्हा तेव्हा हा कारखाना चालू राहिला व त्यातून उत्कृष्ट साखरेची निपज झाली हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. सरकारच्या लष्करी खात्याकरिता ह्याच कारखान्यातून अनेकवार साखरेची खरेदी करण्यात आली आहे. गेल्याच वर्षी सुमारे ५० हजार रुपयांच्या साखरेची अशी खरेदी झालेली आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की संयुक्त प्रांतातील युरोपियन कारखानदारांपेक्षा पुण्यातील कारखानदाराने कमी भावात माल दिला. कर्नल डॉब्स् ह्या लष्करी अधिकाऱ्याने चांगल्या तऱ्हेने चालविलेल्या व उत्तम साखर तयार करणाऱ्या अशा कारखान्यांची ह्या भागात फार जरुरी आहे, असे आपले मत नमूद करून ठेवले आहे. वास्तविक एकाहून अधिक कारखाने ह्या भागात निघू शकतील असे क. डॉब्स् ह्यांस वाटते. लष्कर व बाजार ह्यांच्या मागणीवर साखरेचा कारखाना कायमचा फायदेशीर होण्याची खात्री नसते, म्हणून त्यास दारू गाळण्याच्या पोटधंद्याची जोड देणे आवश्यक ठरते. साखरेच्या धंद्यास खरी अडचण आहे ती हीच; मॉलिसन साहेबांनी दाखविलेली गुळाच्या भावासंबंधीची अडचण निवळ काल्पनिक आहे.

मद्रास सरकारने आपल्या कारखानदारांस दारू गाळण्यासंबंधी काही सवलती दिल्या आहेत. संयुक्त प्रांताच्या सरकारनेही शहाजनपूर येथील कारखानदारास बरीच सवलत दिली आहे. मि. मिन्चिन ह्यांच्याच मद्रासेतील कारखान्यात तयार केलेली दारू त्या प्रांतात परदेशी दारू म्हणून विकली जाते. ह्या व इतर उदाहरणांवरून असे स्पष्ट दिसते की अबकारी खाते साखरेच्या धंद्याच्या वाटेत ज्या अडचणी आणू पाहात आहे त्या सरकारी धोरणात योग्य तो बदल झाल्यास सहज दूर होतील. पुण्यातील कारखानदारास एका दुसऱ्या ठिकाणचा दारूमक्ता देण्यात आला आहे. साताऱ्याऐवजी पुणे जिल्ह्यात दारूची विक्री करता आली तरच दारू गाळणे फायदेशीर होऊन साखरेच्या मुख्य धंद्यास मदत होईल. पुण्याखेरीज इतर ठिकाणच्या कारखान्यांसही अशाच सवलती दिल्या पाहिजेत. मॉरिशस सारख्या परदेशात ह्या बाबतीत जवळ जवळ मुळीच निर्बंध घालण्यात येत नाहीत. हिंदी व युरोपियन कारखानदारांच्या विनंतीचा येथील सरकारने अनुकूल निकाल करणे आवश्यक आहे. सुमारे ४० वर्षांपूर्वी जुन्नर येथे डिकिन्सन नावाच्या वेस्ट इंडीज बेटातील एका गृहस्थाने साखरेचा कारखाना काढला होता, त्या वेळी त्यास दारू गाळण्याची परवानगी देण्यात आली होती. कारखानदाराने साखरेच्या निपजेकडे दुर्लक्ष करून दारू गाळण्याचे अंग वाढवू नये ह्याकरिता उसाच्या अमुक इतके टक्के पक्की साखर तयार केलीच पाहिजे असा सरकारला नियम करता येईल. वास्तविक साखरेचा नाश करून दारू गाळण्याचा मूर्खपणा कोणीही करणार नाही. परंतु जरूर वाटल्यास ह्या व इतर बाबतींत निर्बंध घालून सरकारने साखरेच्या कारखानदारास दारू गाळण्याची मुभा ठेवल्याखेरीज पुण्याचाच काय, परंतु मुंबई इलाखा व एकंदर हिंदुस्थान येथील साखरेचा धंदा ऊर्जितावस्थेस येणार नाही. केवळ परदेशी साखरेच्या आयातीवर जकाती बसवल्याने कार्यभाग होणार नाही; सरकारच्या अबकारी धोरणातही बदल झाला पाहिजे. लोकांची साखरेस असलेली मागणी एकसारखी वाढत जाणार व सरकारने ह्या सवलती दिल्यास हिंदुस्थानास साखरेच्या बाबतीत परदेशांकडे पाहण्याची जरूर राहणार नाही. -अर्थ ३०-१-३५

---

### दुर्मिळ स्वाक्षरी

एका स्थानिक इस्पितळाला मदत मिळविण्यासाठी एक नर्स हिंडत होती. तिने एका प्रस्यात सिनेमा नटाकडून २५० रुपयांचा चेक मिळवला व आपली बहादुरी दाखविण्यासाठी मोठ्या ऐटीने तिने तो चेक सेक्रेटरीपुढे धरला. ती म्हणाली, "पहा, किती मोठ्या रकमेचा चेक मी आणला." त्यावर सेक्रेटरी म्हणाले, "वा छान! पण चेकवर सही दिसत नाही!" तरुणीने न डगमगता उत्साहाने उत्तर दिले, "मला माहीत आहे. चेकवरची सही कापून मी माझ्या स्वाक्षऱ्यांच्या संग्रहात दाखल केली आहे."


दीपावली हार्दिक अभिनंदन

साठे गादी कारखाना

टेलि. ५७७५६

४१८ नारायण पेठ,
पुणे ४११०३०

शाखा:—कोल्हापूर, बडोदा, रत्नागिरी



दीपावली अभीष्टचिंतन

दि कोल्हापूर केन शुगर वर्क्स लिमिटेड

प्रत्येक कुटुंबाची आवड
शुभ्र दाणेदार, मोहक व गोडच गोड साखर.
भारतातील एक प्रमुख अद्ययावत कारखाना.

दि कोल्हापूर केनशुगर वर्क्स लिमिटेड,
कसबा बावडा, कोल्हापूर ४१६००६

(जयेंद्र)

## सुशिक्षित बेकारांची हृदयद्रावक कहाणी

### पन्नास जागा आणि दहा हजार अर्ज

हिंदुस्थानात पाच कोटी रुपये भांडवलाची रिझर्व्ह बँक स्थापन होणार हे ऐकून किती तरी सुशिक्षित तरुणांची मने आशेने उचंबळून आली! एवढ्या मोठ्या संस्थेत, कारकून, टायपिस्ट, हिशेबनीस इत्यादी हजारो नोकरांची जरूर लागून, त्यापैकी एक जागा आपल्या वाट्यास येण्यास पंचाइत पडू नये असे कित्येकांच्या मनाने घेतले, आणि बँकेकडे अर्ज जाण्यास सुरुवात झाली. तूर्त कोणत्याच नेमणुका करण्याचा विचार नाही, सबब नोकरीसाठी अर्ज करू नयेत अशी इशारत उमेदवारांस मिळाल्यामुळे पुष्कळांची निराशा झाली तरी अनेक जण जास्त चौकशीच्या आणि वशिल्याच्या खटपटीत होतेच. काही झाले तरी रिझर्व्ह बँकेस नोकर लागणार होते, परंतु त्या संबंधाने आत काय चालले आहे, हे कळण्यास बाहेर फारसे साधन नव्हते. हिंदुस्थान सरकारच्या चलन-खात्याचा कारभार रिझर्व्ह बँकेकडे यावयाचा असल्यामुळे त्या खात्यातून मोकळे झालेल्या लोकांमधून एक हजार इसम आणि इंपीरिअल बँकेच्या सरकारी कर्ज खात्यातले पाचशे नोकर रिझर्व्ह बँकेकडे वर्ग झाले आहेत असे समजते. यावरून नवीन माणसांची मुळीच भरती झाली नसेल किंवा होणार नाही असे मानण्याचे कारण नसले तरी वरील योजनेमुळे नेमणुकांचे क्षेत्र अत्यंत आकुंचित झाले आहे हे खास. वरील प्रकारची वर्गावर्गी झाली नसती तरी बेकारी आणखी वाढली असती हे उघड आहे.

परंतु ह्या संबंधातली हृदयद्रावक कहाणी आहे ती निराळीच आहे, आणि ती एका इंग्रजी साप्ताहिकातल्या प्रेमळ लेखकाने सांगितली आहे. ती थोडक्यात अशी आहे :— रिझर्व्ह बँकेस तात्पुरत्या जादा कामाकरिता सुमारे पन्नास माणसे हवी होती. काम भरपूर पडून रोजी दोन रुपयांचा तनखा मिळेल असे जाहीर करण्यात आले होते; आणि फक्त पदवीधरांकडूनच अर्ज मागविले होते. कलकत्त्यात विशिष्ट अर्जदारांनी जातीने हजर राहावयाचे अशी घोषणा होती. रोजी दोन रुपये ह्याप्रमाणे चारपाच आठवड्यांची कमाई करण्यास किती पदवीधर सज्ज व्हावे! असल्या भिकार नोकरीसाठी १०,००० अर्जदार ठरलेल्या जागी व नेमलेल्या वेळी उपस्थित झाले! कलकत्ता शहरातून व बंगालच्या चारी दिशांहून उमेदवार आले. निवडणुकीच्या जागी विलक्षण गर्दी उसळली, आत किंवा बाहेर जाण्याची मुष्किल झाली आणि लोकांचा जीव गुदमरू लागला. गर्दी मोडण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागली आणि त्यांनी इमारत व रस्ते मोकळे केले. स्टेनोग्राफरची एक जागा भरावयाची होती आणि तिच्याकरिता आठशेपेक्षा अधिक अर्ज आले. रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता येथील कचेरीसाठी कायद्याचे ज्ञान असलेला एक मनुष्य हवा होता, आणि उमेदवारांनी जातीने अर्ज देऊ नयेत असा निर्बंध असताही लांबलांबच्या प्रांतांतून लोकांनी कलकत्त्याची यात्रा केली.

सुशिक्षित तरुणांनी नोकरीकरिता अशी व्यर्थ धडपड केली असता कित्येक वेळा तो थट्टेचा विषय होतो. तरुणांनी हाडांची काडे करून आणि वडिलांची मर्यादित मिळकत खर्च करून अनेक वर्षे शिक्षण घ्यावे आणि शेवटी बेकारीच्या भोवऱ्यात सापडून अन्नास मोताद व्हावे ह्यापेक्षा अधिक दुःखदायक देखावा कोणता असू शकेल? पण ह्यास उपाय काय? रिझर्व्ह बँकेसारखी संस्था निर्माण झाली असता तिचे फळ, लोकांस काम मिळावे, उद्योगव्यापार वाढावा आणि जनतेची राहणी सुधारण्यास साहाय्य व्हावे हेच असले पाहिजे. पण शिक्षण आणि उद्योगधंदे व बँकिंग ह्यांच्या प्रगतीचा एकमेकांशी मेळच नाही अशी आज स्थिती आहे. व्यापार-उदीमाचा विस्तार झाल्यावाचून नवीन काम निर्माण होत नाही आणि आजकालच्या शिक्षणाने ह्या कार्यास लागणारी पात्रता व प्रवृत्ती उत्पन्न होत नाही. औद्योगिक प्रगतीस विधायक रीतीने साहाय्य करणे हे सरकारच्या कर्तव्य क्षेत्रात येत नाही असे सर जेम्स ग्रिगसारखे जबाबदार अधिकारी ठासून सांगत आहेत आणि त्यांच्याच इंग्लंडमधील सरकारने बेकारीचे निवारण व्हावे आणि राष्ट्रीय उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावे म्हणून काय प्रयत्न चालविला आहे त्याकडे कानाडोळा करीत आहेत.

अशा स्थितीत, लोकांनीच डोळे उघडून परिस्थितीचे निरीक्षण करणे, संघशक्तीने लहान मोठे धंदे काढणे, तरुणांस स्वावलंबी, व्यवहारप्रिय आणि कल्पक बनवील अशा रीतीने शिक्षणक्रम बदलणे आणि देशी उद्योगास व व्यापारास सर्वतोपरी साहाय्य करणे हा बहुविध कार्यक्रम उत्साहाने हाती घेऊन निश्चयाने चालविल्यावाचून गत्यंतर नाही. मिळेल तितकी सरकारची मदत, बाकी स्वावलंबन, श्रम आणि संघटन, अशी समाजाची सामान्य प्रवृत्तिच व्हावयास पाहिजे. धनोत्पादन, व्यवहार, बुद्धिस्वातंत्र्य आणि साहस ह्यांकडे तरुणांचा कल निश्चित जाईल अशा प्रकारच्या शिक्षणाची तरतूद करणे आणि ते शिक्षण घेणारास पुढे आर्थिक व्यवहारांस योग्य क्षेत्र उपलब्ध व्हावे म्हणून मागणी, भांडवल आणि संघटन ह्यांची व्यवस्था लावणे ही दुहेरी जबाबदारी आजच्या प्रौढ पिढीवर आहे. ती यथासांग पार पडेल तरच शिक्षित बेकारीचा प्रश्न सुटेल. प्रचलित मंदी दूर झाली तरी सुशिक्षितांच्या वाढत्या संख्येचे काय करावयाचे ही विवंचना राहणारच. म्हणून त्या संकटाच्या मुळाशीच जाऊन त्यावर कायमचा उपाय योजला पाहिजे. औद्योगिक आणि व्यापारी व्यवसायास अनुकूल असे शैक्षणिक, संस्कृतिमूलक आणि सामाजिक वातावरण निर्माण करणे हा पुढील सर्व कार्यक्रमाचा पाया होय. महाराष्ट्रीयांनी संघटनेचे कार्य इतर क्षेत्रांत स्वार्थत्यागपूर्वक रीतीने करून दाखविले आहे. तशीच संघटनात्मक कामगिरी या क्षेत्रात त्यांच्या हातून का होऊ नये?

अर्थ १०-५-३५

◆ इचलकरंजीच्या कर्तबगार व होतकरू कारखानदार व्यापारी बंधूंच्या उत्कर्षास साहाय्यभूत झालेली व हसतमुखाने आपले स्वागतास सदैव तयार असलेली इचलकरंजीतील एकमेव नागरी बँक ◆

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.,

इचलकरंजी

| | |
|---|---|
| इंडस्ट्रिअल इस्टेट शाखा<br>स्थापना १।८।७३<br>फोन २६७६ | हेड ऑफिस राजवाडा रोड,<br>स्थापना २६।८।३०<br>फोन नं. २२३६ व |

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर्स भांडवल | २०,००,००० |
| भरलेले शेअर्स भांडवल | १६,८३,००० |
| रिझर्व्ह फंडस् | ६,४६,००० |
| इतर फंडस् | ११,१०,७०० |
| खेळते भांडवल | १,३६,८३,८०० |
| ठेवीचे दर:—चालू | १ टक्का |
| सेव्हिंग्ज | ५.५० टक्के |
| मुदत ठेव | ७.५० ते १०.५० टक्के |
| कॅश डिपॉझिट | ६.०० ते ७.२५ टक्के |
| कर्जाचा दर | ११ ते १५ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

रिकरिंग डिपॉझिट, विद्यार्थी सेव्हिंग्ज वगैरे ठेवींच्या आकर्षक योजनांसाठी व भरघोस व्याजासाठी समक्ष चौकशी करावी. अद्ययावत् लॉकर्सची सोय उपलब्ध केली आहे.

श्री. भी. ज. दांडेकर — मॅनेजर
श्री. स. मा. मुरदंडे — चेअरमन

## बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी

घोडे गल्ली, सोमवार पेठ, बार्शी (जि. सोलापूर)

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी<br>बार्शी : २०२<br>वैराग : ४२ | स्थापना – १९०६ | शाखा<br>वैराग<br>ता. बार्शी |

३० जून, १९७४ अखेरची स्थिती

| | |
|---|---|
| भागभांडवल | रु. २,९७,४४० |
| गंगाजळी | रु. ४,८२,०६५ |
| ठेवी | रु. ३०,१७,७८२ |
| गुंतवणूक | रु. १०,५९,४२५ |
| खेळते भांडवल | रु. ४३,१५,५३८ |

सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली आमचे सभासद, खातेदार व हितचिंतकांस सुखाची व समृद्धीची जावो.

व. ह. उटगीकर, B. Com., मॅनेजर
म. पां. नारकर, व्हा. चेअरमन
म. ज. कुलकर्णी, चेअरमन

## दि पूना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सरस्वती विलास बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
पुणे ४११०३० यांचेतर्फे

अर्थ पाक्षिकास
या
सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रणाम

म. म. नलावडे
कार्याध्यक्ष

### ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट

शेतकऱ्यांच्या शेती व आनुषंगिक कर्जविषयक गरजा भागविणारी शेती पतपुरवठा पद्धती.
कृषि औद्योगिक क्रांतीचे अग्रदूत ठरलेले सहकारी साखरकारखाने.
विविध प्रक्रिया उद्योग.
एकाधिकार धान्य व कापूसखरेदी.
राज्यांतर्गत द्रव्य विनिमययोजना.
शेतीची अवजारे निर्माण करणारी सहकारी इंजिनिअरिंग सोसायटी.
सुसज्ज सहकारी रुग्णालये.
बलुतेदार, जंगल कामगार, शेतमजूर यांच्या सहकारी संस्था.
या व यांसारख्या अनेक सहकारी उद्योग प्रकल्पांची नांदी प्रथम महाराष्ट्रात म्हटली गेली आणि ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट घडून आला.

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

९ बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

## सहकारी कार्यकर्त्यांस संदेश

### आकड्यांची पोपटपंची करू नका

प्रख्यात सहकारी कार्यकर्ते व ग्रेटब्रिटनमधील सुप्रसिद्ध होरेस प्लंकेट इंस्टिट्यूटचे अध्यक्ष, मि. सी. आर. फे हे अलीकडे म्हैसूराकडे गेले असता त्यांनी तेथील सहकारी चळवळीतल्या लोकांस जो उद्बोधक संदेश दिला तो त्या संस्थानाबाहेरील मंडळींसही विचारप्रवर्तक होणारा व कार्यप्रवण करण्यासारखा असल्याने त्याचा गोषवारा आम्ही खाली देत आहो :—

"कॅनडामध्ये दहा वर्षे राहिल्यामुळे परकीय देशाच्या अनुभवावर व उदाहरणांवर आधारलेल्या पुस्तकावरून विद्यार्थ्यांस ज्ञान देण्याच्या कामी काय अडचणी येतात. ह्याची मला चांगली माहिती आहे. कनडा देशात कॅनेडिअन अर्थशास्त्र शिकविले पाहिजे आणि हिंदुस्थानात भारतीय अर्थशास्त्र शिकविणे आवश्यक आहे. ह्या देशात त्याखेरीज भाषेची अडचण आहे. परकीय भाषा व परकीय परिस्थितीची शिकवण ह्याच्या अडथळ्यांतून बाहेर निघण्यातच विद्यार्थ्यांची सर्व शक्ती खलास होऊन स्वतंत्र देशी विचारांस व कल्पनांस स्फूर्ती व वावच राहात नाही. हे विधान सहकारी चळवळीच्या अर्थशास्त्रासही लागू आहे. तुम्ही आपले स्वतःचे शास्त्र, विचार आणि पद्धती निर्माण करणे अगत्याचे आहे. नुसत्या आकड्यांची पोपटपंची करू नका आणि तुमचे विचार जिवंत आणि जिव्हाळ्याचे असू द्या. सरकारचे दोष दाखवीत बसण्यात वेळ फुकट घालवू नका. आपल्या देशबांधवांच्या आचारविचारांचा अभ्यास करा आणि हे लक्षात ठेवा की, व्यवस्थित कल्पना आणि सिद्धांत बनवण्याचे काम तुमच्या युनिव्हर्सिट्यातच झाले पाहिजे. ते इतरत्र होणे शक्य नाही. उदारणार्थ, मी स्वतः केंब्रिजमध्ये सहकारी चळवळीचे शिक्षण, (१) आर्थिक इतिहासाचा भाग व (२) शेतीच्या धंद्याचे संघटन ह्या विषयांच्या अनुषंगाने देत असतो.

"सहकाराच्या शिक्षणात त्या चळवळीच्या तत्त्वास अग्रतेचा मान दिला पाहिजे. सहकाराचा अर्थ एकत्र वागणे व जिवंत संस्थेत कार्यकर्ता सभासद असणे हा आहे. सरकारकडून येणाऱ्या साहाय्याची वाटणी करण्यासाठी सहकारी संस्था कधीही काढू नका. असे करणे हा सहकारी चळवळीचा अपमान असून सार्वजनिक पैशाचा अपव्यय आहे. एकत्रित होऊन सर्वांची सोय पाहणे हाच सहकाराचा उद्देश आहे. सहकारी स्टोअर किंवा दुधाच्या पुरवठ्याचा धंदा ह्यांचे उदाहरण घेतल्यास हे तत्त्व तेव्हाच प्रतीत होईल. जिनसांचे दर बाजारभावापेक्षा कमी करण्याचे सहकारी संस्थांचे धोरण असू नये. शहरांतल्या संस्थांनी उधारीचा व्यवहार करता कामा नये. शेतीच्या पतपेढ्यांमध्ये कर्ज व उधारी जरूर आहे. परंतु लांब किंवा अल्प मुदतीची कर्जे शेतकऱ्यास देताना अत्यंत दक्षता बाळगली पाहिजे. आणि ती वेळीच परत येतील आणि त्यांचा योग्य उपयोग केला जाईल अशी खबरदारी घेणे अगत्याचे आहे. सहकारी संस्थांनी सरकारच्या अप्रत्यक्ष मदतीने भरमसाट कर्जे देण्यापेक्षा सरकारने उघड रीतीने सावकारी केलेली पुरवेल. घरे बांधण्याच्या सहकारी संस्थांचा व्यवहार कंझुमर्स सोसायट्यांच्या सारखाच असून त्यातही कर्जे अत्यंत सावधगिरीने दिली जाऊन त्यांची प्रतफेड कसोशीने करून घ्यावी. ह्या बाबतीतली निष्ठुरता वास्तविक अत्यंत हिताची असते; म्हणून तो कडकपणा हा एक प्रकारचा ममताळूपणाच होय."

अर्थ १३-९-३५

---

## सहकारात आतूनच नवे व शुद्ध रक्त हवे

### दिवाणबहादुरांची समयोचित स्पष्टोक्ती

नाशिक येथे भरलेल्या खानदेश विभागाच्या सहकारी परिषदेत गेल्या शनिवारी, शिक्षणमंत्री, दि. ब. कंबळी ह्यांनी केलेल्या भाषणातील काही मुद्दे महत्त्वाचे असून सहकारी चळवळीशी संबंध असलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी मनन करण्यासारखे आहेत. सहकारी पतपेढ्यांच्या सभासदास सहकारी तत्त्वाची व पद्धतीची चांगली ओळख असत नाही आणि त्यास आपली जबाबदारी आणि कर्तव्ये काय आहेत ह्याची योग्य जाणीव नसते, हा ठळक दोष त्यांनी श्रोत्यांच्या निदर्शनास आणला. पतपेढ्यांच्या कारभारात अनास्था, अव्यवस्था, लबाड्या, घेतलेल्या कर्जांची फेड बुद्धिपुरःसर टाळण्याची प्रवृत्ती असले दुर्गुण शिरले असता त्यास बाहेरून तात्पुरते साहाय्य कितीही मिळाले तरी त्याचा काही उपयोग नाही ही दिवाणबहादुरांची स्पष्टोक्ती सहकारी संस्थांचे सभासद आणि अधिकारी ह्यांच्या मनावर बिंबणे अगत्याचे आहे. ह्या संस्थांमध्येच असल्या वैगुण्यांच्या विरुद्ध लोकमत निर्माण झाल्यावाचून त्यांचे उच्चाटन होऊन सहकारी पतपेढ्यांची स्थिती सुधारणार नाही, हा त्यांचा सिद्धांत अनुभवी कार्यकर्त्यांस पटल्यावाचून राहावयाचा नाही. प्रचलित आर्थिक मंदीमध्ये साहाय्याचे तात्पुरते उपाय योजता येतील व त्या मार्गाने यत्नही चालू आहेत. परंतु कायमची सुधारणा व प्रगती होण्यास मुळासच हात घातला पाहिजे व सहकारी संस्थांनी प्रथम आपल्या गुडघ्याशीच भांडले पाहिजे, ह्या शिक्षण मंत्र्यांच्या उपदेशाप्रमाणे कृती होईल त्या मानानेच त्या संस्थांचे पाऊल पुढे पडणार आहे, ही गोष्ट जितक्या लवकर व जितक्या स्पष्टपणाने सहकारी जनतेच्या लक्षात येईल तितके इष्ट आहे. जमीन गहाणाच्या बँकांच्या संबंधाने त्यांनी दिलेली सावधगिरीची सूचनाही सर्वस्वी समयोचित आहे ह्यात संशय नाही. आतून नवे व शुद्ध रक्त उत्पन्न झाल्यावाचून बाहेरून लावलेल्या मलमपट्ट्यांनीच जखम बरी होत नसते, हा रोजच्या अनुभवापासून घ्यावयाचा बोध सहकारी चळवळीच्या सद्यःस्थितीत लोकांनी नीट ध्यानात ठेवून त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय केला पाहिजे. तसे न झाल्यास व्याजाचे दर कमी केले आणि नवीन बँका काढल्या तरी त्याचा खरा उपयोग जनतेस होणार नाही.

अर्थ ८-५-३५

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

इसके दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



सोडा वाटर यंत्र | घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन कार्यालय २५३३७१ कारखाना ३४४१०१

## पैशाच्या पाठबळावाचून सारे व्यर्थ

### बॅरिस्टर जयकर ह्यांचे स्फूर्तिदायक भाषण

पुण्यात भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनाचा समाप्तिसमारंभ साजरा झाला. त्याप्रसंगी बॅरिस्टर जयकर ह्यांनी केलेले भाषण सर्वस्वी समयोचित असे होऊन त्याने महाराष्ट्रातील सद्यःस्थितीचा बिनचुक ठाव घेतला. प्रदर्शनाची मांडणी व व्यवस्था ह्यांचे बाबतीत त्यांनी व्यावहारिक स्वरूपाच्या कित्येक सूचना केल्या त्यांचा योग्य विचार होईलच. तथापि, आर्थिक प्रगती आणि एकंदर हिंदी राष्ट्रीय जीवनाचा उत्कर्ष ह्यांच्या दृष्टीने आजच्या व उद्याच्या महाराष्ट्राची शब्दचित्रे त्यांनी रेखाटली, त्यांचा योग्य परिणाम आमच्या पुढाऱ्यांच्या मनावर होऊन, त्यांनी दाखविलेल्या मार्गाने कृती घडून येण्यास तात्काळ प्रारंभ होणे अत्यंत अगत्याचे आहे. एक शतकाचा स्वातंत्र्याचा उज्ज्वल इतिहास, नैसर्गिक, बौद्धिक, शारीरिक व शैक्षणिक साधनांचा भरपूर पुरवठा आणि मार्गदर्शकांचे साहचर्य इत्यादी गोष्टी जय्यत रीतीने अनुकूल असतां, उद्योगधंदे, व्यापार इत्यादि महत्त्वाच्या आर्थिक उन्नतीच्या बाबींच्या संबंधात महाराष्ट्रीय जनतेने केवळ संघटना, शिस्त आणि साहस ह्यांच्या अभावी मागे पडून, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रगतीविषयीच्या कार्यक्रमातले आपले मानाचे स्थान गमवावे हें विपरीत आहे. ही शोचनीय गोष्ट बॅरिस्टर जयकर ह्यांनी आपल्या ओजस्वी भाषणाने पुण्याच्या पुढारी मंडळीच्या मनावर बिंबवण्याचा यत्न केला आणि आजपर्यंतची अनास्था टाकून देऊन संघटित कार्यास लागण्याविषयी महाराष्ट्रीय लोकांस अत्यंत कळकळीचा उपदेश केला. सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनी महाराष्ट्रास अशाच प्रकारची चालना दिली त्यास एक आठवडा झाला नाही तोच बॅरिस्टर जयकर ह्यांनी आर्थिक संघटनेचा व उद्योगाचा व्यावहारिक कार्यक्रम आमच्या विचारी जनतेपुढे मांडला हा सुदैवाचा योगायोगच आहे. महाराष्ट्रात उद्योगधंदे व व्यापार ह्याच्या बाबतीत नवचैतन्य ओतण्याची खटपट आज थोडीफार चालू आहे, तिला पुण्याचे प्रदर्शन आणि त्याच्या विसर्जनाच्या वेळी बॅरिस्टर जयकरांसारख्या पुढाऱ्यांनी केलेले कळकळीचे, मार्मिक आणि हृदयस्पर्शी भाषण ह्यांचे पूर्ण साहाय्य मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

बॅरिस्टर जयकरांच्या स्फूर्तिदायक भाषणातला एक जिव्हाळ्याचा भाग महाराष्ट्रीय जनतेच्या मनावर ठसेल तर एक मोठे कार्यच झाल्यासारखे होईल. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रगतीचा ओघ जोराने वाहात असता महाराष्ट्रीय समाज मध्येच अनास्थेच्या व विस्कळितपणाच्या सडकात अडकून पडला आहे ह्याची अनेक विचारी लोकांस पूर्ण जाणीव आहे आणि प्रसंगी कित्येक, ती पुटपुटत व्यक्तही करीत असतात. पैशाचे म्हणजे उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांसारख्या धनोत्पादनाच्या साधनांचे व संघटनेचे पाठबळ महाराष्ट्रीय समाजाच्या मागे जोपर्यंत नाही तोपर्यंत त्याने प्रगतीची आशा करणे व्यर्थ आहे असे सांगून 'धन्यान्यर्जयध्वम्, धनान्यर्जयध्वम्' हा संदेश बॅरिस्टर जयकर ह्यांनी महाराष्ट्रास दिला आणि त्यासाठी कंबर बांधून कामास लागा असा उपदेश केला ही त्यांची महत्त्वाची कामगिरी झाली आहे असे आम्हांस वाटते. बेकारी, दारिद्र्य व निराशा ह्यांमधून महाराष्ट्रास वाट काढावयाची असल्यास, उद्योगधंद्याविषयी उत्साह आणि त्यास स्वार्थत्यागपूर्वक मूर्तस्वरूप देण्याची तयारी मध्यम स्थितीतल्या आणि समजूतदार लोकांनी दाखविली पाहिजे. पुण्याच्या प्रदर्शनाने ह्या बाबतीत काय करता येणे शक्य आहे याची चांगली कल्पना आणून दिली आहे. हेतुमूलक आणि संघटित कार्याची ह्याच्या पुढची पायरी कोणती हेही बॅरिस्टर जयकरांनी स्पष्ट सांगितले आहे. आर्थिक उन्नतीच्या व औद्योगिक संघटनेच्या अनेक सुट्या योजना आज मितीस महाराष्ट्रीय जनतेच्या पुढे आहेत. त्या उद्योगास व धंद्यांस स्वतः भांडवल पुरवणे, दुसऱ्याचे सहाय्य मिळवून देणे आणि सल्लामसलतीचे त्यांच्या उत्पादकांशी व चाळकांशी सहकारित्व करणे ह्या गोष्टी शक्य तितक्या महाराष्ट्रीयांनी केल्यास त्यांचे आज विशेष महत्त्व आहे, आणि त्यांचे योगाने सर एम. विश्वेश्वर अय्या आणि बॅरिस्टर जयकर ह्यांनी पुरस्कार केलेल्या व्यापक योजनांसही चांगला आधार प्राप्त होणार आहे.

अर्थ २०-२-१९३५

Tel. 57654


*With Best Compliments from*

**SUSHIL AUTOMOBILES**

**Authorised Stockists : Genuine JEEP Spares**

1339, Shivajinagar
Poona 411005

# "भिडे" ओव्हर पिक
**पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"**



## भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;
—सांगली—

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक

फोन नं. २०६९



# सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.


♣

फोन नं. :—३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




## ★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंपनिर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.



कारखानदार—
# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.
फोन : २३२
तार : Vijayplow

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

## बँकांस सावधगिरीची सूचना

### डायरेक्टरांचे कर्तव्य

'पीपल्स बँक ऑफ नॉर्दर्न इंडिया' लिक्विडेशनमध्ये काढण्यात यावी असा हुकूम देताना लाहोर हायकोर्टाच्या न्यायमूर्तींनी जे उद्गार काढले आहेत, ते बँकांचे चालक आणि जनता ह्यांनी लक्षात ठेवण्याजोगे आहेत. ही बँक दहा वर्षांपूर्वी स्थापन होऊन तिचे भरलेले भांडवल सुमारे अर्धा कोटी रुपयांचे होते. अव्यवस्थित व अनुचित कारभारामुळे १९३१ मध्ये ही संस्था बंद पडली असा आक्षेप घेण्यात आला होता आणि शक्य झाले तर तिचे पुनरुज्जीवन करावे ह्या योजनेस हायकोर्टाने तत्काळ संमती दिली. ह्या योजनेची योग्य अमलबजावणी झाली नाही ह्या आक्षेपावरून दुसरी योजना कोर्टाने मंजूर केली. दुसऱ्या प्रयत्नाचाही काही उपयोग होत नाही असा आरोप करण्यात आल्यावरून, पूर्ण चौकशीअंती हायकोर्टाने आता बँक बंद करून तिचा कारभार गुंडाळण्यात यावा असा हुकूम दिला आहे. निर्णय देताना, कोर्टाने बँकेच्या अव्यवस्थेविषयी करण्यात आलेल्या आरोपांत, अधिक चौकशी व्हावी असे दर्शविणारा सकृद्दर्शनी पुरावा आहे अशी आपली खात्री करून घेतली असून संस्थेचे काम पुढे चालू देणे इष्ट नाही असे ठरविले आहे. बँकेचे कामकाज १९३१ मध्ये बंद झाले, तेव्हा तिचे डायरेक्टर आपणांपैकी बहुतेकांस कर्ज देत होते; आणि त्यांच्यापैकी लाला हरकिसनलाल ह्यांचे एकट्याचे ३२ लक्ष रुपये आणि त्यांच्या हुकमतीखालच्या कंपन्यांचे ४६ लक्ष रुपये बँकेचे देणे होते ह्या गोष्टी चौकशीत कोर्टाच्या नजरेस आल्या आहेत. इतर काही डायरेक्टरांनीही मोठ्या रकमा कर्जाऊ घेतल्या होत्या आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांस बँकेचे सामान्यतः म्हणण्यासारखे साहाय्य झाले नव्हते. न्यायमूर्तींस, पुढे आलेल्या माहितीवरून, असे दिसून आले आहे की, बऱ्याचशा कर्जांस योग्य तारण नव्हते व जरूर ती अधिकृत मंजुरीही नव्हती. काही बाबतींत दिलेले तारण काढून घेण्यात येऊन त्याचा उपयोग कोणकोणी दुसरीकडून पैसा उभा करण्यात केला असाही आरोप प्रस्तुत प्रकरणांत करण्यात आला आहे. ह्या आरोपात तथ्य काय आहे ह्याचा उलगडा होण्यासाठी त्याची शहानिशा व्हावी असे लाहोर हायकोर्टाने आपले मत दिले आहे.

सुमारे चार वर्षांमागे, बँकेची पुनर्घटना करण्यास व धनकोंची देणी फेडण्याची व्यवस्था करण्यास परवानगी मिळावी असा डायरेक्टरांनी अर्ज केल्यावरून विशिष्ट योजना मंजूर करण्यात आली आणि एकूण तीन योजना एकामागून एक अशा कोर्टाने मान्य केल्या. डायरेक्टर लोकांनी स्वतःसाठी घेतलेली कर्जे बँकेस परत करण्यात यावी अशी कोर्टाची इच्छा होती, हे त्यांनी वेळोवेळी दिलेल्या हुकमांवरून स्पष्ट होत आहे. बँकेचे काम गुंडाळण्यात यावे असा अर्ज कोर्टास करताना अॅडव्होकेट, मि. मदन गोपाळ, ह्यांनी बँकेच्या व्यवस्थापकांविरुद्ध पुन्हा पूर्वीचे आरोप केले आणि ठेवी परत करण्याच्या बाबतीत अनुचित प्रकार होत आहेत अशी तक्रार केली. पूर्वेतिहासाचा विचार करता लाला हरकिसनलाल आणि इतर डायरेक्टर ह्यांचेकडून पैसे वसूल करण्याचे काम सध्याच्या बोर्डावर सोपविणे युक्त नाही असे न्यायमूर्तींनी ठरविले. गेल्या दीड वर्षाच्या अनुभवावरून, कोर्टाच्या देखरेखीखाली काम करणाऱ्या लिक्विडेटरच्या हातूनच ते काम नीट होईल, असे त्यांचे मत पडले. बँकेच्या गैरव्यवस्थेबाबत जे आरोप करण्यात आले आहेत त्यांची सूक्ष्म चौकशी झाली पाहिजे आणि तिच्यामध्ये बँकेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपात सत्याचा भाग आहे असे दिसल्यास त्यांच्यावर योग्य कायदेशीर इलाज केले जावे असे हायकोर्टाने आपल्या निर्णयात म्हटले आहे.

भागीदारांनी निवडून दिलेल्या डायरेक्टरांवर फार मोठी जबाबदारी असते आणि मंडळ्यांचा कारभार चोखपणाने चालावा ह्याविषयी सक्त काळजी घेणे त्यांचे काम असते. त्यांनी हे काम सचोटीने केले नाही तर अशा वर्तणुकीची चौकशी करून अप्रामाणिक लोकांस योग्य शासन करणे हे कोर्टाचे कर्तव्य आहे, असे लाहोर हायकोर्टाने स्पष्ट म्हटले आहे. ह्यावरून, मंडळ्यांच्या कारभाराची व्यवस्था पाहण्याचे अंगावर घेणाऱ्या डायरेक्टरांनी किती सावधगिरीने व कसोशीने वागले पाहिजे ह्या संबंधाचा बोध, धंद्यात पडणाऱ्या लोकांनी घेणे आवश्यक आहे. डायरेक्टरांसारख्या जबाबदाऱ्या पत्करणे म्हणजे नुसत्या मानाच्या किंवा स्वतःच्या फायद्याच्या जागा पटकावणे नव्हे. त्या जागांबरोबर सचोटी, शिस्त, मेहनत आणि प्रसंगी स्वार्थत्यागही येतो. लोकांनी आपणावर टाकलेल्या जबाबदारीस सर्वस्वी पात्र असल्याविषयींची खात्री आणि विश्वास सर्वांस वाटेल असेच डायरेक्टरांचे धोरण व वर्तन असावे लागते. ह्यावरून, डायरेक्टरांची जागा ही एक सुखाबरची पोळीच आहे असे कित्येकांस वाटते त्याचे मर्म ध्यानात येईल. बँकांच्या डायरेक्टरांसंबंधाने जे वर लिहिले आहे, ते इतर सार्वजनिक संस्थांच्या चालकांस तत्वतः आणि व्यवहारतःही लागू आहे हे सांगावयास नको. जनतेसाठी काम करण्यास उद्युक्त झालेल्यांनी स्वतः पायाशुद्ध व नियमाने वागण्यास नेहमी झटले पाहिजे. संस्था लहानशी पतपेढी असो, किंवा कारखाना असो, तिचे काम नीट आणि लोकांच्या हितास परिपोषक अशा तऱ्हेने चालण्यास व्यवस्थापक आणि चालक ह्यांनी नेकीने आणि काळजीने आपापली कामे केल्यावाचून सामाजिक व आर्थिक व्यवहाराचा गाडा हाकला जावयाचा नाही.

अर्थ १९-५-३५

---

### "डावखोरी" सबब

मॅनेजर : "अहो, हे पहा! तुम्ही डेबिटकडे टाकण्याची रकम केडिटच्या बाजूला लिहिली आहे."

नवीन कारकून : "माफ करा हं! मी डावखोरा आहे, साहेब".

# दलाल आणि कंपनी

सोन्यामारुती चौक, लक्ष्मी रोड. पुणे २, टे. २४९९४

शाखा : २१६ महात्मा गांधी रोड, पुणे १. टे. २६१३७

खालील मालाचे विक्रेते

अँकर ब्रँड : * टीक प्लाय * कमर्शिअल प्लायवुड * फ्लश डोअर्स * कमर्शिअल ब्लॅकबोर्डस् * टाक ब्लॅकबोर्डस

* स्ट्रिप्स * कॉंक्रीट शटरिंग प्लायवुड पार्टिकल बोर्डस् * नोव्हा माउंट ओकल बोर्डस

फॉरमायका डेकोरेटिव्ह लॅमिनेटेड शीटस् : * हार्ड बोर्डस् * इन्सुलेशनरी बोर्डस् * इन्सुलेशन टाइल्स * केमिकॉल ॲडेसिव्हज्.





# मसाल्याची न संपणारी गोष्ट

तसे सांगायचे म्हणजे सन १९१० मध्ये बेडेकर यांनी आपल्या काही गरजू गिऱ्हाइकांसाठी मसाले बनविण्यास सुरवात केली. मुंबईच्या विस्तारा बरोबरच गिऱ्हाइके वाढत गेली. विसाव्या शतकातल्या पहिल्या पन्नास वर्षात महाराष्ट्रातल्या घरोघरी बेडेकर मसाल्याने स्थान मिळविले. १९६० मध्ये भारतातल्या महत्वाच्या शहरी हजारो गृहिणी रुचकर स्वयंपाकासाठी बेडेकर मसाले वापरु लागल्या आणि आता जगातील महत्वाच्या शहरी भिन्न भिन्न रुचीच्या महिला बेडेकर मसाले वापरित आहेत.


संडे मसाला व मिरची पावडर आता चार रंगी आकर्षक प्लॅस्टिकच्या सिलबंद वेष्टनात मिळतात.

फक्त सिलबंद वेष्टनात खरेदी करा व निर्धास्त रहा.

रुची, स्वाद व ताजेपणा फक्त सिलबंद वेष्टनात टिकतो.

**बेडेकर** मुंबई ४

बेडेकर मसाले • बेडेकर लोणची • बेडेकर पापड • बेडेकर चटण्या



## महाराष्ट्रीय व्यापारी बँक

### नवीन स्तुत्य उपक्रम

उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची संघटनात्मक वाढ पद्धतशीर केल्यावाचून महाराष्ट्रीय जनतेस तरणोपाय नाही, ही गोष्ट आमच्या समाजाच्या मनावर जितक्या लवकर ठसेल तितके अगत्याचे आहे. 'फौजा पोटाने चालत जातात' ह्या आशयाची इंग्रजी भाषेतली उक्ती प्रसिद्ध आहे. तीमधील तत्त्वास अनुसरून असे म्हणता येईल की, कोणत्याही समाजाची प्रगती त्यास उपलब्ध असलेली आर्थिक साधने व त्यांचा केला जाणारा उपयोग ह्यांवर अवलंबून राहते. हा न्याय महाराष्ट्रास तर विशेष लागू आहे. एका बाजूस लहान प्रमाणावरचा बहुसंख्य लोकांनी चालविलेला शेतीचा तुटपुंजा धंदा व दुसऱ्या बाजूस समाजातील अत्यंत अल्प प्रमाणातील गटाचा बुद्धिविकासात्मक व्यवसाय, हा श्रमविभागाचा महाराष्ट्रातला प्रकार सामाजिक स्वास्थ्यास आणि प्रगतीस पोषक असा नाही. बंगालमधील 'भद्रलोक' म्हणजे मध्यमवर्ग, ह्यांची स्थिती अशाच प्रकारची झाली आहे, पण दुर्दैवाने तिची कारणे त्या लोकांच्या लक्षात फार उशिरा आल्यामुळे तिच्यामध्ये सुधारणा होणे अत्यंत अवघड होऊन बसले आहे. असंख्य कुळांनी जमिनी कराव्या व त्यांचा खंड थोड्या जमीनदारांनी गोळा करावा आणि इंग्रजी पद्धतीने शिकणाऱ्या वर्गांनी शहरांमध्ये नोकऱ्यांकडे धाव घ्यावी, ही बंगालमधली व्यवसायवाटणी सुस्थितीस घातक असल्याचे आता सिद्ध झाले आहे. बंगालमधले मोठमोठे उद्योगधंदे आणि व्यापार हे युरोपियन आणि हिंदी परस्थांनी व्यापले आहेत व खालच्या दर्जाच्या नोकऱ्यांतही परप्रांतीय लोक भरले आहेत. ह्या बंगाली बनावापासून महाराष्ट्रीयांस पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. हिंदुस्थानात आंतरप्रांतीय श्रमविभागही शक्य नाही हे येथे विसरता कामा नये. महाराष्ट्रीय बुद्धिवंतांनी राजकारण चालवावे किंवा संस्कृति-विकासास स्वतःस वाहून घ्यावे आणि गुजराथने व्यापारउदीमात आपले बुद्धिसर्वस्व वेचावे असला श्रमविभाग आता अशक्य कोटींतला आहे हे प्रत्यक्ष अनुभव सांगत आहेत. प्रांतिक विभागणीचे खूळ तर आता इतके बोकाळले आहे की, गुजराथ हा मुंबई इलाख्यापासून विभक्त होऊन स्वतंत्र प्रांत बनणे जरूर आहे अशी सूचना जबाबदार म्हणवल्या जाणाऱ्या व्यक्ती करीत आहेत! अशा परिस्थितीत, आपले एकेरी प्रगतीचे वळण टाकून देऊन स्वतःची सर्वांगीण उन्नती करण्याच्या प्रयत्नास महाराष्ट्रीयांनी लागले पाहिजे, हे निराळे सांगावयास पाहिजे काय!

शेतीची सुधारणा, लहान-मोठ्या उद्योगधंद्यांची स्थापना आणि वाढ व व्यापारी व्यवहारांचे परिपोषण ह्या सर्व बाबींचा समावेश महाराष्ट्राच्या उन्नतीच्या कार्यक्रमात होणे आवश्यक आहे. धंद्यांच्या उपयोगासाठी खेळते भांडवल पुरवणाऱ्या बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या संस्थांची ह्या तऱ्हेच्या आर्थिक विकासास विशेष जरूर असते. सहकारी संघटनेच्या पतपेढ्या व बँका महाराष्ट्रात आपली कामे करीत आहेत. त्यात मिळालेला अनुभव व्यापारी बँका चालविण्याच्या कामी उपयोगी पडण्याजोमा आहे. लोकांनी बचत केलेला पैसा सुरक्षित ठेवून त्याचा विनियोग गरजू धंदेवाले व व्यापारी ह्यांच्या धंद्यांच्या तात्पुरत्या गरजा भागविण्याकडे करणे ही व्यापारी बँकांची महत्त्वाची उत्पादक स्वरूपाची कामगिरी आहे. महाराष्ट्रात पूर्वी एकदा बँका बुडाल्यामुळे लोकांची मने ह्या बाबतीत साशंक होणे स्वाभाविक आहे. पण आता मागच्या चुकांपासून योग्य बोध घेऊन जबाबदार माणसांनी पुन्हा बँकिंगच्या धंद्याची व्यवस्थित पायावर उभारणी करणेच शहाणपणाचे होईल. महाराष्ट्राकरिता संयुक्त भांडवलाच्या घटनेची एक मोठी संस्था काढण्याचा विचार आज बरेच दिवस चाललेला आहे व त्याची पूर्वतयारी करून देण्याचे काम मराठा चेंबर ऑफ कॉमर्सने आपल्या शिरावर घेतल्याची बातमी आम्ही मागे दिलेली आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या योजनेची आता चांगली प्रगति झाली असून तिची रीतसर स्थापना थोड्या दिवसांत होईल असे समजते.

महाराष्ट्रीय जनतेने ह्या नवीन निघणाऱ्या संस्थेकडे आपुलकीच्या भावनेने पाहावे आणि लहानमोठ्या व्यापाऱ्यांनी व धंदेवाल्या लोकांनी तिच्या मदतीचा फायदा घेऊन तिला सहाय करावे हे उचित आहे. बँकेची योजना यशस्वी करण्याची, पुण्यातील आणि पुण्याबाहेरील कित्येक जबाबदार लोकांचा विश्वास व आदर संपादन केलेली, व्यवहार-कुशल आणि धंद्यात वाकबगार अशी मंडळी उत्साहपूर्ण तयारी दाखवीत आहेत ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. बँकिंगच्या धंद्यात काही दंडक अनुभवाने निश्चित झालेले आहेत, ते बँकेचे चालक व व्यवस्थापक आणि तिची गिऱ्हाइके ह्यांनी प्रामाणिकपणाने पाळले असता ह्या व्यवसायात कोणताच धोका न येता जनतेचे हित होण्यासंबंधाने निःशंक राहाण्यास हरकत नाही. व्यापारी बँकेचे काम विवक्षित निश्चित मर्यादित घ्यावयाचे असते; तिचे उल्लंघन करण्याचे, ह्या संस्थेशी संबंध येणाऱ्या कोणीही मनात आणता कामा नये, ही खूणगाठ प्रत्येकाने आपल्या मनाशी घातली पाहिजे. धंद्यांमध्ये आकुंचित स्वार्थ आणि भीड चालू देणे, आवश्यक नियम शिथिल करणे व शिस्त बिघडू देणे म्हणजे भयंकर चूक करणे आणि आपत्तीचे आवाहन करणे होय. त्याचप्रमाणे, बँक चालवणे हे सार्वजनिक हिताचे नाजूक कार्य आहे ही जाणीव जनतेने आणि व्यवस्थापकांनी सदैव बाळगावयास हवी. ह्या रीतीने बँकेचे चालक व तिची गिऱ्हाइके आणि जनता ह्यांचे मनःपूर्वक व समजुतीचे सहकार्य झाल्यास आणि आपण ह्या संस्थेच्या यशाबद्दल सर्व सारखेच जबाबदार आहो ही भावना प्रत्येकात दृढमूल झाल्यास महाराष्ट्रात एक नमुनेदार व्यापारी बँक यशस्वीपणाने चालेल, ह्याविषयी शंका बाळगण्याचे कारण उरणार नाही. बँक ऑफ महाराष्ट्राची मुळगी आणि तिच्या व्यवहारास प्रारंभ लवकर होईल अशी आम्हास आशा आहे.

अर्थ ६-६-३५

नवनवीन फॅन्सी माल ! योग्य किंमत ! !

बनारसी शालू, कांजीवरम, कोईमतूर, बंगलोर साड्या व अनेक फॅन्सी साड्यांचा भरपूर स्टॉक ! तसेच इतर सर्व प्रकारच्या मालासाठी

# शाहाडे आठवले [प्रा. लि.] दादर

टेलि. : ४५८५५४)

आणि

# शाहाडे आणि कंपनी, गिरगाव

टेलि. : ३५६११३)

मुंबई ४.

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

# United Metal Industries

(Heat Treatment Specialists)

Poona Plant
Tel. 8572

Bombay Plant
Tel. 531190

## पोटात मंद आणि कपाळाला गंध

" मी संस्कृतीच्या स्वप्नसृष्टीत वावरत नसून व्यवहाराच्या स्थिर भूमीवर उभा आहे. ओळखीची व वशिल्याची शिफारस-पत्रे मागत तरुण लोक दारोदार भटकत आहेत व ह्याचा परिणाम नैतिक ऱ्हासात होत आहे. कित्येक बी. ए. कॉन्स्टेबलाची नोकरी पत्करीत आहेत व काही एम्. ए. रस्त्यात दूध विकीत आहेत. इंटरमिजिएटची परीक्षा पास झालेले तरुण सायकल शिपाई बनले असून कित्येक एलएल्. बी. एक्साइज व रजिस्ट्रेशन खात्यात हलक्या दर्जाच्या जागा घेऊन बसले आहेत. खऱ्याखुऱ्या विश्वविद्यालयीन संस्कृतीची चाड ज्या देशांत आहे तेथे असला प्रकार कधीही चालू दिला जाणार नाही. संस्कृती व ज्ञान ह्यांच्या मृगजळाच्या मागे तुम्ही आणखी किती वर्षे लागत रहाणार ! "—सर तेज बहादुर सप्रू ह्यांच्या संयुक्त प्रांतांतील विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिषदेत केलेल्या भाषणाचा उतारा.

आर्थिक प्रगती, व्यापार व उद्योगधंदे ह्यांची जोपासना ह्यासंबंधांतली समाजाची मनोभूमिका आणि पुढारी, आईबाप व शिक्षक ह्यांचे ह्या बाबतीतले कर्तव्य ह्यांच्या परस्परसंबंधांविषयी, विशेषतः महाराष्ट्रातील परिस्थितीस अनुलक्षून, आम्ही " अर्था " मध्ये विशिष्ट प्रकारच्या विधायक व कार्यप्रवण धोरणाचा पुरस्कार करीत आलो आहो आणि तो तसाच करीत राहणे हे आमचे कर्तव्य आम्ही समजतो. सत्यान्वेषण, उदात्त भावना व कल्पना ह्यांचा परिपोष, कलेची उपासना, एवंगुणविशिष्ट संस्कृतीचा उत्कर्ष प्रत्येक समाजात होणे आवश्यक असून विश्वविद्यालयीन शिक्षणाचे ते महत्त्वाचे उद्दिष्ट आहे ह्यात मतभेद नाही. तथापि, हिंदी विश्वविद्यालयांच्या हातून ही कामगिरी होत नसून त्यांच्यापासून अभिमानास्पद संस्कृती तर नाहीच पण लाज वाटायला लावणारी बेकारी मात्र भरपूर निर्माण होत आहे असा आक्षेप आज चोहोकडे ऐकण्यात येत आहे. विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या शक्ती पिळून काढणाऱ्या यंत्रांतून बाहेर पडणाऱ्या हजारो तरुणांस उदरभरणाच्या साधनांच्या शोधार्थ भटकावे लागत आहे, ह्याचा दोष शिक्षक व पालक ह्यांनी एकमेकांवर टाकावा आणि दोघांनी मिळून समाजनेते व सरकार ह्यांच्या अनास्थेकडे बोट दाखवून स्वस्थ राहावे, असा प्रकार आज सरसहा चालू आहे. ह्या संबंधातल्या कर्तव्यपराङ्मुखतेच्या दोषाची वाटणी करण्याचा येथे प्रश्न नाही. सद्यःस्थिती असमाधानकारक असल्याविषयी बहुतांशी एकवाक्यता असल्यानंतर तरुण पिढीच्या भवितव्याशी ज्यांचा ज्यांचा म्हणून संबंध येतो, त्या सर्वांनी आपल्यापुरती विधायक कृती करण्यास सरसावले पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत आपल्या कल्पना आणि कार्यपद्धती ह्यास योग्य वळण देण्याचे महत्त्व कळले तरी आवश्यक असलेल्या सुधारणा घडवून आणण्यास लागणारे सामर्थ्य, निश्चय व आस्था ह्यांचा बहुतेक लोकांत अभाव असतो, ही ह्यात गोम आहे. ह्या कारणानेच समाजाची गाडी खोल चाकोऱ्यांच्या बाहेर निघत नाही व स्वतंत्र आचारविचारांस गती मिळत नाही. सुशिक्षित लोकांची बेकारी आणि तिचा उच्च शिक्षणपद्धतीशी संबंध हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय सर तेजबहादुर सप्रू ह्यांच्यासारख्या वजनदार आणि अधिकारी पुढाऱ्याने कळकळीने हाती घेतला आहे हे सध्याच्या निराशेच्या व बेफिकीरपणाच्या वातावरणांत सुचिन्हच म्हटले पाहिजे. प्रस्तुत लेखाच्या शिरोभागी त्यांच्या अलीकडच्या एका भाषणातील उतारा दिला आहे, त्यावरून त्यांच्या तळमळीची तीव्रता स्पष्टपणाने प्रतीत होत आहे. उच्च दर्जाच्या संस्कृतीचे महत्त्व कितीही मोठे असले तरी शिक्षणाची आर्थिक बाजू म्हणजे तरुण पिढीच्या पोटापाण्याचा विषय विसरण्यात हंशील नाही, हे त्यांच्या भाषणाचे सार आहे. संयुक्त प्रांताच्या सरकारने बेकारीच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या कमिटीचे ते अध्यक्ष असून त्यांनी सदरहू बाबतीत दीर्घ विचार करून ग्रेट ब्रिटन व इतर राष्ट्रे ह्यांमधल्या परिस्थितीचे आणि त्यातल्या शिक्षणविषयक व आर्थिक धोरणाचे काळजीपूर्वक निरीक्षण केले आहे. चौकशी, चर्चा आणि मनन ह्यांच्या योगाने हिंदी शिक्षणपद्धतीत महत्त्वाचे फेरफार होणे अगत्याचे आहे, असे त्यांचे ठाम मत बनले आहे. संस्कृतिनिदर्शक विश्वविद्यालयीन पदवीचा टिळा कपाळास लावून नोकरीसाठी उपाशी वणवण हिंडणाऱ्या हिंदी तरुणांची करुणास्पद स्थिती त्यांच्या मनास झोंबली आहे, हे स्वतः विद्वान, सुसंस्कृत आणि विद्येचा परमभोक्ता अशी प्रसिद्धी असलेल्या सर तेजबहादुरांसारख्या गृहस्थाने संस्कृतीची हेटाळणी केल्याप्रमाणे उद्गार काढावे, ह्यावरून अगदी उघड होत आहे. आज आमचा सर्वच समाज आंधळेपणाने चालला आहे. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र सुधारणा आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांचे संघटन आणि विस्तार हे जोडकार्य समाजधुरीणांनी हाती घेतले पाहिजे. केवळ शिक्षणाच्या नव्या तऱ्हा व नवे अभ्यासक्रम चालू केल्याने कार्यसिद्धी व्हावयाची नाही हे मात्र विसरून चालावयाचे नाही. तरुण पिढीस हाती घेता येतील अशा आर्थिक योजना त्याबरोबरच तयार केल्या पाहिजेत. बेकारी हे आर्थिक घटना आणि शिक्षणपद्धती ह्यांचा मेळ नसल्याचे लक्षण आहे आणि ह्या ताटातुटीमुळे तरुणांच्या शक्तीचा व वेळाचा अपव्यय होत आहे. त्यांत होतकरू व्यक्तींची कुचंबणा आणि भरून निघण्यास कठीण अशी राष्ट्राची हानी चालली आहे. सर तेजबहादुर सप्रूंच्या घोषणेने हिंदी समाजात जागृती उत्पन्न होण्यास साहाय्य केले तर तो भावी प्रगतीचा शुभ प्रारंभ आहे, असे मानण्यास हरकत नाही.

अर्थ २७-९-३५

### परत आलेला चेक

पति : " पाहिलंस, हा तुझा चेक बँकेकडून परत आला. "

पत्नी : " वा ! छान झालं की ! आता ह्या खेपेला तो पुनः देऊन आपल्याला काय विकत घेता येईल ! "

## दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड

उजळिता दीप तमाम सारितो दूर.
बँकेत उघडिता खाते पैशास येतसे पूर.
बँक म्हणेच ही प्रत्यक्ष सदन लक्ष्मीचे.
जवळ करोनी भाग्य उजळा आपुले साचे.

अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यातील जनतेची सेवा करणारी, जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली व दुष्काळातही, शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहून त्यांना सक्रिय साहाय्य करणारी एकमेव बँक आमच्या असंख्य ग्राहकांस दीपावलीनिमित्त आमच्या शुभेच्छा

बँकेची सांपत्तिक स्थिती ३०-६-१९७४ अखेर
(आकडे लाख रु. चे)

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भाग भांडवल | १५०·०० |
| (२) वसुल भाग भांडवल | ३४·५८ |
| (३) गंगाजळी व इतर निधी | १४·२७ |
| (४) ठेवी | ३८७·७५ |
| (५) खेळते भांडवल | ९३५·०९ |

बँक आपल्या ३८ शाखांद्वारे सर्व जनतेची सेवा करीत आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाते.

वा. क. अनगोळकर
बी. कॉम., डी. सी. बी. एम.
व्यवस्थापक

ना. ल. सरवदे
अध्यक्ष



यंदाची दिवाळी व नुतन वर्ष आमच्या असंख्य खातेदारांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

## दि मिरज स्टेट बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)
(रजि. ऑ : मिरज)

आकर्षक व्याजदर :—

- सेव्हिंग्ज ५½ %
- मुदत ठेव द. द. शे.
  - १२ महिने ते ३५ ८%
  - ३६ „ „ ६० ९%
  - ६१ व त्याहून अधिक १०%

आमची वैशिष्ट्ये :—

- तत्पर सेवा,
- ठेवीवरील आकर्षक व्याजदर,
- शेती, लघुउद्योग, व्यापार व यासाठी साहाय्य.

विविध मुदतीसाठी नवी आकर्षक
संचित ठेवयोजना

—: शाखा :—

सांगली, (गणपती पेठ व मार्केटयार्ड सांगली), लक्ष्मेश्वर (जि. धारवाड), इचलकरंजी (जि. कोल्हापूर), पंढरपूर, कुर्डुवाडी, बार्शी, करमाळा, सांगोला व माढा (जि. सोलापूर)

द. आ. दिवाण
चेअरमन



TELEPHONE : 22381 President
20145 Office
21992 S.I.'s Office

Teleg. : Address 'DICENTBANK'.

## The Belgaum District Central Co-operative Bank Ltd.,

HEAD OFFICE : Poona-Bangalore Road, (N. H. 4), Belgaum.
BRANCHES : 41 BRANCHES throughout the District.

* * * *

FINANCIAL POSITION AT A GLANCE AS ON 30-6-1974.

| | | | |
|---|---|---|---|
| Authorised Share Capital | : Rs. 1,75,00,000. | Loans out standing | Rs. 10,36,22,801. |
| Paid-up Share Capital | : Rs. 1,30,55,750. | Working Capital | Rs. 13,02,99,725. |
| Reserve & Other Funds | : Rs. 65,81,424. | | |
| Deposits | : Rs. 6,92,14,305. | Net Profit for 1973-74 | Rs. 15,50,493. |

All types of Deposits are accepted in every office of the Bank.

Individual loan facilities are now offered to the Constituents.

Safe Deposit Lockers are available at : Belgaum Bazar Branch, Bailhongal and Saundatti Branches.

For further particulars, please contact our nearest office.

P. C. Khanapuri
Manager

C. M. Mamani
Vice President

G. S. Tubachi
President

## ‘भांडवलशाही’त ‘लोकशाही’

आधुनिक पद्धतीने जे उद्योगधंदे चालवावे लागतात, त्यांस भांडवल मोठ्या प्रमाणावर लागते आणि ते पाच-सहा व्यक्तीं-कडून मिळण्यासारखे नसते. ह्या दृष्टीने संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांची घटना चांगली उपयोगी पडते. कारण, तिच्यामध्ये लहानलहान रकमांचे अनेक मालक एकत्र येऊन आपल्या एकवटलेल्या संपत्तीच्या जोरावर कोणताही कारखाना किंवा धंदा उभारू आणि चालवू शकतात. कोणताही उद्योग मोठ्या प्रमाणा-वर केला असता तो कार्यक्षम बनतो, त्यात उत्पादनाचा खर्च मर्यादित होतो व ह्यामुळे जरूर तो फायदा उरून तयार माल स्वस्त विकता येऊन गिऱ्हाइकांची सोय करता येते. सुधारलेली संपत्युत्पादनाची साधने वापरावयाची म्हणजे यंत्रे, वीज आणि वाफ ह्यांच्या साधनाने काम करावे लागते आणि त्यास विपुल पैसा लागतो. वरील प्रकारची आधुनिक साधने न वापरावी तर भौतिक शास्त्रात व यांत्रिक कलेत प्रत्यही प्रगती होऊन तद्द्वारा प्राप्त होणाऱ्या मानवी सुखसंपत्तीस आचवण्याचा वेडेपणा पदरी घ्यावा लागतो. अनेक व्यक्तींची थोडीथोडी संपत्ती संचित करून ती उद्योगधंद्यांत घातल्याने आर्थिक क्षेत्रात लोकशाहीचे राज्य चालविणे शक्य होते. मूठभर श्रीमान लोकांनी संपत्तीच्या उत्पादनाची सूत्रे स्वतःच्या हाती घेऊन बहुजन समाजावर आर्थिक सत्ता गाजविण्यापेक्षा सामान्य लोकांसही औद्योगिक घटनेमध्ये अधिकाराचे स्थान मिळणे केव्हाही श्रेयस्कर समजले पाहिजे.

तथापि, कोणतीही सामाजिक किंवा आर्थिक स्वरूपाची घटना घेतली तरी तिच्यामध्ये काहीतरी दोष व कच्चेपणा हा आढळावयाचाच. असला प्रकार संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांमध्ये सापडणे अपरिहार्य आहे. धंद्यांचे नियमन करण्याकरिता अनेक लहान-सहान भांडवल पुरवणाऱ्या व्यक्तींस, निवडलेल्या व्यवस्थापक मंडळाच्या हातात कारभाराची सत्ता द्यावी लागते आणि ह्या मूठभर सत्ताधीशांच्या अधिकाराचे नियंत्रण करणे बहुसंख्याक “भागीदारां”स कठिण पडते. आर्थिक घटना इष्ट आणि योग्य असली तरी तिला कायद्याच्या चौकटीत बसवावे लागते आणि मंडळ्यांच्या लोकनियुक्त अधिकारी मंडळावर हुकमत चालविणे बहुसंख्य लोकांसही शक्य होत नाही. उद्योगधंद्यांच्या मामुली व्यवहारात भागीदार व्यक्तींनी ढवळाढवळ करू पाहणे मंडळीच्या यशस्वितेच्या दृष्टीने समर्थनीय नसते, ही गोष्ट मान्य करावी लागेल. तथापि, व्यवस्थापक मंडळाचा कारभार चांगल्या तऱ्हेने चालला नसेल किंवा त्यात सुधारणा होणे बहुसंख्याक भागीदारास आवश्यक वाटत असेल, तरीहि आपल्या इच्छेस मूर्त स्वरूप देण्याचे सामर्थ्य ह्या लोकांत नसते. व्यवस्थेची सूत्रे थोड्या निवडक मंडळींच्या हातात न द्यावी तर मंडळीच्या कारभारात गोंधळ माजल्यावाचून राहावयाचा नाही आणि असली अव्यवस्था किंवा तिच्यातला कार्यक्षमतेचा अभाव ही सर्वांसच हानिकारक होणार. बरे, बहुसंख्याक भागीदारांचे मत त्यांनीच निवडलेल्या मूठभर व्यक्तींच्या कारभारात प्रभावी होणार नाही तर संयुक्त भांडवलाच्या घटनेत लोकशाहीच्या तत्त्वास जागाच राहात नाही, अशी आपत्ती येते. ह्या दोन गोष्टींचा समन्वय कसा करता येईल, हाच येथे अत्यंत महत्त्वाचा व अवघड प्रश्न आहे.

व्यवस्थापक मंडळाने भागीदारांस आपल्या मंडळीच्या कारभारासंबंधाने आवश्यक माहिती वेळोवेळी पुरवावी आणि वार्षिक अहवालात तपशीलवार हिशेब आणि इतर बाबींच्या हकीकती सादर कराव्या असा एक उपाय वरील अडचणीवर सुचविण्यात आलेला आहे व त्याची योजना सार्वत्रिक व्हावयास काहीच हरकत दिसत नाही. भागीदारांनी एक तज्ज्ञांची आणि विश्वासू व निःस्पृह लोकांची कमिटी नेमावी आणि व्यवस्थापक मंडळाने तिला वेळोवेळी माहिती पुरवून तिच्या सभासदांशी विचार-विनिमय करावा, अशीही एक सूचना पुढे आली आहे. ह्या कमिटीने धंद्यात किंवा मंडळीच्या कारभारात यत्किंचित् सुद्धा ढवळाढवळ करावयाची नाही, तिने महत्त्वाच्या बाबींसंबंधाने विश्वसनीय माहिती घेऊन तिच्या आधारावर भागीदारास केवळ सल्ला द्यावयाचा आहे. ह्या प्रकारची योजना मोठीशी परिणाम-कारक होईल असे नाही, असें कित्येकांचे म्हणणे पडेल, हे खरे आहे. तथापि, असल्या गोष्टीत तारतम्य विचार, समजूतदारपणा आणि तडजोडीने कार्य करण्याची प्रवृत्ती ह्यासच प्राधान्य दिले पाहिजे. व्यवस्थेतल्या एकसूत्रीपणावाचून कोणताही कारभार नीट चालत नाही आणि कार्यकर्त्यांवर थोडेतरी बाहेरचे नियंत्रण असल्यावाचून त्यांचे काम समाधानकारक होत नाही, अशा दुहेरी अडचणीतून मार्ग काढावयाचा असता संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांच्या कामाच्या पद्धतीस व्यावहारिक दृष्ट्या इष्ट वळण कसे लावता येईल हा प्रश्न निर्विकार मनाने आणि उद्योगधंद्यांच्या आणि भागीदारांच्या, दोघांच्याही हिताच्या अपेक्षेने सोडविला गेला पाहिजे. त्यात निव्वळ आग्रही वृत्तीचा काही एक उपयोग व्हावयाचा नाही. औद्योगिक उन्नतीच्या द्वारात पाऊल टाकणाऱ्या हिंदी राष्ट्रास, ‘भांडवलशाही’ ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आर्थिक घटनेचा ‘लोकशाही’च्या घटनेशी मेळ घालण्याचे महत्त्व विशेष आहे, ते जाणत्या जनतेने ओळखले पाहिजे.

---

## सारखी वाटणी

दोन भागीदार आपल्या वकिलाच्या सल्ल्याने पार्टनरशिपची आर्टिकल्स तयार करीत होते. सह्या करण्यापूर्वी वकिलाने मसुद्यावर नजर फिरवली व तो एकदम म्हणाला, “पण ह्यात आगीचा अगर दिवाळखोरीचा उल्लेख नाही; दोन्हींचा समावेश केला पाहिजे.”

“अगदी बरोबर” दोन्ही भागीदार एकदम म्हणाले, “दोन्ही गोष्टी घाला. पण दोन्ही कारणांवरून होणारा फायदा मात्र सारखा वाटण्याची तरतूद करा.”

# जनता सहकारी बँक लि., सांगली

दि. ३०-६-१९७४ अखेरची प्रगती

वसूल भांडवल व रिझर्व्ह – रु. ११ लाख, ६७ हजार

ठेवी – रु. एक कोटी, सात लाखाचे वर

खेळते भांडवल – रु. एक कोटी, चाळीस लाखाचे वर

बा. आ. कवाडे — मॅनेजर

ग. गो. बर्गे — व्हा. चेअरमन

म. सा. कराळे — चेअरमन

दृढ विश्वास हेच एक मोठे भांडवल आहे.... व ते आम्ही १९०६ सालापासून जतन करीत आहोत.

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड

लक्ष्मीपथ, कुंटेचौक, पुणे ३० — दूरध्वनी ५६१८३

१. लघुउद्योगधंद्यांना पतपुरवठा करून आम्हीही देशाच्या भरभराटीस हात देत आहोत.
२. मध्यमवर्गीयांच्या जिव्हाळ्याचे आर्थिक प्रश्न सोडविणारी महाराष्ट्रातील श्रेष्ठ सहकारी बँक.
३. आपली रक्कम कॉसमॉस बँकेत ठेवरूपाने गुंतवा व जास्तीत जास्त व्याज मिळवून निश्चिंत राहा.
४. तत्पर सेवा, व बँकिंगच्या सर्व व्यवहारासाठी भेटा...

खडकी शाखा
३१ बॉम्बे-पूना रोड, पुणे ३०

पर्वती शाखा
४८९/अ/२ पर्वती शाखा पुणे ९. दूरध्वनी ४२३८९

ॲड. वि. र. क्षीरसागर, कार्याध्यक्ष — व. रा. पिंगळे, उप. कार्याध्यक्ष

अ. बा. देहाडराय, संचालक — म. ना. परांजपे, संचालक — अ. य. शाळिग्राम, संचालक — बा. पां. शाळिग्राम संचालक

भास्करराव रवडे, संचालक — शं. गो. बर्वे, संचालक — ना. अ. कुलकर्णी, संचालक — द. ग. देव, संचालक

ह. गो. महाजन, संचालक — मु. द. गोडसे, संचालक

गो. ग. पुजारी, व्यवस्थापक — रा. य. बेलसरे, साहाय्यक व्यवस्थापक

## नवीन कारखाने काढावयाचे आहेत काय ! मुंबईला चला !

मुंबई हे ठिकाण कारखान्यांच्या दृष्टीने अत्यंत सोईस्कर आहे. परंतु ही गोष्ट जाहीर रीतीने लोकांस सांगून तेथे धंदे सुरू करा, असा प्रचार करणे अत्यंत जरूर आहे व त्यासाठी एक प्रचार-समिती नेमावी, अशी सूचना मि. गिल्बर्ट लॉज ह्यांनी रोटरी क्लबपुढे वाचलेल्या आपल्या एका निबंधांत केली आहे.

मुंबईचे बंदर सर्वोत्कृष्ट असून मालाची चढउतार करण्यास त्यांत उत्तम सोई आहेत. जी. आय. पी. आणि बी. बी. सी. आय. ह्या दोन रेल्वेजच्या मार्गांनी कच्चा माल मुंबईत आणण्यास व पक्का माल बाहेर पाठविण्यास फार सोपे आहे. मजुरांचा भरपूर पुरवठा असून मजुरीचे दरही भारी नाहीत. मुंबईची हवाही आरोग्यविघातक आहे, असे म्हणता येणार नाही. शिवाय, किनाऱ्यावरील इतर बंदरांबरोबर व्यापार करण्यासही येथे उत्तम सोय आहे. कारखान्यांस जमीन स्वतांत मिळणे जरूर असते; विलायतेतील बहुतेक शहरांच्या म्युनिसिपालट्या ह्या बाबतीत सवलती देतात. मुंबईतही हे होणे जरूर आहे. कामकरी लोकांस वस्ती येथे भरपूर जागा आहे; ४०-५० हजार लोकांची आजच तेथे सोय होण्याजोगी आहे. विजेचा पुरवठा मुबलक आहे. टाटा पॉवर कंपनी दरवर्षी सरासरीने ५० कोटी युनिट वीज पुरवीत आहे. किंमतीच्या मानाने देखील मुंबईमध्ये वीज स्वस्त आहे. ४०,००० युनिटच्या वर वीज वापरणाऱ्यांस विजेचा दर फक्त ·६९ आणे पडतो, आणि ह्याहून मोठ्या गिऱ्हाइकांस या दरांतही सवलत मिळते. पाणी इंग्लंडमध्ये दर हजार गॅलनला १ शिलिंग ह्या दराने मिळते, म्हणजे मुंबईला पाणी महाग आहे, असे म्हणता येत नाही. मालाची ये-जा वाढली तरी त्या मानाने पोर्ट ट्रस्टचा खर्च वाढणार नाही, व बंदरावरील देण्याचे दर कमी होण्याचा संभव आहे, कारखान्यास जागा मिळवून देणे पोर्ट ट्रस्टच्या हिताचेच आहे, कारण शेवरी येथील १५० एकर जागा आज पडून असून तिचा उपयोग गोल्फ खेळण्याकडे केला जातो ! पोर्ट ट्रस्टच्या जागेच्या किमती मात्र उतरविल्या पाहिजेत. कारण तेथे २ रुपये चौरस फूट अशी किंमत देण्यापेक्षा ३०० ते ४०० रुपये एकर ह्या दराने मुंबईच्या उत्तर भागात जागा सहज मिळू शकते. मुंबई शहराचे औद्योगिक दृष्टीने महत्त्व, कारखान्यास मिळणाऱ्या विशिष्ट सोई, इत्यादीसंबंधी माहिती प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. त्याचा प्रचार इंग्लंडमध्येच नव्हे तर युरोपांतही व्हावा. लंडन येथे मध्यवर्ती कचेरी नेमावी, व दोन-तीन लायक लोकांच्या हाती हे काम द्यावे, अशी मि. गिल्बर्ट लॉज ह्यांची सूचना आहे.

अर्थ १७-४-३५

### गुप्तदान

धर्मादाय फंडाच्या खजिनदाराला पुढीलप्रमाणे पत्र व त्या सोबत एक चेक आला :— " पत्राबरोबर फंडाला मदत म्हणून २० रुपयांचा चेक धाडला आहे. त्यावर सही केलेली नाही; माफ करा. मला माझे नाव जाहीर करावयाचे नाही. "


शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी
चमन
चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.
ह्याच्या सेवनाने तहान भागून आवाज खुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान-थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.
इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार
स्टार कंपनी, बेळगाव



## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., सोलापूर

फोन नं. – १९१८ / १९८० पोस्टबॉक्स नं. १२ तार : "कृषी बँक"

* सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण जनता सुखी व संपन्न व्हावी याकरिता सेवाबद्ध असलेली
* कृषी औद्योगिक विकासाच्या प्रेरणेने गाजणारी
* जिल्ह्यातील हरितक्रांतीस सक्रिय सहयोग देणारी
* ग्रामीण दुर्बल व असमर्थ समाजघटकांचे आर्थिक जीवन सुखमय करू शकणारी
* शेतकऱ्यांच्या योजनाबद्ध आर्थिक विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेली शेतकऱ्यांची भाग्यलक्ष्मी
* वास्तव अर्थाने "गरीबी हटाव" साठी क्रियाशील असणारी या जिल्ह्यातील एकमेव बँक.

दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि.,
२१ शाखांद्वारे ग्रामीण समाजाच्या दारी सेवेसाठी रुजू आहे.

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या योजनेप्रमाणे बँक आता इन्शुअर्ड बँक म्हणून नोंदविण्यात आली आहे. प्रत्येक खातेदाराच्या रु. १०,००० /– पर्यंतच्या ठेवींवर कॉर्पोरेशनकडून हमी मिळाली आहे.

* या बँकेत ठेवी ठेवणे म्हणजेच स्वकल्याणाबरोबर राष्ट्रविकासास हातभार लावणे होय.

बा. बं. लिगाडे, एम. ए., एल. डी. सी. जी. डी. सी. ॲंड ए. व्यवस्थापक
शं. ना. मोहिते–पाटील, चेअरमन



॥ ॐ ॥

ही दिवाळी आमचे ठेवीदारांस व हितचिंतकांस समृद्धीची जावो.

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

शाखा-बन्हट्टी ] स्थापना १९४० [ फोन नं. १७

पस्तीसाव्या वर्षात यशस्वी पदार्पण

( ३० जून १९७४ अखेरचे बोलके आकडे )

| | | |
|---|---|---|
| वसूल भागभांडवल ... | रु. | ३,०८,९२० |
| गंगाजळी व इतर निधी ... | रु. | ७,११,०४१ |
| सर्व प्रकारच्या ठेवी ... | रु. | ५७,९१,३५६ |
| कर्जव्यवहारातील गुंतवणूक | रु. | ३८,६०,४१० |
| सरकारी व सहकारी संस्थेतील गुंतवणूक | रु. | ९,१९,११५ |
| खेळते भांडवल ... ... | रु. | ७१,४१,२०८ |
| निव्वळ नफा ... | रु. | १,११,०७६ |
| डिव्हिडंड ( नियोजित ) ... | रु. | ९ % |
| ऑडिट वर्ग ... | | "अ" |

स्वतःच्या मालकीच्या जमखंडीत व बन्हट्टीत कार्यालयाच्या इमारती. गिरिशनगर मार्केट यार्डात स्वतःची नऊ गोडाऊन्स! सेफ डिपॉझिट व्हॉल्टची जमखंडी तालुक्यातील एकमेव सोय. बँकिंगची सर्व कामे केली जातात.

वा. गु. मण्णूर, मॅनेजर
मा. आ. शहा, चेअरमन



## धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

स्थापना : १३-९-१९५७

मुख्य कचेरी– गरुड बाग, धुळे ( पो. बॉ. नं. ३ ) फोन नं. ९७

बँकेची सांपत्तिक स्थिती दि. ३०-९-१९७४

| | | |
|---|---|---|
| १. अधिकृत भांडवल | रु. | १ कोटी ५० लाख |
| २. भरपाई झालेले भाग भांडवल | रु. | १ कोटी १६ लाख |
| ३. ठेवी | रु. | ५ कोटी ८० लाख |
| ४. कर्जे | रु. | ९ कोटी ४० लाख |
| ५. खेळते भांडवल | रु. | १२ कोटी ५० लाख |

जिल्ह्यातील मुख्य कचेरी व ३१ शाखा शेतकऱ्यांचे सोयीसाठी औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी अविरत कार्य करीत आहेत.

आमची खास वैशिष्ट्ये

१. या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.
२. सर्व प्रकारच्या बँक व्यवहाराच्या सोयी त्वरित आणि अल्प कमिशन घेऊन केल्या जातात.
३. बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाच्या दराने स्वीकारते.
४. बँक अल्प ठेव योजना व रिकरिंग डिपॉझिट योजना द्वारे बचत ठेवीवर भरपूर व्याज देते.
५. आमच्या बँकेस दि. १-७-७१ पासून डिपॉझिट इन्शुअरन्स ॲक्ट अन्वये विमा संरक्षण योजना सुरू झाल्याने रु. १०,००० पर्यंतच्या सर्व ठेवीदारांना त्यांच्या सुरक्षितता प्राप्त झालेल्या आहेत –एक वेळ आपण येऊन आम्हांस आपल्या सेवेची संधी द्यावी.–

मॅनेजर



फोन नं. : ५७७३२

# पु. ना. गाडगीळ आणि कंपनी

सराफ व जव्हेरी, कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे-३०

चोख सोने, मोती, चांदी व जवाहिरांचे नाजूक अलंकार, सांगली–नासिक घाटाची चांदीची भांडी, नवग्रहांचे खडे, नवरत्न अंगठ्या, लॉकेट्स, जन्ममास खडे खात्रीशीर व माफक किंमतीत मिळतात.

## संतति-नियमनाची आवश्यकता

### कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये चर्चा

गेल्या आठवड्यात, मि. हुसेन इमाम ह्यांनी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये, लोकसंख्येच्या वाढीस आळा घालण्यासाठी सरकारने प्रयत्न करावे अशा अर्थाचा एक ठराव मांडला. सध्याच लोकांस काम मिळण्याची पंचाईत पडत आहे. लोकसंख्या वाढत गेली तर सरकार त्यास काम कोठून देणार? असा त्यांनी सवाल केला. सर फिरोज सेटना ह्यांनी, गेल्या १० वर्षांत लोकसंख्या १०½ टक्क्यांनी वाढली आहे असे सांगितले. श्री बसूंचे म्हणणे, जननास प्रतिबंध करण्यापेक्षा विवाहासंबंधीचे कायदे प्रथम बदलून टाकावे, म्हणजे लोकसंख्येची वाढ बेतात राहील असे होते. होम सेक्रेटरी, मि. हॅलेट, ह्यांनी सरकारतर्फे ठरावास विरोध केला. ते म्हणाले की, आज आर्थिक मंदीमुळे ह्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधले जाते, परंतु परिस्थिती सुधारली म्हणजे मोठमोठ्या कारखान्यांस कामगार मिळण्याचीही पंचाईत पडणार नाही कशावरून? संततिनियमनासारख्या मार्गाने लोकसंख्येचा प्रश्न सुटणार नाही व सरकार त्यात अशा रीतीने पडणारही नाही. मेजर जनरल स्प्रॉसन हे ठरावास विरोध करताना म्हणाले की, लोकसंख्या मर्यादेबाहेर वाढली, या विधानाची सत्यता कशी अजमावणार? त्यास पुरेसा पुरावा आहे काय? गेल्या ८० वर्षांत युरोपमध्ये राहणीचे मान वाढले आहे व तेथे साथीचे रोग पार नाहीसे झाले आहेत. त्याबरोबरच जननाचे व मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. हा परिणाम केवळ राहणीकडे पाहण्याच्या मनोवृत्तीमुळे घडून आला. उंदरांवर केलेल्या प्रयोगावरून असे सिद्ध झाले आहे की, त्यांचा साथीच्या व इतर रोगांपासून बचाव केला, तर त्यांचेमधील जनन-मृत्यूचे प्रमाण घटते. मनुष्य प्राण्याचे बाबतीत ह्याच रीतीने मनोवृत्तीत फरक घडून येणार नाही कशावरून!

ठराव नापास झाला. अर्थ २७-३-३५

---

### बावळट तेवढा बरोबर सापडला

समोरच्या हॉटेलात चहा पिण्याचे निमित्त करून बँकेमधील सर्व कारकून क्रिकेटच्या सामन्याचे धावते समालोचन ऐकण्यासाठी गेले होते. हा प्रकार पाहून बँकेच्या मॅनेजरला राग आला. त्यांच्यापैकी एकजण थोड्या वेळाने परत आला. मॅनेजरचा पारा चढलेला त्याला ठाऊक नव्हता. मॅनेजरने सामन्याबद्दल आपणालाही औत्सुक्य असल्याचा बहाणा करून विचारले, "काय स्कोअर झाला आहे?"

बावळट कारकून उत्साहाने म्हणाला "७ गडी बाद होऊन १६६ धावा झाल्या आहेत. आपल्याला मॅच जिंकायला अजूनही आशा आहे."

बाकीचे कारकून आल्यावर त्यांना मॅनेजरने तोच प्रश्न विचारला. त्यांनी उत्तर दिले– "आम्ही चहा पिण्यासाठी गेलो होतो."


अरण्येश्वर सहकारी ग्राहक वस्तु भांडार (मर्यादित)
सहकारनगर नं. १

स्थापना १५ ऑगस्ट, १९७४

दसऱ्याच्या मुहूर्तावर व्यवहार सुरू झाले

☆

वेळ } रविवारखेरीज, रोज सायंकाळी ७ ते ९
} रविवारी सकाळी ८-३० ते १०

कार्यालय स्थान
"सुविद्या" ५९ अध्यापक कॉलनी
सहकारनगर नं. १ पुणे ९

व्यवस्थापक समिती

ही दिवाळी आणि नूतन वर्ष आपणा सर्वांस
आनंददायक आणि सुखसमृद्धीचे जावो
हीच प्रभूचरणी प्रार्थना

श्री वारणा सहकारी
साखर कारखाना लि.,
वारणानगर

तहसील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर [महाराष्ट्र राज्य]

तार: 'वारणासाकर' वारणानगर
दूरध्वनी : कोल्हापूर ११४६

निवृत्ती विठोजी घोरपडे
व्हाईस चेअरमन

वि. आ. ऊर्फ तात्यासाहेब कोरे
चेअरमन

नंदकुमार काशिनाथ नाईक
कार्यकारी संचालक

## हाजी मस्तानचा खरा गुन्हा कोणता !

**एका सामान्य कुलीने उच्चवर्गीयांना स्वतःचे हुजरे बनविले.**

हाजी मस्तानचा गुन्हा कोणता ? तो स्मगलर आहे ? स्मगलिंग गुन्हा आहे का ? समाजाच्या गरजा भागविणे हा का गुन्हा आहे ? हाजी मस्तानने हा धंदा केला नसता, तर मी माझ्या गिऱ्हाइकांना स्कॉच कशी देऊ शकलो असतो ? काय म्हणता खुल्या बाजारात मिळते की ? तुम्हांला काय वेड लागले ? तिप्पट किंमत देऊन मी खुल्या बाजारात घेऊ ? सरकारी नियंत्रणे आणि समाजवाद ह्यांच्या तावडीत कुणालातरी चांगले जीवन जगता येईल का ? वरच्या वर्गातल्या आम्हांला सरकार चांगले जीवन जगूच देत नाही. माझ्या पत्नीचेच उदाहरण पाहा ना. तिच्या शिफॉनच्या साड्या, पॅरिशिअन हेअरडू, तिची सौंदर्य-प्रसाधने, तिचे कट ग्लास, तिची पाश्चात्य संगीताची आवड ( सर्वोत्कृष्ट स्टिरिओफोनिक साहित्य त्याला हवेच ), ही सर्व आयात केलेल्या जिनसांखेरीज कशी शक्य आहेत.

भारतीय बनावटीच्या जिनसा तितक्याच चांगल्या असतात, असे तुम्ही म्हणाल. तुम्हांला अभिरुचीच नसल्याचे ते द्योतक आहे. ह्या सर्व चांगल्या जिनसा हाजी मस्तान आमच्यासाठी बाहेरून आणतो. ह्या खोलीतील जिनसांकडे दृष्टी या; त्यातल्या ९० टक्के जिनसा परदेशी आहेत. त्या सर्व इंदिरा गांधींमुळे आलेल्या नसून, इंदिराजींनी केलेल्या प्रतिबंधाला न जुमानता हाजी मस्तानने आणलेल्या आहेत. हाजी मस्तानच्या अभावी इथं नरकवासच भोगावा लागेल. सरकारने त्या जिनसांची आयात होऊ दिली तर आम्ही कशाला मस्तानकडे जाऊ ? अर्थशास्त्राचा मागणी-पुरवठ्याचा, हा साधा सिद्धांत आहे. पुरवठा कमी पडला, म्हणजे कुणीतरी लूट भरून काढतो. त्यात काय गुन्हा झाला ?

मस्तान पूर्वी साधा मजूर होता. त्याला ना आगा ना पिछा. स्वतःच्या कर्तृत्वाने वर चढला. झोपडपट्टीतून टोलेजंग इमारतीत राहावयास गेला. तो सूट घालू लागला, मौल्यवान नेकटॉयने विभूषित होऊ लागला. मर्सिडिस गाडीतून हिंडतो. पण तो उपरा आहे; तो एखाद्या बड्या कुटुंबात जन्मला असता, उत्कृष्ट शाळेत शिकला असता, क्रिकेट खेळला असता, हारवर्ड स्कूल ऑफ बिझिनेस मॅनेजमेंटची पदवीधर असता, तर त्याने जे केले असते तेच करूनही तो अत्यंत कुशल, यशस्वी, व्यापारी-उद्योगपती गणला गेला असता आणि आदर्श नागरिक बनला असता. पण ठेविले अनंते तैसेची न राहता त्यातून बाहेर पडून एवढे यशस्वी होण्याचा उद्धटपणा 'कुली' मस्तानला कुणी शिकवला ! आमच्यात शिरून आम्हांलाच त्याने मागे कसे सारले ? त्याची हुजरेगिरी करायची, त्याची चमचेगिरी करायची, त्याचे बूट चाटायची, आमच्यावर पाळी आली ! अती कनिष्ठ वर्गातल्या मस्तानने समाजाचे शिखरस्थानी पोचावे, हाच त्याचा खरा गुन्हा आणि त्याला इंग्रजी बोलता सुद्धा येत नाही !!!! —

"दिवाणा", नोव्हेंबर १९७४


महाराष्ट्रातील आदर्श नागरी सहकारी बँक आपल्या फैजपूर, बोदवड व वरणगाव शाखेसह जनतेची अपूर्व सेवा करीत असलेली तसेच को. ऑप. बँकिंग क्षेत्रात पहिल्या क्रमांकाचो शिफारस झालेली व १ कोटीच्या वर डिपॉझिट असलेली भुसावळची लोकोपयोगी बँक. ह्या बँकेत सवलतीचे दराने कमी व्याजावर कर्ज देण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे कार्यक्षम व सेवाभावी कर्मचारी वर्ग आहे

"ठेवींसाठी आकर्षक व्याज"

**धी भुसावळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, भुसावळ**

स्थापना-१९२५ फोन नं. ४३६ पो. बॉ. नं. ३

आमच्या बँकेच्या प्रगतीचे आकडे ता. ३०-९-१९७४ अखेर

| | | |
|---|---|---|
| भांडवल | रु. | ४०००००-०० |
| खपलेले | रु. | २४७२५०-०० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३९५०५१-९६ |
| इतर रिझर्व्हज | रु. | ४९३९०९-८७ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | रु. | १०६३०८४९-७१ |
| खेळते भांडवल | रु. | १२४०९०५७-३३ |

**डायरेक्टर मंडळ व अधिकारी**

१. श्री. नामदेव पुरुषोत्तम फालक चेअरमन, २. श्री. देविदास नामदेव भोळे, व्हाईस चेअरमन, ३. श्री. देविदास गोविंद फालक, ए. डि. कु. कर्ता, ४. श्री. प्रभाकर सेनू महाजन, ५. श्री. पांडुरंग रामचंद्र पाटील, ६. श्री. वैद्य ब्रह्मदत्त शर्मा शास्त्री, ७. श्री. सदाशिव दामोदर नाईक, ८. श्री. प्रेमचंद गोविंद महाजन, ९. श्री. देविदास देवचंद चौधरी. * श्री. विश्वनाथ सदाशिव पाटील, मॅनेजर.

आमचेकडे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. तसेच जीवनावश्यक वस्तूसाठी व मोटार सायकल, स्कूटर, मोटारकार इ. साठी हायर पर्चेस स्किमखाली कर्जे दिली जातात.

व्ही. एस. पाटील
मॅनेजर

एन्. पी. फालक
चेअरमन



"अर्थ"ची स्थापना महाराष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयाच्या मार्गदर्शनाच्या हेतूने, ध्येयबुद्धीने, कै. प्रा. श्री. गो. काळे ह्यांनी १९३६ साली केली. त्यांनी आपल्या मृत्यूपर्यंत ( १९४६ ) "अर्थाचे" संपादन केले. त्यानंतर आजतागायत श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या संपादकत्वाखाली "अर्थ" आपली कामगिरी कौशल्याने बजावीत आहे. ४० वर्षांच्या ह्या प्रदीर्घ समाजसेवेबद्दल आमचे हार्दिक धन्यवाद आणि प्रेमाचा निरोप.

म. गो. कुलकर्णी

फडतरे चौक, पुणे ३०


Swastik
SERVES HOME & INDUSTRY
Through a wide and
varied range of rubber
and P.V.C. products—for
domestic and industrial
use
Footwear and hoses
gloves, moulded
products and oil seals,
foam rubber
mattresses, pillows and
cushions, erasers and
G.R.P. helmets
Over 4000 products in
all—each one built as
only Swastik can
highly dependable and
full of utility
SWASTIK RUBBER
PRODUCTS LTD.,
Pune-411 003.


ARTHA

Divali, November, 1974

Price Rs. 2=00

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. MH. 80, Licence No. 175



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६